बुधवार, ११ ऑक्टोबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ६८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 11 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-68 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-14 ● PRICE-5

# ग्रामीण भागातील बसफेरीला विलंब; संतप्त विद्यार्थ्यांची एसटी आगारात धडक

आधुनिक केसरी न्यूज

**मनोज जाधव**

**खामगाव :** अपुऱ्या बसेसमुळे गत काही दिवसांपासून खामगाव आगरातील एसटी बसचे नियोजन कोलमडले असून ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांसह सामान्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे. परिणामी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने संतप्त विद्यार्थ्यांनी आज 10 ऑक्टोंबर रोजी सकाळी खामगाव बसस्थानक ते आगारापर्यंत पायदळ मोर्चा काढून आगार प्रमुखांना निवेदन दिले.

अपुऱ्या बसेसमुळे गत काही दिवसांपासून खामगाव आगरातील एसटी बसचे नियोजन कोलमडले आहे.10 ऑक्टोबर रोजी खामगाव स्थानकातून खामगाव ते नागापूर मार्गे किन्ही महादेव, आवार ते विहीगाव करीता बस वेळेवर उपलब्ध होत नसल्याने अनेक विद्यार्थी शाळेत वेळेवर पोहोचू शकले नाही. त्यामुळे संतप्त विद्यार्थी संतप्त झाले होते. शाळा सुटल्यानंतर बराच वेळ बस उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचा संताप व्यक्त करण्यात आला. त्याचवेळी अहिल्यादेवी होळकर विद्यालयातील मुख्याध्यापक संजय कोकरे यांनी



आगार प्रमुखांना मंगळवारी निळेगाव, विहिगाव, किन्ही महादेव, नागापूर अशा वेगवेगळ्या गावातील 56 विद्यार्थी सकाळी 10:30 वाजेपर्यंत शाळेत पोहोचतील. आणि सायंकाळी 4:45 वाजता सर्व बसेस विहिगाव येथे पोहोचतील. शनिवारी सकाळी 7:30 तर शाळा सुटल्यानंतर 11 वाजता विहिगाव येथे पोहोचतील अशा सोयीने व्यवस्था करण्याची मागणी निवेदनातून केली. त्याचवेळी शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी किन्ही महादेव ते नागापूर, विहिगाव पर्यंत बसेस सुरू करावी अशी मागणीही यावेळी विद्यार्थ्यांनी केली. माजी सभापती सुरेश तोमर यांनी विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाला पाठींबा दिला. आगार व्यवस्थापकांच्यावतीने सहा. वाहतूक निरिक्षक सरला तिजारे यांनी विद्यार्थ्यांचे निवेदन स्वीकारले. समस्या तत्काळ निकाली काढण्याचे आश्वासन दिले.

## महत्त्वाची बातमी

### मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी योजना

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिंदे-फडणवीस-पवार सरकारच्या मंत्रिमंडळाची बैठक बुधवारी मंत्रालयात पार पडली. या बैठकीत महत्वाचे ७ निर्णय घेण्यात आले आहेत. मुलींच्या सक्षमीकरणासाठी लेक लाडकी योजना आणि सांगली, अहमदनगर जिल्ह्यात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयांना मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. या बैठकीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते, अशी माहिती सीएमओ 'एक्स' (ट्वीटर) अकाउंटवरून देण्यात आली.



**मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेले महत्वाचे निर्णय**

सार्वजनिक खासगी भागीदारीतून उदंचन जलविद्युत प्रकल्पासाठी धोरण. मोठ्या प्रमाणावर खासगी गुंतवणूक जलविद्युतमध्ये येणार. (जलसंपदा विभाग) सांगली, अहमदनगर जिल्ह्यात जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालये (विधी आणि न्याय विभाग) पात्र माजी खंडकरी शेतकऱ्यांना १ एकरापेक्षा कमी जमीन मिळणार. (महसूल विभाग) फलटण ते पंढरपूर नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग आता रेल्वे मंत्रालयातर्फे पूर्ण करणार (परिवहन विभाग) भोसला मिलिटरी स्कूलला नागपूर येथे जमीन (महसूल आणि वन विभाग) विद्यापीठाच्या नावात औरंगाबाद ऐवजी छत्रपती संभाजीनगर बदल करण्यास मान्यता. (उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग)

# बडोदा बँकेवर आरबीआयचा बडगा

## ग्राहकांवर थेट होणार परिणाम

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : देशाची मध्यवर्ती बँक असलेल्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मोठी कारवाई केली आहे. आरबीआयने देशातील सर्वात महत्त्वाच्या सरकारी बँकेवर कारवाईचा बडगा उगारला आहे. या कारवाईमुळे ग्राहकांवर थेट परिणाम होणार आहे. आरबीआयने बँक ऑफ बडोदावर कारवाई केली आहे.**

बँक ऑफ बडोदाला त्यांच्या मोबाईल ॲप 'BOB वर्ल्ड' वर नवीन ग्राहक जोडण्यास तत्काळ प्रभावाने मनाई केली आहे. याचा अर्थ आता नवीन ग्राहक BOB च्या ॲपचा वापर करू शकणार नाही. 'बँक ऑफ बडोदा'च्या जुन्या ग्राहकांवर याचा परिणाम होणार नाही. रिझर्व्ह बँकेने 'बॉब वर्ल्ड'च्या जुन्या ग्राहकांना कोणत्याही अडचणींना सामोरे जावे लागणार नाही, याची काळजी घेण्याची सूचना बँकेला केली आहे.

याचा परिणाम बँक ऑफ बडोदाच्या त्या ग्राहकांवर होईल ज्यांचे बँकेत खाते आहे पण ते 'बॉब वर्ल्ड' ॲपशी जोडलेले नाहीत. इंटरनेट बँकिंग व्यतिरिक्त, बँकेच्या या ॲपवर युजर्सना युटिलिटी संबंधित पेमेंट, तिकिटे, IPO सबस्क्रिप्शन इत्यादी सुविधा मिळतात. रिझर्व्ह बँकेने सांगितले की, ॲपवर ग्राहक जोडले जाताना काही त्रुटी आढळल्या. ही चिंतेची बाब होती. आरबीआयने म्हटले की, भारतीय रिझर्व्ह बँकेने, बँकिंग नियमन कायदा, 1949 च्या कलम 35A अंतर्गत आपल्या अधिकाराचा वापर करून, बँक ऑफ बडोदाला 'बॉब वर्ल्ड' वर अधिक ग्राहक जोडण्याची प्रक्रिया निलंबित करण्याचे निर्देश दिले आहेत. मोबाइल ॲपची सेवा तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आली आहे. नवीन ग्राहक ॲपशी जोडताना या त्रुटींवर मात करणे आवश्यक आहे. आरबीआयचे समाधान झाल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे आरबीआयने म्हटले.



**महाराष्ट्रातील 113 वर्ष जुन्या सहकारी बँकेची मान्यता रद्द :** अहमदनगर शहरातील 113 वर्षांपेक्षा जास्त वर्षांची गौरवशाली परंपरा असलेली आणि जिल्ह्यातील मोठी सहकारी बँक असलेल्या नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचा परवाना भारतीय रिझर्व बँकेने रद्द केला आहे. 5 ऑक्टोबरपासून बँकेचे कामकाज थांबवण्यात आले. बँकिंग व्यवसाय करण्यासाठी अर्बन बँकेकडे पुरेसे भांडवल आणि कमाईच्या संधी नाहीत. यामुळे बँकिंग नियमन कायदा 1949 चे कलम 56 च्या तरतुदींचे पालन होत नाही. अशा स्थितीत बँक सुरू ठेवणे तिच्या ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीने चांगले नाही असेही रिझर्व्ह बँकेने म्हटले.

# मुलांना चोरून विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुलांना चोरून त्यांची विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात मुंबई पोलिसांना यश आले आहे. मालवणी, गोवंडी आणि नाशिक परिसरातून या सहा आरोपींच्या टोळीला अटक करण्यात आली आहे. या आरोपींनी मुंबईत किती लहान मुलांना पळवले आणि या टोळीमध्ये आणखी किती सदस्य आहेत या संदर्भात आता पोलीस अधिक तपास करत आहेत. मुले नसणाऱ्या नागरिकांना लहान मुले विकण्याचे काम या टोळीकडून सुरू होते. एक-दीड वर्षाच्या मुलासाठी खरेदीदाराकडून दीड ते दोन लाख रुपये या मुले चोरणाऱ्या टोळीला मिळतात अशी माहिती समोर आली आहे.

## चर्चेतील बातमी

### रुग्णालयांत अस्वच्छता भोवली, कर्मचारी निलंबित

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात घडलेल्या घटनेनंतर यवतमाळ जिल्हा प्रशासन दक्ष झाले. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी शनिवारी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह स्त्री रुग्णालयाला भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी वैद्यकीय महाविद्यालयात अनेक ठिकाणी अस्वच्छता आढळून आली. याची गंभीर दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरून याप्रकरणी दोन स्वच्छता निरीक्षकांसह चौघांना निलंबित करण्यात आले. या कारवाईने वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली. नांदेडच्या घटनेनंतर सरकारी रुग्णालयांमधील अनागोंदी बाहेर आली. अनेक रुग्णालयांमध्ये वैद्यकीय उपचारांसाठी येणाऱ्या रुग्णांची हेळसांड होत असल्याचे निदर्शनास आले. अपुरे कर्मचारी, अपुरा औषधीसाठा यामुळे रूग्ण व त्यांचे नातेवाईक त्रस्त असल्याची ओरड सुरू झाली. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी यवतमाळातील दोन्ही सरकारी रुग्णांलयांना भेट देऊन आढावा घेतला. यावेळी त्यांनी दोन्ही रुग्णालयांतील वॉर्डांची पाहणी केली. स्वच्छतागृहे तपासली. तसेच रुग्णांशीही संवाद साधला. अनेक रुग्णांनी असुविधांचा पाढा त्यांच्यासमोर वाचला. अनेक वॉर्डात अस्वच्छता आढळली. स्वच्छतागृहे अस्वच्छ आढळली. त्यामुळे याबाबत वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनास खडेबोल सुनावले. यासाठी जबाबदार असणाऱ्यांना निलंबित करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनास दिले. सोमवारी या निर्देशांची अंमलबजावणी करण्यात येवून रुग्णालय प्रशासनाच्यावतीने दोन स्वच्छता निरीक्षकांसह एक हवालदार आणि वर्ग-४ च्या एका कर्मचाऱ्यास निलंबित करण्यात आले. या कारवाईने वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.



# येथे मिळतो पाखरांना चारा, शेकडो पक्ष्यांची भरते जणू शाळाच!

आधुनिक केसरी न्यूज

विजयकुमार हरिश्चंद्रे

नागपूर : सध्याच्या काळात वाढते ध्वनी प्रदूषण आणि सिमेंटीकरण, त्यातच जुने वाडे इमारती,




परस दारे, अंगणे ही नष्ट झाली आणि गावांचे आधुनिकीकरण होऊ लागले. या वाढत्या सिमेंटीकरणाच्या जंगलात मात्र चिमणी, पाखरं दुरवली आहेत. शेतीकडच्या रानवाटा, विहिरीही सिमेंटच्या झाल्याने चिमण्यांच्या हक्काची घरटी आणि मानवी जीवनाशी जोडलेली नाती हळू हळू दुरावली. अगदी क्वचितच ठिकाणी बागडणारी चिमणी, पाखरं बघण्यास आता दूर डोंगर खोऱ्यात जावे लागते. स्वार्थी मानवी अतिक्रमण, झाडांची होणारी कत्तल, यामुळे चिमण्या, पाखरे, पक्षी दुरावली आहेत. परंतू नागपूरच्या एका पक्षीवेडया मित्राने मात्र आपल्या घराच्या छतावरच उभारली आहे. चिमणी, पाखरे शाळा वरिष्ठ लिपीक असलेल्या जयंत तांदुळकर यांनी आपला सुट्टीचा वेळ पक्षीसेवा करण्यात खर्च करीत अगदी शेकडो चिमणी पाखरांना आश्रय देणारा निवारा सुरु केला आहे. अगदी नित्य नियमाने दररोज सकाळी सायंकाळी जयंत तांदुळकर या पक्ष्यांना आवाज देत बोलवतात.

मग काय शेकडो पक्षी मुनिया, चिमण्या, सूर्यपक्षी, दयाळ, नाचरा, वटवट्या या शिवाय शिक्रा, पिंगळा सातभाई, पोपट, कोतवाल हळद्या कोकिळा हे पक्षी त्यांच्याकरिता सज्ज केलेल्या घरट्यात येतात. फळफुले झाडावर बागडतात. अंगणातील पाण्यात मनमुराद आनंद लुटतात, असा त्यांचा दिनक्रम सुरु असता तांदुळकर आणि त्यांचा परिवार या पक्षांवर खूप प्रेमही करत असतात त्यांच्या चिमणी पाखर शाळेस नागपूर येथील व्हाईस ऑफ मीडियाच्या सदस्या समाजसेविका नीता सोनवणे यांनी नुकतीच भेट दिली आणि त्यांच्या कामाचे कौतुक केले. इतकेच काय जयंत तांदुळकर यांच्या कल्पनेतील या चिमणी पाखर शाळा पूर्वी गावोगावत राखीव उभारलेल्या देवराईप्रमाणे सामाजिक संस्था मंडळे, ग्रामपंचायतीने उभारल्यास पर्यावरण निसर्गातील या महत्वपूर्ण घटकांचे संरक्षण होईल आणि मानवी जीव सुखावेल, असा आत्मविश्वास नीता सोनवणे यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी पक्ष्यांना दिलेली साद त्यातीन मिळणारा सुखकर, असा चिवचिवाट आनंद देईल यात शंका नाही.









विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## आँखोंसे जो उतरी हैं दिलमें...

आता त्यांचा ह्रदयात उतरण्याचा मार्ग बदलतो. डोळ्यांच्या ऐवजी ती कानावाटे प्रवेश करती होतात. कानावाटे ह्रदयापर्यंत पोहोचतात. पण परिणाम मात्र तोच असतो. आणि तो परिणाम म्हणजे दिव्यानंदाची अनुभूती. ज्ञानेश्वर माऊलींनी जेव्हा ज्ञानेश्वरी सांगितली आणि तेव्हा जे श्रोते हजर असतील, ते किती भाग्यवान म्हणावेत ! ते दृश्य जेव्हा मी कल्पनेने डोळ्यासमोर आणतो, तेव्हा मला दिसते ते मंदिर. माऊली खांबाला (पैस) टेकून बसल्या आहेत. समोर त्यांचे बोल आपल्या कानात साठवून घेण्यासाठी चातकाप्रमाणे आतुर झालेला श्रोतृवर्ग बसलेला आहे. बाजूला निवृत्तीनाथ आहेत. माऊलींच्या दोन्ही बाजूला दोन समया प्रकाशमान आहेत. त्या समयांच्या प्रकाश माऊलींच्या मुखमंडलावर पडला आहे. मुळातच तेजस्वी असलेली माऊलींची मुद्रा त्या प्रकाशात आणखीनच दिव्य प्रकाशाने उजळून निघाली आहे. माऊलींच्या मुखातून आता अमृतासमान अशा एकेक ओव्या बाहेर पडताहेत. ओम नमोजी आद्याने सुरुवात झाली आहे. एकामागून एक निरनिराळी रूपके, उपमा घेऊन त्या ओव्या श्रोत्यांच्या ह्रदयाचा ठाव घेत आहेत. इथे श्रोत्यांची अवस्था फारच बिकट झाली आहे. हा आनंद किती आणि कुठे कसा साठवावा हे त्यांना उमजत नाही. जणू त्यांच्या सर्वांगाचे कान झाले आहेत. ज्ञानेश्वर माऊलींचे अमृतमयी बोल ते आपल्या ह्रदयात साठवून घेत आहेत. ह्रदयीचे ह्रदयी घातले अशी ही अवस्था !

'तरी आता अवधान दिजे, मग सर्व सुखाते पात्र होईजे' असे ज्ञानेश्वर माऊली म्हणतात ते उगीच नाही. महर्षी वाल्मिकींनी लिहिलेलं रामायण लव कुश यांनी जेव्हा श्रीरामांच्या दरबारात श्रीराम आणि श्रोत्यांसमोर गायिले तेव्हा सर्वांची काय अवस्था झाली ते आपण रामायणात वाचतोच. ज्यांना आपण आधुनिक वाल्मिकी म्हणतो ते ग दि माडगूळकर गीतरामायणाच्या लेखनामुळे अजरामर झाले. हेच गीतरामायण बाबूजी उर्फ सुधीर फडके यांनी गाऊन अजरामर केले. यातील ते गीत सहजच ओठांवर येते. स्वये श्रीरामप्रभू ऐकती, कुश लव रामायण गाती. मग ही गाणारी मुले कशी आहेत याचे चित्रमय वर्णन गदिमा करतात. ते म्हणतात राजस मुद्रा वेष मुनींचे, गंधर्वच ते तपोवनींचे अशा एकेक ओळी आठवत जातात. या सगळ्यांचा श्रोतृवृंदावर काय परिणाम होतो, तो पण गदिमा जणू सचित्र आपल्या डोळ्यांसमोर उभा करतात. ते म्हणतात सामवेदसे बाळ बोलती, सर्गामागुनी सर्ग चालती सचिव मुनिजन प्रिया डोलती, आसवे गाली ओघळती. प्रत्यक्ष श्रीरामांवर काय परिणाम झाला तर...





## आनंदी पहाट

## अंतर्मनाच्या सौंदर्यासाठी नवसंकल्पनांची गरज

आधुनिक केसरी


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अगदी प्राचीन काळापासून आपण स्वतःच्या विचारांचा आणि स्वतःच्या कीर्तीचा प्रसार करण्यासाठी विविध माध्यमांचा उपयोग करत आलो आहोत. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाची ओळख ही त्या त्या व्यक्तीच्या विचारांवरूनच होत असते. हयातीत आणि नंतर सुद्धा विचारच शिल्लक राहतात. कायम विचारांची भूक असलेली माणसे विचारवंतांच्याच शोधात असतात. भेटणे, बोलणे, संपर्क करणे हे फक्त प्रारंभापुरते निमित्तच ठरत असते. आयुष्याच्या प्रवासात सोबत हवी असते, ती विचारांचीच. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अनेकदा आपले मन जुने सोडायला, विसरायला तयार नसते, तसेच ते नव्याची नवलाई देखील अनुभवू पाहत असते. खरे तर इथेच आपल्यातील निवड कौशल्याचे कसब दिसून येत असते. आपले अंतर्मन सौदर्याच्या संकल्पनांना नवी दिशा मिळवून देण्याच्या प्रयत्नात असते. नवे काहीतरी हवे असे म्हणणारे एक मन एका दिशेने, तर जुने ते सोने म्हणणारे दुसरे मन त्याच्या अगदी विरुद्ध दिशेने विचार करत असते. असे जरी असले तरीही, प्रयोगशील मनाला नावीन्याची अनुभूति हवी असते, मग ते नव्याचाच अंगीकार करते. आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. त्यासाठी एक हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो.



आधुनिक केसरी

**दास तुझा व्हावा | जन्मोजन्मी ||**
भोग भोगोनिया | मुक्त व्हावे जीवा ||
फिरोनी ह्या जन्मा | नको येणे ||१||
दुःखाच्या डोंगरी | संयमाचे घर ||
ज्ञानाचे माहेर | असे तेथे ||२||
आप-पर भाव | ठेवू नये मनी ||
संसाराचा धनी | स्थितप्रज्ञ ||३||
दैवाच्या गतीला | टाळी कैसा सांग ||
सटवाईचा पांग | फेडू येथे ||४||
माझ्या अंतरीचा | धावा ऐक देवा ||
दास तुझा व्हावा | जन्मोजन्मी ||५||


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

मदीये मानसे नित्यं वसतिं कुरु रेणुके|
धर्मकामार्थसिद्ध्यर्थं दुर्गां देवीं नमाम्यहम्||
१०८||
हे रेणुके, तू माझ्या मनात नित्य राहा. मी तुला दुर्गा देवीला मी धर्म, काम, अर्थ यांच्या सिद्धीसाठी नमन करतो.


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

अज गुरु के परकाश में, जगत अन्य गुरु आय ।
मोह पाश जिव काटहीं, भक्ति मुक्ति जिव पाय ।।३१ ।।(स्वर्वेद पंचम मण्डल त्रयोदश अध्याय) ०५/१३/३१
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
नित्य अनादि सद्गुरुंच्या प्रकाशात अन्य गुरु जगात येतात आणि ते जीवांचा मोह-पाश तोडून भक्ती , मुक्ती प्रदान करतात.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## उकडीचा मोदक

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आपलं व बाप्पांचं भावनिक नाते आहे. कुठे तरी मैदा घालून केलेला वाफवत असताना फुटलेला अशी मोदकांची अवहेलना कधीच करू नये. मोदक फक्त आणि फक्त सुवासिक तांदळाच्या पिठाचे करावेत. मी तर म्हणेन पूर्ण पणे वाफाळलेला गरमा गरम मोदक त्यावर तुपाची धार मनसोक्त मोदक खाल्यावर आपलं संपूर्ण जीवनसार्थकी लागल्या सारखं वाटतं. कारणं आमच्या देवाला जे प्रिय तेच आम्हाला पण प्रिय नाही का?

## भगवंत जोडणे हाच एक धर्म

आधुनिक केसरी

भगवंत जोडत असेल तर अधर्मही करावा; भगवंत जोडणे हाच एक धर्म. अभिमानाने कोणतेही कृत्य केले तर ते नाही भगवंताला पोहोचत. दानधर्म केला, धर्मशाळा बांधल्या, हे सर्व नाव होण्याकरिता जर केले, तर त्याचा तुमच्या कल्याणाला काय उपयोग झाला ? भगवंत जवळ न येता त्यामुळे अभिमान मात्र वाढतो. बाभळीची झाडे लावली तर त्यांना आंबे कसे येतील ? मीपणाने केलेले काम नाही उपयोगी पडत. शरणबुद्धीने केलेले काम हाच खरा धर्म. मी भगवंताच्या हातचे बाहुले आहे असे समजावे. 'राम कर्ता' असे म्हणावे. म्हणजे, देवाजवळ शरणबुद्धी धरावी. भगवंताची निष्ठा कोणत्याही वयात आणि कोणत्याही अवस्थेत वाढवता येते. ही निष्ठा कधी कुणाला हार जाणार नाही, किंवा कधी कुणापुढे मान लवविणार नाही. एकदा भगवंतावर पूर्ण निष्ठा ठेवल्यावर मग काळजीचे कारणच काय ? काळजीने कार्याचा नाश होतो आणि कर्तव्याचा विसर पडतो. भगवंतावर श्रद्धा ठेवून प्रयत्न करावा, आणि जे फळ मिळेल त्यात समाधान मानावे.



व्यवहारात सौख्य कर्तव्याने मिळते, तसे परमार्थात सौख्य निष्ठेने मिळते. परमार्थ करणाऱ्या माणसाने कोणाचेही अंतःकरण दुखवू नये.

परमार्थ हा लबाड आणि भोंदू माणसाचा नाही, तसा तो बावळ्या माणसाचाही नाही. व्यवहारात कुणाला फसवू नये, आणि कशाला भुलू नये. आपले डावपेच किंवा लबाडी लोकांना फसविण्यासाठी नसावी. लोकांकडून न फसण्याइतकेच आपण व्यवहारी असावे. आपल्या हातामध्ये जितका पैसा असेल, त्या मानानेच देवघेव करावी. व्यवहाराच्या दृष्टीने देणे न राहील असे वागावे.

'कोणत्याही परिस्थितीत मी राहीन' असे जो म्हणेल त्याला कधीच अडचण पडत नाही. आपण श्रीमंतांचा द्वेष करू नये आणि गरीबांना कमी लेखू नये. अशी वृत्ती बनायला भगवंताची निष्ठा पाहिजे. प्रत्येकाला खायला प्यायला भरपूर मिळाले पाहिजे ही संपत्तीची समान वाटणी होय. मोबदला न देता आपण पैसा घेतला, तर, तो ज्याचा घेतला त्याची वासना त्याला चिकटून बरोबर येते. काय गंमत आहे बघा, इतर बाबतीत मनुष्य वचन पाळण्याची पराकाष्ठा करतो, पण तो पैशाचे वचन देतो ते सहज, आणि ते मोडतोही सहज. तेवढेच वचन पाळण्यात तो कुचराई करतो. पैसा नसून अडते आणि तो असून नडते, अशी आपली परिस्थिती आहे. संन्याशाने एक दिवसाचा संग्रह करावा, गृहस्थाने तीन दिवसांचा संग्रह करावा. आपल्याजवळ तीन दिवस खायला आहे असे पाहिल्यावर आपण मुळीच काळजी करू नये.

## गहिनीनाथ



उंची उंची अनेक पक्वान्ने तयार करण्याची आज्ञा केली व बंदोवस्त नीट राहून काही एक न्यून न पडू देण्याची सक्त ताकीद दिली. मग त्याने एकंदर कामाची व्यवस्था लाविली व उत्सवाचा बंदोवस्त उत्तम प्रकारचा ठेविला. त्या वेळेस सर्वांना अत्यानंद झाला. या भोजनसमारंभांत गहिनीनाथ आले नव्हते. म्हणून गोरक्षनाथानें ही गोष्ट मच्छिंद्रनाथास सुचविली. तेव्हा मधुब्राह्मणाकडे एका गंधर्वास पाठवून पुत्रासह त्यास घेऊन येण्यास सांग, म्हणजे तो त्यास आणील, असे मच्छिंद्रनाथाने गोरक्षास सांगितले. त्यावरून गोरक्षनाथाने चित्रसेनगंधर्वास सर्व वृत्तान्त कळविला व त्याच्या अनुमतीने एक पत्र लिहविले. ते त्यानेंसुरोचन नामक गंधर्वाजवळ दिले. ते त्याने कनकगिरीस जाऊन त्या मधुब्राह्मणास दिले व इकडील सविस्तर मजकूर सांगितला. मग तो ब्राह्मण मोठया आनंदाने मुलास आणि गहिनीनाथास घेऊन निघाला, तो मजल दरमजल करीत करीत गर्भाद्रिपर्वती येऊन पोहोचल्यावर त्याने गहिनीनाथास मच्छिंद्रनाथाच्या पायांवर घातले. त्या वेळेस त्याचे वय सात वर्षाचे होते. मच्छिंद्रनाथ मुलाचे मुके घेऊं लागला. त्या नंतर हा गहिनीनाथ करभजन नारायणाचा अवतार असल्याचे त्याने सर्वांस निवेदन केले. त्या वेळीं शंकरानें मच्छिंद्रनाथास सांगितलें कीं, आम्हास पुढें अवतार घ्यावयाचा आहे, त्या वेळीं मी निवृत्ति या नांवानें प्रसिद्धीस येईन व हा गहिनीनाथास अनुग्रह करील; यास्तव यास अनुग्रह देऊन सकल विद्यांमध्यें प्रवीण करावें. हें ऐकून मच्छिंद्रनाथानें गोरक्षनाथाकडून गहिनीनाथास लागलाच अनुग्रह देवविला.



श्राद्ध, श्रद्धा अन् अंधश्रद्धा पान ६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, ११ ऑक्टोबर २०२३



लोकसमूह निर्मळ, निर्लेप आणि पवित्र करणारा लोकसंत पान ७


# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा

## पंचनामा करण्याचे शासनाचे आदेश : सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला यश

आधुनिक केसरी न्यूज

जिल्ह्यामध्ये पावसाचे २ ते ३ मोठे खंड पडल्यामुळे तसेच वातावरणातील व जमिनीतील वाढलेले तापमान व त्यानंतर आलेल्या पावसामुळे प्रामुख्याने चारकोल रॉट व रायझोक्टोनिया करपा या रोगाच्या वाढीस पोषक वातावरण निर्माण झाले . अश्या आकस्मिक वातावरण बदलामुळे जास्त कालावधीचे, वरील रोगांना संवेदनशील वाण जसे फुले संगम व फुले किमया हे वाण जास्त प्रमाणात बळी पडले . तसेच काही भागात सुरवातीच्या अवस्थेत खोडमाशी व चक्रभुंगा या किडींचा प्रादुर्भाव वाढल्यामुळे पिकाचे मुख्य खोड पोखरल्या जावून जमिनीतील अन्नद्रव्याचे वहन कमी झाले व झाडे अशक्त होवून शेंगा भरण्याच्या संवेदनशील अवस्थेमध्ये पाने पिवळी पडली, त्यामुळे सोयाबीन उत्पादकांना मोठा फटका बसला .

**चंद्रपूर :** अस्मानी सुलतानी संकटात सापडलेल्या, आणि सतत अनिश्चिततेच्या छायेत असणाऱ्या शेतकऱ्यांना यंदा सोयाबीन



पिकावरील कीड आणि रोगाच्या प्रादुर्भावाने त्रस्त केले; या शेतकऱ्यांच्या मदतीला राज्याचे वने, सांस्कृतीक कार्य आणि मत्स्यव्यवसाय मंत्री तसेच चंद्रपूरचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार धावून आले; ना. मुनगंटीवार यांनी या नुकसानग्रस्त शेतकऱ्याची व्यथा प्रत्यक्ष शेतावर भेटू देवून जाणून घेतली: या बाबताची वस्तुस्थिती मा. मुख्यमंत्री, मा. कृषिमंत्री यांना अवगत करून, विशेष पॅकेज जाहीर करण्याची विनंती केली. तसेच राज्याचे मा. कृषिमंत्री व कृषीसचिवांना राज्यातील इतर जिल्ह्यातही अशाप्रकारे नुकसान झाले असल्यास त्या बाबत स्वतः लक्ष देवून आढावा घेण्याबाबत विनंती केली. या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलीत म्हणून शासनाने आता राज्यातील सोयाबीनच्या नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अशा प्रकारचे मदत व पुनर्वसन विभागाचे आदेश सोमवारी 9 ऑक्टोबर रोजी निर्गमित झाले आहेत. या शासन निर्णयामुळे चंद्रपूरसह राज्यातील विविध जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

जिल्ह्यातील सोयाबीन पिक वाढीच्या अवस्थेत असताना पडलेला पावसाचा खंड व अनियमित हवामान यामुळे जिल्हयात भात , सोयाबीन व कापूस या मुख्य पिकांवर किड व रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला होता. कृषि विभागामार्फत नियमीतपणे पिकांचे किड व रोगांचे सर्व्हेक्षण करण्यात येऊन वेळोवेळी शेतकऱ्यांना आवश्यक ते तांत्रीक मार्गदर्शन करुन किड व रोग नियंत्रणाच्या उपाययोजना सुचविण्यात आल्या होत्या.

सोयाबीन पिकावर किड व रोगाचा प्रादुर्भाव होवून पिक पिवळे पडत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर राज्याचे वने,सांस्कृतीक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री ना. श्री . सुधीर मुनगंटीवार यांनी राजुरा तालुक्यातील खामोना, पांढरपौनी, हरदोना (खु) येथे तातडीने जाऊन नुकसानग्रस्त क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी केली होती. त्यावेळी स्थानिक शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीची माहिती दिल्यानंतर यासंदर्भात मुनगंटीवार यांनी यंत्रणेला तात्काळ कार्यवाहीचे आदेश दिले व मंत्रालयात यासंदर्भात पाठपुरावा करून या शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत मिळावी यासाठी प्रयत्न सुरु केले होते.

सोयाबीन पिकावर मुळकूज, खोडकूज, व रायझेक्टानिया एरीयल ब्लाईट या रोगांचा प्रादुर्भाव आढळून आला. त्याची तातडीने दखल घेत प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत तातडीने मदत देण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनास दिले. त्या अनुषंगाने प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत मध्य हंगामातील प्रतिकूल परिस्थिती या जोखिमेच्या बाबींतर्गत जिल्ह्यातील सोयाबीन पिकाचे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विमा सरंक्षणाच्या 25 % रक्कम तातडीने देण्याबाबतची अधिसुचना निर्गमित करण्यात आली व तशा सुचना ओरीयंटल ईन्शूरंस कंपनीस देण्यात आल्या. मा. पालकमंत्र्यांनी सोयाबीन पिकाचे झालेल्या नुकसानीची कारणमीमांसा तसेच भविष्यातील व उपाययोजना आखण्यासाठी डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठांचे शास्त्रज्ञाची चमू पाचारण करून वस्तूस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याबाबत सुचित केले. त्या अनुषंगाने डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठांचे शास्त्रज्ञांनी संयुक्त सर्व्हेक्षण करून शासनास अहवाल सादर केला. जिल्हयात पावसाची सुरुवात 22 जून पासून झाली असल्याने हंगामातील पेरण्या उशिराने म्हणजेच जूनच्या शेवटच्या आठवडयात सुरु झाल्या . जून महिन्यात सरासरीच्या 47.9 टक्के, जुलै महिन्यात सरासरीच्या 153.8 टक्के, ऑगस्ट महिन्यात सरासरीच्या 52 टक्के व सप्टेंबर 2023 महिन्यात सरासरीच्या 113.6 टक्के, अशाप्रकारे अनियमीत स्वरुपाचा पाऊस पडलेला आहे. पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेत शेकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेणेबाबत मुख्यमंत्री श्री. एकनाथजी शिंदे तथा कृषि मंत्री धनंजय मुंडे यांना पत्राद्वारे विनंती केली होती. त्यामूळे चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यातील सोयाबीन पिकाचे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतावर पंचनामे होवून दिलासा मिळणार आहे.

# बनावट दुधाची विक्री; प्रशासनाची धाड, मोठा साठा पकडला

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** अन्न आणि औषध प्रशासन आणि नाशिक ग्रामीण पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने निफाड तालुक्यात बोकडदरे शिवारातील अतुल वसंतराव कातकाडे याच्या घरात बनावट दूध बनविण्यासाठी लागणारी सामुग्री आणि बनावट दुधाचा ४८ हजार १६४ रुपयांचा साठा जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई मंगळवार (१० ऑक्टो) रोजी संयुक्तरित्या करण्यात आली. अन्न औषध प्रशासनाला मिळालेल्या माहितीच्या आधारे अतुल वसंतराव कातकाडे यांच्या बोकडदरे येथील निवासस्थानी तपासणी केली असता एक व्यक्ती प्लॅस्टिक कॅनमध्ये काहीतरी पदार्थ मिसळत असल्याचे आढळून आले. त्यानुसार या परिसराची झाडाझडती घेतली. डेअरी परमीट पावडर १८ किलो, व्होल मिल्क पावडर ३४ किलो, तेलसदृश पदार्थ १७० लीटर आणि वरील पदार्थांची भेसळ करून बनविलेले ४२० लीटर दुधाचा साठा तयार केल्याचे आढळून आले. अन्न सुरक्षा अधिकारी उमेश सुर्यवंशी यांनी विश्लेषणासाठी नमुना घेऊन उर्वरित साठा डेअरी परमीट पावडर १६ किलो (किंमत २ हजार २४० रूपये), व्होल मिल्क पावडर ३२ किलो (किंमत ७ हजार ६८० रूपये), तेलसदृश पदार्थ १६८ लिटर (किंमत २५ हजार ७०४ रूपये), भेसळयुक्त गाय दूध ४१८ लीटर (किंमत रूपये १२ हजार ५४०) असा ४८ हजार १६४ रूपये किमतीचा साठा जप्त केला. भेसळयुक्त पदार्थांपैकी दूध पावडर सिन्नर येथील हेमंत पवार आणि तेल सदृश पदार्थ मोहन आरोटे यांनी पुरवठा केला असल्याचे आढळून आले आहे. ही कारवाई उमेश सुर्यवंशी आणि योगेश देशमुख यांनी विभागाचे सह आयुक्त संजय नारागुडे तसेच सहाय्यक आयुक्त उदय लोहोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली.

# वेकोलि प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न मार्गी

## महिनाभरात अहवाल सादर करा : हंसराज अहीर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** यवतमाळ- चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील मागासवर्गीय व अन्य प्रवर्गातील वेकोलि प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या वतीने दि. 7 ऑक्टोंबर 2023 रोजी नागपूर येथील रवीभवनात जनसुनावणी घेण्यात आली. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या जनसुनावणीत उपस्थित वेकोलिच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना विविध प्रलंबित प्रश्नांवर निर्धारीत कालावधीत निर्णय घेण्याचे निर्देश एनसीबीसी अध्यक्ष अहीर यांनी दिले. या जनसुनावणीस वेकोलिचे अध्यक्ष तथा प्रबंध निदेशक मनोज कुमार, वेकोलिचे तांत्रिक निदेशक, कार्मीक निदेशक, चंद्रपूर, बल्लारपूर, वणी, वणीनॉर्थ, माजरी क्षेत्राचे मुख्य महाप्रबंधक, नियोजन अधिकारी माजी आमदारद्वय ॲड. संजय धोटे, सुदर्शन निमकर, वणीचे भाजपा जिल्हाध्यक्ष तारेंद्र बोर्डे, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजु घरोटे, धनंजय पिंपळशेंडे, ॲड. प्रशांत घरोटे, अंकुश आगलावे, पवन एकरे, सचिन शेंडे, बालनाथ वडस्कर, प्रशांत डाखरे, पुनम तिवारी यांचेसह दोन्ही जिल्ह्यातील शेकडो प्रकल्पग्रस्त बांधव उपस्थित होते. बल्लारपूर क्षेत्रातील चिंचोली प्रकरणात येत्या महिनाभरात निर्णय घेण्याचे, माजरी क्षेत्रातील पाटाळा वेकोलि, महसुल व अन्य विभागाच्या अधिकारी व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत स्थळ निरिक्षण करून 2 महिन्यात आयोगाला अहवाल सादर करण्याची तसेच धोपटाळा येथील 84 एकड जमिन ओबी डंप व नाल्यामुळे प्रभावित होत असल्याने स्थळ निरिक्षण करून 15 दिवसात आयोगाला अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. या जनसुनावणीत



माजरी क्षेत्रातील पाटाळा येथील उर्वरीत 20 टक्के जमिनीचे अधिग्रहण व पुनर्वसन, मौजा सास्ती येथील अधिग्रहणवंचित 84 एकर जमिनीचे अधिग्रहण, पोवनी येथील उर्वरीत 10 टक्के जमिनीचे अधिग्रहण तसेच पुनर्वसन विषयक प्रश्नांबाबत या जनसुनावणीत सकारात्मक चर्चा झाली या वेळी अध्यक्षांनी याप्रश्नी तातडीने कार्यवाहीच्या सुचना केल्या . पोवनीवासीय शेतकऱ्यांना मशागत करणे शक्य नसल्याने सीएमपीडीआयद्वारा सर्व्हेक्षण करून अधिग्रहणाची कार्यवाही करावी तसेच गाडेगाव विरूर येथील उर्वरीत 17 टक्के जमिनीचे अधिग्रहण विषयक प्रकल्प अहवालास त्वरीत मंजुरीकरीता कार्यालयीन स्तरावर कार्यवाही करण्याचे निर्देशही एनसीबीसी अध्यक्षांनी दिले .
5 वर्षांची कालमर्यादा संपलेले सर्व नोकरीविषयक प्रस्ताव बोर्ड मंजुरीकरीता महिनाभरात पाठविण्यात येतील, तसेच बल्लारपूर क्षेत्रातील गोवरी सेंट्रल परियोजनेच्या प्रकल्प अहवालास (पीआर) मंजुरी देवून खरेदीदार निश्चित करीत सेक्शन – 4 करीता सादर करण्यात येईल, अशी माहिती या सुनावणीत मुख्यालय प्रबंधनाकडून देण्यात आली .

एनसीबीसी अध्यक्ष हंसराज अहीर यांनी बल्लारपूर क्षेत्रातील चिंचोली रिकॉस्ट परियोजना, चंद्रपूर क्षेत्रातील भटाळी, माजरी क्षेत्रातील पाटाळा, एकोणा वणीनॉर्थ क्षेत्रातील मुगोली, पिंपळगांव वणीक्षेत्रातील घुगूस यासह अनेक प्रलंबित प्रश्नांच्या निपटाऱ्याकरीता वेकोलिच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांना निर्धारीत अवधीमध्ये कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या सर्व वेकोलि क्षेत्रामध्ये बहुसंख्य प्रकल्पग्रस्त हे मागासवर्गीय प्रवर्गातील असल्याने वर्षानूवर्षे त्यांना न्याय अधिकारांपासून वंचित ठेवण्याची वेकोलि अधिकाऱ्यांची कृती घटनाबाह्य असुन हा अन्याय त्वरीत दूर करण्याचे स्पष्ट निर्देश अहीर यांनी या सुनावणीमध्ये वेकोलि अधिकाऱ्यांना दिले. या जनसुनावणीत बल्लारपूर क्षेत्रातील चिंचोली येथील शेतकऱ्यांच्या जमिनी 2015 मध्ये अधिग्रहीत करूनही या प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या व मोबदला दिला नाही. त्यामुळे डीनोटीफीकेशन करीता पाठविण्यात आलेला प्रस्ताव रद्द करून संपादीत जमिनीचे प्रतिएकरी भावाने करारनामे करून आर्थिक मोबदला व नोकरी देण्याबाबत यासंदर्भात महिनाभरात निर्णय घेण्याचे निर्देश दिले. या प्रकरणात काही शेतकऱ्यांनी जनहित याचिका दाखल केल्याची माहिती असुन त्यानुसार प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांचा विषय तपासून तातडीने निर्णय घेण्याची सुचना केली. माजरी क्षेत्रातील नागलोन युजी टु ओसी विस्तारीकरण योजनेतील प्रकल्पग्रस्तांशी ओलिताच्या दरासाठी करारनाम्याकरीता स्थळ पंचनामे करण्याचे तसेच वणी क्षेत्रातील मुंगोली विस्तारीकरण योजनेअंतर्गत आपसी समझौताधारक शेतकऱ्यांना आर्थिक मोबदला व नोकरी करीता वेकोलि प्रबंधन, जिल्हाप्रशासन व प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या सयुक्त बैठकीत निर्णय घेण्याचे तसेच तुकडेबंदी कायद्याच्या अवहेलनेमुळे प्रलंबित नोकरी प्रस्तावांचा विषय आणि लक्ष्मीमुक्ती जी.आर अंतर्गत झालेल्या जमिनीचे फेरफार याबाबत सुध्दा संयुक्त बैठकीत निर्णय घेण्याचे निर्देशही हंसराज अहीर यांनी यावेळी दिले.

# सुप्रिया सुळेंनी पंकजा मुंडेंना दिली मदतीची हाक

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** भाजपा नेत्या पंकजा मुंडे मागील काही काळापासून पक्षात नाराज असल्याची चर्चा आहे. जीएसटी विभागाने त्यांच्या कारखान्यावर कारवाई केली होती. यानंतर पंकजा मुंडेंनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत आर्थिक अडचणींबद्दल खुलासा केला होता. या सर्व घडामोडींवरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी भाजवर टीकास्त्र सोडले आहे. भाजपा 'बेटी पढाओ, बेटी बचाओ' असा नारा देते, पण त्यांनी आधी मुंडे भगिनींना न्याय द्यावा, अशा आशयाची टिप्पणी केली आहे. त्या अहमदनगर येथील कार्यक्रमात बोलत होत्या. ऊसतोड कामगारांच्या प्रश्नावर सुळे म्हणाल्या की, पंकजा मुंडे शरद पवारांना भेटायला यायच्या. निवडणुकीच्या वेळी आम्ही टोकाची भूमिका घ्यायचो. एकमेकांविरुद्ध लढायचो. पण जेव्हा ऊसतोड कामगारांचा विषय असेल, तेव्हा आम्ही नेहमी पंकजा मुंडेंचा मान-सन्मान केला आहे. आजही करू आणि उद्याही करू. कारण त्या एक लढाऊ महिला आहेत. मला खरंच त्या मुलीबद्दल प्रेम वाटते. याचे कारण म्हणजे, ती एकटी लढतेय, तिचे वडील हयात नाहीयेत. तिच्या घरात कुठलाही कर्ता पुरुष नाहीये.


प्रवेश देणे चालू आहे.

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल,मुंबई
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ,मुंबई मान्यता प्राप्त व संलग्नित
गीताई सेवाभावी शिक्षण संस्था संचलित

समर्थ GNM नर्सिंग स्कूल
शंकुतला ANM नर्सिंग स्कूल

प्रवेश देणे चालू आहे.

| उपक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता | कालावधी | पात्रता | वय |
|---|---|---|---|---|
| GNM | 40 | 3 वर्ष | 12 वी पास (विज्ञान,कला,वाणिज्य) | 18 ते 34 वर्ष |
| ANM | 20 | 2 वर्ष | 12 वी पास (विज्ञान,कला,वाणिज्य) | 18 ते 34 वर्ष |

वैशिष्ट्ये
› सुसज्ज इमारत
› तज्ञ प्राध्यापक वृंद
› मुलींसाठी स्वतंत्र हॉस्टेलची व्यवस्था
› मागासवर्गीय मुलींसाठी स्कॉलरशीप लागु आहे.(SC,ST)
› नौकरीची 100% गॅरंटी
› प्रक्टिकलसाठी 100 खाटाच्या हॉस्पिटलशी संलग्न

मोफत प्रवेश...!

नांदेड रोड, मुदखेड ता. मुदखेड जि.नांदेड

Mob. 8766028429, 9922036771, 9595614111

# मिया खलिफाची हकालपट्टी

आधुनिक केसरी

इस्रायल आणि पॅलेस्टाईन यांच्या संघर्षात मिया खलिफाने उडी घेणे आणि त्यातही पॅलेस्टाईनची बाजू घेणे मिया खलिफाला भोवले आहे. एका महत्त्वाच्या डीलमधून मिया खलिफाची हकालपट्टी करण्यात आली आहे. इस्रायल गाझा युद्धाबाबत मिया खलिफाने X या सोशल मीडिया हँडलवर काही पोस्ट केल्या होत्या. त्या खटकल्याने आता मियाची एका महत्त्वाच्या डीलमधून हकालपट्टी करण्यात आली आहे. कॅनेडियन ब्रॉडकास्टर आणि रेडिओ होस्ट टॉड शापिरोसह तिची एक बिझनेस डील होणार होती. ज्यातून तिला हाकलण्यात आले आहे. शापिरोनेही पोस्ट करत ही माहिती दिली आहे. शापिरो आणि मिया खलिफा यांच्यातली बिझनेस डील जवळपास फायनल झाली होती. मात्र मियाने एक्सवर ज्या पोस्ट केल्या त्यानंतर तिला या डीलमधून हाकलण्यात आलं आहे. शापिरोने एक्सवर पोस्ट करत म्हटले आहे की मिया खलिफाने केलेल्या पोस्ट भयंकर आहेत, घृणास्पद आहेत. तिने पुढे जाऊन जरा स्वतःला माणूस होता येईल का ते बघावे. इस्रायलमध्ये लोकांना ठार केले जाते आहे, ओलीस ठेवले जाते आहे, महिलांवर बलात्कार केले जात आहेत. अशा सगळ्या गोष्टी समोर दिसत असताना मिया खलिफा अशा पोस्ट कशा काय करु शकते? असा सवाल शापिरोने विचारला आहे आणि तातडीचा निर्णय घेत तिची डीलमधून हकालपट्टी केली आहे. शापिरोने डील रद्द केल्यानंतर आता मिया खलिफाचेही म्हणणे समोर आले आहे. तिने एक्सवर आपले म्हणणे मांडत हे म्हटले आहे की, मी पॅलेस्टाईनचे समर्थन केल्यानंतरच मला हे माहित होते की आता माझे बिझनेस डील रद्द होतील. अशा लोकांबरोबर मला डील करायचेच नाही असेही तिने म्हटले आहे. एवढेच नाही तर मी हिंसाचाराचे समर्थन करत नाहीच. मी पॅलेस्टाईनच्या स्वातंत्र्य सैनिकांसाठी त्या पोस्ट केल्या होत्या असेही तिने आता म्हटले आहे. मात्र पॅलेस्टाईनला पाठिंबा दिल्याने आता दुसऱ्याच दिवशी तिचं बिझनेस डील रद्द झाले आहे. मिया खलिफाने शापिरोलाही टोले लगावले आहेत. तिने म्हटले आहे माझे नाव परत घेण्याआधी स्वतःच्या छोट्याशया कंपनीची चिंता कर. मी आजही आणि यापुढेही लैंगिक छळ होणाऱ्यांच्या बाजूने उभी आहे. स्वतःच्या छोट्या प्रोजेक्टमध्ये मी गुंतवणूक करावी म्हणून भीक मागण्याआधी थोडा अभ्यास कर. माझ्याकडून अपेक्षा करणाऱ्यांना हे माहित नाही का की मी लेबनॉनची आहे. मी इस्रायलचे समर्थन करणे शक्यच नाही असेही मिया खलिफाने म्हटले आहे.

# चला एक लढा राष्ट्रहितासाठी



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**सध्या देशासह राज्यात अनेक आंदोलने सुरू आहेत. वेगवेगळ्या पक्षाचे, विचारधारेचे लोक परिवर्तन, बदल होण्यासाठी झटताना दिसत आहेत. परंतु जनकल्याण आणि राष्ट्रहीत यावर योग्य ती भुमिका कोणीच घेताना दिसत नाही. सत्ताधारी पक्षाला विरोध करणे हे विरोधी पक्षाचे नैतिक कर्तव्यच आहे पण जनकल्याण व राष्ट्रद्रोहाचे कृत्य थांबवणे ही जबाबदारी आहे. परंतु जबाबदारी विसरून केवळ राजकीय विरोध करून जनकल्याण साध्य होणार नाही आणि राष्ट्रहितही साध्य होणार नाही. देशामध्ये सामाजिक समस्यांचे थैमान निर्माण झाले झाले आहे. परंतु सामाजिक समस्येच्या मुळावर कोणीच बोलायला तयार नाही. उलट सध्य परिस्थिती ला महत्त्वाचे नसलेल्या मुद्द्यांना महत्त्व देऊन त्या मुद्यावर वेळ पैसा व श्रम खर्च करण्याचे काम या व्यवस्थेकडून होत आहे. मुळ समस्या आहेत त्या म्हणजे शिक्षण.**

शिक्षणाचे खाजगीकरण करण करून शिक्षणाचा बाजार मांडला. साठ हजारापेक्षा जास्त शाळा कंपनीकडे चालवण्यासाठी देण्याचा निर्माण झाला. ज्या शाळा सरकार चालवू शकत नाही त्या शाळा व्यवसाय करणाऱ्या कंपन्या कशा चालवणार? या गंभीर प्रश्नावर गांभीर्याने विचार झालाच नाही. कंपनी कडे शाळा गेल्यानंतर प्रचंड खर्चात वाढ होईल व सर्व सामान्य लोकांना शिक्षण परवडणार नाही ही सत्य परिस्थिती आहे. परंतु यावर कोणी ही बोलायला, एकत्र यायला तयार नाही. कमी पटसंख्येचे कारण दाखवून सरकारी शाळा कंपनीकडे दिल्या नंतर कंपणीच्या शाळेत पटसंख्या कशी वाढेल? किंवा शासकीय शाळेमध्ये पटसंख्या वाढविण्यासाठी सरकार काय प्रयत्न करत आहे? असा साधा प्रश्नही डोक्यात येऊ नये म्हणजे आपण गुलामीकडे वाटचाल करत खुप समोर गेलो आहोत. दुसरी सर्वात मोठी समस्या आहे ती म्हणजे रोजगार. सार्वजनिक संस्था, सार्वजनिक क्षेत्रात शासकीय नोकरी असते. ज्या मध्ये नोकरी, पगार याची शाश्वती असते. परंतु सार्वजनिक क्षेत्रातील संस्था सरकारने ने कंपनी च्या हवाली करून त्याचे खाजगीकरण केले. या खाजगीकरणाचा सर्वात मोठा परिणाम झाला तो नोकरीवर. शासकीय कायमस्वरूपी नोकरी समाप्त होऊन खाजगी नोकरी जेथे पगार व सेवेचे शाश्वती नाही अशी नोकरी निर्माण झाली. सरकार ला ज्या संस्था चालवता आल्या नाहीत त्या संस्था कंपनी कशा चालवणार? कंपण्यामध्ये नोकरी व पगाराची शाश्वती नसल्याने बेरोजगारीची टांगती तलवार मानेवर कायम राहणार. म्हणजे महागडे शिक्षण घ्यायचे आणि शिक्षण घेतल्यावर कायमस्वरूपी नोकरी नाही, पगाराची हमी नाही. मग सर्व माणूस मुलांना शिकवणार तरी कशाला? अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. शिक्षण, नोकरी व सार्वजनिक मालमत्तेचे खाजगीकरण यावर मजबूत पणे भुमिका कोणीच घेताना दिसत नाही. महागाई आणि आरोग्य सुविधेवर कोणीच बोलत नाही कारण धर्मांधता, आरक्षण, सामाजिक अन्याय हे मुद्दे एवढे ज्वलंत ठेवल्या जात आहेत की माणसाला महागाई आणि आरोग्य सुविधेचे भानच राहले नाही. दैनंदिन खाद्यपदार्थावर कर आकारून जेवन महाग करणारा देश जगातील एकमेव असेल. शालेय फी वाढवून पुस्तकावर कर आकारून सरकारने तर जागतिक विक्रमच केला आहे. महाराष्ट्रात शासकीय रुग्णालयातील रुग्णांचे मृत्यू हा चिंतेचा विषय होऊनही जे लोक धर्म धोक्यात आहे असे सांगून रस्त्यावर उतरून आवाज उठवतात ते लोक माणसाच्या मृत्यूवर गप्प बसतात हे बघून मानसाच्या मनातील संवेदनशीलता संपली कि काय हेच हेच समजत नाही. शासकीय रुग्णालयात औषधांची कमतरता आहे, प्रशिक्षीत डॉक्टरांची कमतरता, अपुर्ण वैद्यकीय सुविधा यामुळे मागील काही दिवसात अनेकांचे जिव गेले. गेलेले जीव सरकारसाठी आकडा असतो परंतु कुटुंबातील सदस्यांसाठी ते विश्व असते. कोणत्याही कुटुंबातील विश्व हिसकावून घेण्याचा कोणालाही कोणताही अधिकार नाही. शेकडो लोक औषधोपचारा अभावी व डॉक्टरांच्या कमतरतेमुळे मृत्यू मुखी पडूनही महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणतात प्रसार माध्यमे फसवा आवडा दाखवून दिशाभूल करत आहेत. असे बोलून उपमुख्यमंत्री जबाबदारी झटकून टाकतच नाहीत तर मृत्यू झालेल्या व्यक्तीबद्दल सात्वनही करत नाहीत. म्हणजे सरकार नेमके आहे तरी कोणाचे? गाय मारली म्हणून लोकांना मारायला तयार होणारे लोक लोक मारले जातात तेव्हा सरकारला बोलायला तयार होत नाही तेव्हा माणुसकी कोणाच्या तरी दावणीला बांधुन माणसे गुलाम झाले आहे हे सिद्ध होते. शासकीय रुग्णालयात औषधी नसणे, डॉक्टर नसने हे अत्यंत लाजीरवाणे आहे. विश्वगुरू होण्याचे स्वप्न बघण्या अगोदर आपल्याच लोकांच्या मुलभूत गरजा पुर्ण करणे अंत्यत आवश्यक असताना देशाचा खर्च सुविधेवर कमी आणि जाहीराती वर जास्त होत आहे. जाहीरात बाज सरकार लोकांच्या समस्या वाढवून जगात देशाचे कमकुवत करत आहे. देशातील वाढत्या समस्या आणि त्या समस्येचे निराकरण करण्या ऐवजी केवळ मोठमोठी भाषणे झाडून लोकांना मुर्ख बनवले जात आहे हे बाहेरच्या देशातील लोकांना कळत आहेत परंतु भारतीय भक्त लोकांना कळायला तयार नाही. सध्या आरक्षणाचा मुद्दा पेटत आहे. तसे बघितले तर निवडून जवळ येताना आरक्षणाचा मुद्दा बाहेर येणे हे नवीन नाही. आरक्षणाची कोणतीही कायदेशीर माहिती नसलेले लोकही केवळ जाती धर्माच्या नावाखाली एकत्र येतात. आरक्षणाची मागणी करतात पण संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल बोलणे टाळतात म्हणजे किती मोठा हा देशद्रोह? देशद्रोही लोकांना देशात वर उचलले जाते आणि समता बंधुता न्याय स्वातंत्र्य आणि संविधानाचा प्रसार प्रसार करणाऱ्यांना मारले जाते हा या देशाचा इतिहास आहे. धनगर समाज आरक्षणासाठी रस्त्यावर उतरण्याची भाषा करतो धनगरांना आरक्षण पाहिजे म्हणून बोलून दाखवतो. परंतु जेव्हा आरक्षणा बद्दल धनगर बांधवा सोबत चर्चा केली जाते तेव्हा बऱ्याच धनगर बांधवांना आरक्षणाची संकल्पना च माहिती नाही. तरीही मुद्दा उचलून धरला जातो. आपण महाराष्ट्रात बघितले तर धनगर समाजाला NT मध्ये साडेतीन टक्के आरक्षण लागु आहे. तरीही यांना आरक्षण नेमकं कुठे आणि कस पाहिजे हेच त्यांनाही माहिती नाही. मराठा आरक्षणाच्या आंदोलनाने संपूर्ण महाराष्ट्र दणाणत आहे. मराठा कुणबी एकच, मराठे हेच कुणबी आहेत, नाहीत हेच काही लोकांना माहिती नाही. तो भाग वेगळा असला तरी मराठा समाज लाखोंच्या संख्येने खुप दिवसापासून रस्त्यावर उतरत आहेत. आंदोलन करणे हा त्यांचा संविधानीक अधिकार आहे. परंतु आरक्षण लागु असलेल्या सर्व क्षेत्र संस्था खाजगी मध्ये गेल्या आहेत. वास्तवात आरक्षण शुन्य केले आहे. शुन्य केरेल्या आरक्षणासाठी लढवले जात आहे. परंतु आरक्षणाच्या संस्था आहेत त्या शासकीय संस्था सरकारने खाजगी कंपनीला विकुन टाकल्या पण गायीसाठी, आरक्षणासाठी रस्त्यावर उतरणारे लोक खाजगीकरणा विरोधात तेवढ्या ताकतीने रस्त्यावर उतरून विरोध करत नाहीत. याचाच अर्थ आजही आम्ही जनकल्याणासाठी व राष्ट्रहीतासाठी एकत्र येत नाही तर केवळ धर्म आणि जातीच्या आधारावर एकत्र येतो. निवडून जवळ येत आहे. सरकार कडून मराठा आरक्षणावर मलमपट्टी करून त्याची वेदना कमी केली जाईल परंतु त्याचा फायदा घेण्यासाठी सार्वजनिक संस्था, क्षेत्र तरी सरकारच्या मालकीची पाहिजे. आज शाळा, रेल्वे, हॉस्पिटल, पोलीस, सर्व शासकीय नोकरीचे खाजगीकरण सुरू असताना त्यावर दूर्लक्ष करणे म्हणजे आपण स्वतःला च गुलामी कडे नेल्यासारखे होय. आज देशातील मुख्य समस्या लक्षात घेऊन सर्वांनी माणसाच्या कल्याणासाठी लढा उभा करणे आवश्यक आहे. आज धर्म धोक्यात आहे असे गाजर दाखवून शिक्षण, रोजगार, आरोग्य धोक्यात घालून सरकारने प्रत्येक नागरिकांना कर्जबाजारी केले आहे. आज देशावरही कर्ज आहे आणि देशातील जनतेवरही कर्ज आहे. एवढी भयावह परिस्थिती होऊनही लोक जागृत झाले नाहीत तर गुलामी आलीच म्हणून समजा. आज लोकांचा ईव्हीएम वर विश्वास नाही. तरीही निवडनुक आयोग ईव्हीएम बंद करायला तयार नाही आणि सर्वोच्च न्यायालय चर्चा करायला तयार नाही. इव्हिएमच्या माध्यमातून लोकांचा मताधिकार शुन्य करून लोकशाही ची हत्या केली जात आहे. लोकांच्या मताची किंमत शुन्य केल्याने लोकांच्या मताची गरज राजकीय पक्षांना राहीली नाही म्हणून जनतेचे कोणतेही काम व्यवस्थित होत नाहीत. लोकांच्या मताची गरज नसल्याने लोकांच्या हिताच्या विरोधात ध्येय धोरणे आखले जातात परंतु देशातील जनता गप्प बसून स्वतः च्याच समस्या वाढवायला हातभार लावताना दिसत आहे. देशाची सामाजिक राजकीय आणि आर्थिक परिस्थिती खुप चिंताजनक असुन यामध्ये जनता पिळली जात आहे आणि राष्ट्रहीत धोक्यात येत आहे. म्हणून आता जाती धर्माच्या नावाखाली एकत्र होण्यापेक्षा जनतेच्या समस्या शिक्षण, आरोग्य, रोजगार, महागाई, इव्हिएमच्या, महिलांच्या समस्या, बेपत्ता महिलांचा मुद्दा, महिलांवर अन्याय अत्याचार असे असंख्य विषय आहेत ज्यासाठी आपण लढा उभा करून जनकल्याण व राष्ट्रहीत साध्य करू शकतो. जाती धर्माला बाजूला सारुन चला एक लढा राष्ट्रहितासाठी उभा करून देश व देशातील जनता वाचवू या..

# महानायकाचा वाढदिवस



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**११ ऑक्टोबर, हिंदी चित्रपट सृष्टीचा शहेनशहा, महानायक अमिताभ बच्चन यांचा वाढदिवस. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी उत्तरप्रदेश मधील अलाहाबाद येथे जन्मलेल्या अमिताभ यांच्या वडिलांचे (हरिवंशराय बच्चन) यांचे मूळ नाव श्रीवास्तव असे होते मात्र ते बच्चन या टोपण नावाने कविता लिहीत त्यामुळे अमिताभ यांनीही चित्रपट सृष्टीत आल्यावर बच्चन हे टोपण नाव आडनाव म्हणून वापरण्यास सर्वात केली. पुढे संपूर्ण कुटुंबाचेच बच्चन हे आडनाव व्यवहारात रुढ झाले. अमिताभ बच्चन यांचे शालेय शिक्षण ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे झाले. दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी घेतली. त्यानंतर काही काळ त्यांनी कोलकाता येथील एका कंपनीत काम केले पण तिथे त्यांचे मन रमले नाही.**

तेथून ते हिंदी चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी मुंबईत आले आणि चित्रपटात संधी शोधू लागले. अमिताभ बच्चन यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी या चित्रपटात संधी मिळाली. दुर्दैवाने हा चित्रपट चालला नाही. अमिताभ यांचाही म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. अमिताभ यांनी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला तेंव्हा देव आनंद, शशी कपूर, शम्मी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, राजेंद्र कुमार, धर्मेंद्र, जितेंद्र अशा देखण्या कलाकारांची चलती होती. या देखण्या नायकांपुढे अमिताभ तग धरतील का अशी साशंकता होती. त्यात त्यांचा पहिलाच चित्रपट जोरात आपटला मात्र त्यांनी हार मानली नाही. सलग सात चित्रपट आपटूनही ते डगमगले नाही.

१९७३ साली आलेल्या प्रकाश मेहरा यांच्या जंजिर या चित्रपटाने अमिताभ यांना खरा ब्रेक मिळवून दिला. या चित्रपटातील पोलीस इन्स्पेक्टरची त्यांची भूमिका खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यांची अँग्री यंग मॅन अशी जनमानसात प्रतिमा निर्माण झाली. प्रचलित समाज व्यवस्थेच्या विरोधात बंडखोरी व क्रोध व्यक्त करणाऱ्या युवकांचे प्रतिनिधित्व त्यांनी पडद्यावर साकारले त्यामुळेच त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना अपल्याशा वाटल्या. उंच शरीरयष्ट, बोलके डोळे, भारदस्त आवाज आणि अनोखी अभिनयशैली यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ते लवकरच सुपरस्टार पदावर पोहचले. दिग्दर्शक ऋषिकेश मुखर्जी यांच्या आनंद या चित्रपटात त्यांना सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. त्या वर्षीचा सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाला. नमक हराम या चित्रपटातील त्यांची भूमिकाही लक्षवेधक ठरली. ७० आणि ८० चे दशक त्यांनी अक्षरशः गाजवून सोडले. दिवार, शोले, अभिमान, कभी कभी, अमर अकबर अँथोनी,



त्रिशूल, मुक्कदर का सिकंदर, काला पत्थर, नसीब, डॉन, लावरीस, सिलसिला, नमक हलाल, कुली, शराबी, देशप्रेमी, शोले, खुद्दार, परवरिश, मर्द, गंगा जमुना सरस्वती, अजुबा, अग्निपथ, खाकी, मेजर साब, खुदा गवाह, हम, मोहब्बते, बागबान, ब्लॅक असे एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट त्यांनी दिले. त्यांनी आजवर २०० हुन अधिक चित्रपटात भुमीका केल्या. अमिताभ बच्चन यांच्या इतकी लोकप्रियता अजतायगत कोणत्याही अभिनेत्याला लाभलेली नाही. अमिताभ बच्चन हे त्या काळातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते होते. त्यांनी काही चित्रपटात पार्श्वगायनही केले. मिस्टर नटवरलाल चित्रपटातील पार्श्वगायनसाठी त्यांना फिल्मफेरचा पुरस्कारही मिळाला होता. १९८४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला मात्र हा प्रांत आपला नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणाला रामराम ठोकला. १९८२ साली कुली चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी अपघात होऊनही करोडो चाहत्यांच्या आशीर्वादाने अमिताभ पुन्हा एकदा उभे राहिले.

१९९६ साली अमिताभ बच्चन कॉर्पोरेशनने लिमीटेड ही कंपनी त्यांनी स्थापन केली. मात्र लवकरच त्यांना ती बंद करावी लागली. या दरम्यान त्यांना मोठे आर्थिक नुकसान करावे लागले. हे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी दूरचित्रवाणीवरील कौन बनेगा करोडपती या प्रश्नमंजुषेचे सूत्रसंचालन करण्यास सुरवात केली आणि आपल्या सदाबहार सूत्रसंचलनाने त्यांनी ही प्रश्न मंजुषाही यशस्वी केली. आजही ते या प्रश्न मंजुषेचे सूत्र संचलन करतात. आज ते वयाची 81 वर्ष पूर्ण करत असले तरी तरुणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आहे. त्यांच्यासारखा प्रतिभावान कलाकार युगातून एकदाच जन्माला येतो. त्यांचा सारखा कलाकार भारतातच नाही तर जगात झाला नाही आणि पुढेही होणार नाही. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतानाच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# डेंग्यूविषयी सावधगिरी बाळगा; मनपातर्फे कंटेनर सर्वे

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यु प्रतिरोधक मोहीम पुर्ण क्षमतेने राबविली जात असुन डेंग्युचा धोका टळला नसल्याने आवश्यक ती सावधगिरी बाळगण्याचे आवाहन मनपातर्फे करण्यात येत आहे.

डेंग्यु प्रतिरोध मोहीम यशस्वी होण्याच्या दृष्टीने मनपातर्फे घरोघरी डासोत्पत्ती स्थाने तपासणी मोहीम राबविण्यात येत असुन यात डासांची उगमस्थाने शोधुन नष्ट केली जात आहेत. घरातील कुठल्याही जागी अथवा भांडे सामानात डासांची उत्पत्ती होऊ नये याची काळजी घेतली जात आहे. मोहिमेअंतर्गत ब्रिडींग चेकर्सतर्फे शहरातील ८० हजार घरांची चारदा तपासणी पुर्ण करण्यात आली असुन आशा वर्करद्वारेही दोनदा तपासणी पुर्ण करण्यात आली आहे. आरोग्य विभागातर्फे शहरातील विविध बांधकामांच्या ठिकाणी आरोग्य शिबीर आयोजित करून जागृती करण्यात आली असुन घरोघरी सर्वेक्षणामध्ये जर डेंग्यु सदृश्य रुग्ण आढळला तर त्या कार्यक्षेत्रात १४ दिवस सातत्याने सर्वेक्षण करण्यात येऊन परिसरात कुणाला डेंग्युची लागण तर झाली नाही याची तपासणी करण्यात येते. लक्षणे आढळल्यास रक्त तपासणी करण्यात येते. स्वच्छता विभागामार्फत आठवड्यातुन एकदा शहरात प्रत्येक जागी धुरळणी व फवारणी करण्यात येत आहे. गप्पी मासे प्रजनन केंद्रांची निर्मिती करण्यात येऊन पाणी साचलेल्या जागी गप्पी मासे सोडण्यात आलेले आहेत.

डेंग्यु प्रतिरोध मोहीम यशस्वी होण्याच्या दृष्टीने १४५ शाळेंमध्ये स्टुडन्ट ॲक्टिव्हिटी कार्ड दिले गेले असुन याद्वारे मुख्याध्यापक,शिक्षक, शालेय विद्यार्थी व पर्यायाने सर्व घरी कीटकजन्य आजारांविषयी जनजागृती केली जात आहे. सदर मोहीम ८ ऑगस्ट ते ३० ऑक्टोबरपर्यंत राबविण्यात येत असुन विद्यार्थी पालकांच्या मदतीने घरी उत्पत्ती होऊ शकणाऱ्या डासांना आळा घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. आठवड्यातुन एक दिवस पालकांच्या मदतीने पाणी साठवलेली भांडी तपासणे, कुलर, फ्रिज, फिश पॉट, पाण्याची टाकी तपासणे, डासअळी आढळल्यास पालकांच्या मदतीने भांडे कोरडे करणे व कापडाने पुसुन घेणे इत्यादी कार्यांद्वारे डासोत्पत्ती स्थाने नष्ट करणे ही सर्व कार्ये पालकांच्या उपस्थितीतच केली जात आहेत.

डासांमुळे निर्माण होणारे रोग हे धोकादायक ठरू शकत असल्याने आवश्यक ती काळजी घेण्याचे तसेच मनपास सहकार्य करण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.



**डासांची उगमस्थाने :** पावसात मोकळे भूखंड, बंद घराची छते, चालु बांधकामाची ठिकाणे, घरी वापर नसलेली ठिकाणे, कूलर,टायर, फ्रिज, फिश पॉट, भंगारातील वस्तु, डबे, स्वच्छ परंतु अनेक दिवसांपासुन जमा असलेले पाणी इत्यादी ठिकाणे डासांची उगमस्थाने आहेत.

**डेंग्युची लक्षणे :** डासांमुळे पसरणाऱ्या आजारांमध्ये डेंग्यूताप व डेंग्यू रक्तस्त्रावी ताप हे मुख्य आजार आहेत. ताप येणे, अंगावर पुरळ येणे, डोळ्याच्या खोबणीमधे दुखणे, पाठदुखी, डोकेदुखी, स्नायूमध्ये वेदना, सांधेदुखी ही डेंग्यूची प्रमुख लक्षणे आहेत. वस्तुत: डेंग्यू हा सामान्य आजार आहे परंतु या रोगाबाबत माहिती नसल्याने किंवा अपुरी माहिती असल्याने काही वेळा तो जीवघेणा ठरू शकतो. म्हणून प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे.

**डेंग्यु टाळण्यास उपाययोजना :** डेंग्यु डास हा स्वच्छ व साचलेल्या पाण्यात आढळतो त्यामुळे आपल्या घराची तपासणी करावी . पाणी साठवण्याची भांडी कोरडी करणे, डासअळी आढळल्यास अबेट द्रावण टाकणे, पाणी साठा मोठा असले तर त्यात गप्पी मासे टाकणे आवश्यक आहे. गप्पी मासे पाण्यातील डासांची अंडी संपवितात ज्याने डासांचा प्रादुर्भाव कमी होतो. आठवड्यातून एक दिवस हा कोरडा दिवस पाळावा.



# धुळ्यातील खेळाडूंची राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत निवड

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा क्रीडा संकुल येथील परमवीर रायफल व पिस्तोल स्पोर्ट शूटिंग क्लब मधील खेळाडूंची नॅशनल रायफल असोसिएशन दिल्ली अंतर्गत दि. 15 नोव्हेंबर पासून सुरू होणाऱ्या 66 वी राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत निवड झाली आहे. यामध्ये भोपाळ येथे होणाऱ्या 10 मी.एअर पिस्तूल या प्रकारात कनिष्ठ गटात मानसी पंकज पाटील, दर्शना राजेंद्र गवते,मानसी प्रकाश पाटील, मानस पंकज पाटील, नित्या देसले व दिल्ली येथे होणाऱ्या 10मी एअर रायफल पिप साईट या प्रकारात वरिष्ठ गटात कल्याणी गुलाबराव माळी, कनिष्ठ गटात प्रेरणा प्रवीण पवार, हिमेश देवानंद ठाकूर, हर्ष प्रकाश पाटील, पुष्कर मनीष पवार यांची निवड झाली.

या खेळाडूंना क्लबचे पिस्तोल प्रशिक्षक विपीन सोनवणे रायफल प्रशिक्षक कपिल बागुल यांचे मार्गदर्शन लाभले सर्व खेळाडूंचे संस्थापक अध्यक्ष विशाल जोशी जिल्हा क्रीडा अधिकारी अविनाश टिळे क्रीडा अधिकारी एम के पाटील, रेखा पाटील क्रीडा प्रशिक्षक सिद्धार्थ कदम, चंद्रकांत कढरे कार्यालयतील योगेश देवरे, गौरव परदेशी, मदन गावित यांनी अभिनंदन केले व स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# 'होऊ दे चर्चा' या अभियानाला उदंड प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या बोल घेवड्या घोषणांचा पडदा फाश करण्यासाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने होऊ द्या चर्चा हा अभियान संपूर्ण महाराष्ट्रभर राबवला जात आहे, याचाच एक भाग म्हणून शिवसेना उरण शहराच्या वतीने मोरा, भवरा, मुस्लिम मोहला व शहर शाखा येथे रविवार दि. 8 ऑक्टोबर 2023 रोजी हा अभियान राबवण्यात आला.

यावेळी जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर, मा नगराध्यक्ष गणेश शिंदे, नगरसेविका अँड वर्षा पठारे, सोशल मीडियाचे समन्वयक नितीन ठाकूर यांनी केंद्र सरकारच्या व राज्य सरकारच्या या बोल घेवळ्या योजनांचा पडदा फाश केला, यामध्ये गॅसचे दर, पेट्रोल, डिझेलचे दर,महागाई, जीवनावश्यक वस्तूंचे, गगनाला भिडलेले दर, बेकारी, स्थानिक आमदारांचे सर्व पातळीवरील अपयश, नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि बा पाटील यांच्या नामांतराचा प्रश्न व यांनी केलेल्या फसव्या घोषणांचा आपल्या मनोगतातून पडदा फाश केला.

सदर वेळी उरण शहरप्रमुख विनोद म्हात्रे, संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, शहर संघटक दिलीप रहालकर, उपशहरप्रमुख कैलास पाटील, अरविंद पाटील, नगरसेवक अतुल ठाकूर, निलेश भोईर, माजी शहर संघटक महेश वर्तक, महिला आघाडीच्या तालुका संघटिका (शहर) श्रीमती सुजाता गायकवाड, संपर्क संघटिका श्रीमती वंदना पवार, शहर संघटिका मेघा मेस्त्री, उपतालुका संघटिका सौ मनीषा ठाकूर, उपशहर संघटिका रझिया शेख, माधुरी चव्हाण, अल्पसंख्यांक सेल शहराध्यक्ष मुमताज भाटकर, तालुकाध्यक्ष हुसेना शेख, विभागप्रमुख अश्विन गवस, ग्राहक संरक्षण कक्षेचे शहर संघटक संदीप जाधव, शाखाप्रमुख विकी म्हात्रे, राकेश कोळी, अजय म्हात्रे, इस्माईल शेख, कफील फसाटे, फतेह खान, सहीम शेख, शाहरुख गडी, प्रदीप शेळके, संतोष पाटील, रुपेंद्र गुडेकर, दर्शन जळगावकर, संदेश पाटील, हेमंत कोळी, प्रशांत कोळी, नंदू कोळी, माळी, सर्व शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख, गटप्रमुख, बूथप्रमुख, युवासेना पदाधिकारी, व शिवसैनिक उपस्थित होते.

# ज्येष्ठ कामगार नेते श्याम म्हात्रे यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** दिवगंत कामगार नेते शाम म्हात्रे यांच्या जयंतीनिमित्त पनवेलमधील आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आम्ही मराठी या पोवाडाचे कार्यक्रम ठेवण्यात आले होते. पोवाडा कार्यक्रमातून शिवशाहीर रायगड भूषण वैभव घरत यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज ते लोकनेते दि. बा. पाटील व नंतर कामगार नेते शाम म्हात्रे यांच्या विचार व कार्याची माहीती आपल्या पोवाडातून सर्वांना दिली.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शाम म्हात्रे साहेबांचे विचार व कार्य या बद्दल आपले मनोगत व्यक्त करून शब्द रूपाने त्यांना आदरांजली वाहिली.




महाराष्ट्र Business Katta













# श्राद्ध, श्रद्धा अन् अंधश्रद्धा

आधुनिक केसरी

**सध्या पितृपक्ष सुरू आहे. आपले पूर्वज या काळात आपल्याकडे येत असतात, त्याची पूजा अर्चना करायची, त्यांना जेवू घालायचे असा प्रघात आहे. यावर्षी पितृ पक्ष 29 सप्टेंबर 2023 पासून सुरू झाला असून तो 14 ऑक्टोबरला संपेल. पितृ पक्षाच्या काळात पितरांच्या आत्म्याच्या शांतीसाठी श्राद्ध केले जाते. हिंदू धर्मात श्राद्धाला विशेष महत्त्व आहे. श्राद्ध म्हणजे भक्तीभावाने केलेला विधी, ज्यामुळे पितरांना समाधान मिळते. परंतु शास्त्रांमध्ये असे अनेक नियम सांगितले आहेत, ज्यांचे पालन पितृ पक्षाच्या काळात करणे आवश्यक आहे असे सांगितल्या जाते.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080



पितृपक्षात नवीन वस्तू खरेदी करू नये, वाहन -घर घेऊ नये असे म्हटल्या जाते. पितृ पक्षातील विधी व्यवस्थित न केल्यास पूर्वज नाराज होतो व आपल्या मुलांमध्ये पितृदोष निर्माण होतो.त्यामुळे मुलांची तब्येत बिघडणे,हाताला यश न येणे ,घरात चैतन्य नसणे असे अनुभव येत असल्याचा अनेकांचा समज आहे. या काळात कुठलेही शुभकार्य करू नये असे देखील म्हटल्या जाते. वास्तविक ह्या प्रथा का निर्माण झाल्या आणि त्याचा विपर्यास कसा होत गेला हे समजून घेणे गरजेचे आहे.

या काळात पूर्वजांच्या नावाने पक्षांसाठी खायला मिळावे, पशुपक्षी जगले पाहिजे. ह्या सृष्टीसाठी ती आवश्यक बाब आहे आणि शेतातील पिके देखील बहरली पाहिजे म्हणून शेतकरी पाखरांपासून आपल्या पिकांचे रक्षण करत असतो. त्या पाखरांसाठी अन्न बाहेर ठेवून त्यांना जोपासण्यासाठी- जगविण्यासाठी  हे सगळं केल्या जात असावं असं मला वाटतं,आणि ते खरं असावं. नंतर त्याला कर्मकांड जोडल्या गेले आणि एकदा का कर्मकांड जोडल्या गेले की,त्याला अनुसरून  नियम लावल्या गेले आणि त्यातून अंधश्रद्धा वाढविण्याचे काम केल्या गेले. अलीकडच्या काळात विभक्त कुटुंब पद्धती असल्याने नात्यानात्यात दुरावा निर्माण झाला आहे. एक मुलगा एका ठिकाणी तर दुसरा दुसऱ्या ठिकाणी पितर घालतो. प्रभुरामचंद्र यांनी राजा दशरथाचे पिंड लोणार येथे घातले असल्याचा उल्लेख आहे. याचा अर्थ तेव्हापासून पिंडदान,ही पद्धत होती असे म्हणावे लागेल.

परंतु त्यासोबतच एक गोष्ट लक्षात घेणे देखील गरजेचे आहे.वडील राजा दशरथाच्या एका शब्दावर प्रभू श्रीराम यांनी अवघे राज्य सोडून वनवास पत्करला होता. १४ वर्षाचा वनवास जन्मदात्याला किंवा ज्या सावत्र आईमुळे त्यांना वनवास भोगावा लागला त्या आईला देखील त्यांनी दोष न देता वनवास भोगला.

आज आपण आपल्या आई वडिलांची सेवा त्यांच्या हयातीत कशी केली..? त्यांचे म्हातारपण आपण कसे केले.त्यांना मानसिक, प्रेमाचा आधार कसा दिला हे स्वताःशी तपासणे गरजेचे आहे.आपल्याला लहानाचे मोठे करणाऱ्या व घडविणाऱ्या आपल्या आईबाबांविषयी आपण आपले कर्तव्य पार पाडले की नाही ..? याचा विचार करणे गरजेचे आहे. आणि जन्मदात्यांची जिवंतपणी सेवा केली असेल तर पित्र घातले काय अन नाही घातले काय त्याला फारसे महत्व उरत नाही.

आई वडिलांचे स्मरण या निमित्ताने होण्याऐवजी ते श्वासागणिक व्हायला हवे तेव्हाच कुठे ते खऱ्या अर्थाने तृप्तीचा ढेकर देतील असे मला वाटते.

# आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारताच्या कामगिरीने आशा उंचावल्या

आधुनिक केसरी

आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारतीय खेळाडूंच्या चमकदार कामगिरीमुळे देशवासीयांचा ऊर अभिमानाने भरून आला आहे. असं म्हटलं जातं की नशीब शूरांना साथ देतं. या म्हणीचा उलटा अर्थदेखील तितकाच खरा आहे.  म्हणजे भ्याडांच्या मागे दुर्दैव लागतं. आपलं सुदैव असं की, चीनच्या भूमीवर आपल्या खेळाडूंनी कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता आणि आपल्या प्रतिस्पर्ध्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालत पदकांची कमाई केली. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत पहिल्यांदाच आमच्या खेळाडूंनी 107 पदके जिंकून सुवर्ण इतिहास रचला. यापूर्वी 2018 मध्ये इंडोनेशियामध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने सर्वाधिक 70 पदके जिंकली होती. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या ७२ वर्षांच्या इतिहासात पदकांचे शतक ही भारतासाठी ऐतिहासिक कामगिरी आहे. 'खेलो इंडिया' मोहिमेचे परिणाम आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये दिसू लागले आहेत, हेही या यशावरून सूचित होते.भारत हा सध्या जगात फक्त क्रिकेटसाठी ओळखला जातो. इतर खेळांमध्येही भारत जगावर वर्चस्व गाजवू शकतो हे या वेळी आशियाई खेळांनी दाखवून दिले. भारतीय पुरुषांबरोबरच महिलाही या क्षेत्रात अप्रतिम कामगिरी करत आहेत, हेही उल्लेखनीय आहे. महिला कबड्डी संघाने सुवर्ण जिंकून आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या खात्यात ऐतिहासिक 100 वे पदक जमा केले.भालाफेक, लांब पल्ल्याची शर्यत, तलवारबाजी, तिरंदाजी, नेमबाजी, टेबल टेनिस इत्यादींमध्येही महिलांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे या ऐतिहासिक कामगिरीमध्ये ग्रामीण भागातून पुढे आलेल्या महिलांचाही समावेश आहे. उदाहरणार्थ, अनु राणी ही गावातल्या शेतात ऊसाला भाला समजून फेकायची, तर पारुल चौधरी ही खेळाडू गावातील कच्च्या रस्त्यावर धावण्याचा सराव करायची. दोघांच्या साधनेचे सार्थक झाले. साहजिकच, भारतातील शहरांबरोबरच गावांमध्येही क्रीडा प्रतिभेची कमतरता नाही, हे अधोरेखित झाले. प्रेरणा, प्रोत्साहन आणि प्रशिक्षण अशा कलागुणांना वाव देऊ शकतात. आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंच्या कामगिरीने पुढील वर्षी फ्रान्समध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेत भारतासाठी आशेचे नवे दरवाजे उघडले आहेत. ऑलिम्पिकमधील भारताच्या पदकांची संख्या सातच्या पुढे वाढलेली नाही. आता येणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये आपण पदकांचा दुहेरी आकडा गाठू शकतो, अशी आशा बाळगायला हरकत नाही. ज्याप्रमाणे प्रवाशांना अवकाशात पाठवण्यापूर्वी नासाच्या प्रयोगशाळेत अवकाशाशी जुळवून घ्यायला लावले जाते, तशीच तयारी आणि सुविधा आपल्या क्रीडा संस्थांनी खेळाडूंना उपलब्ध करून दिल्या तर ते ऑलिम्पिकमध्येही चमकदार कामगिरी दाखवू शकतात.मैदान भारतीय असो की विदेशी, त्याचा आपल्या खेळाडूंच्या कामगिरीवर फारसा परिणाम होत नाही, हे चीनमध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेतून स्पष्ट झाले आहे. या खेळांमध्ये आमच्या खेळाडूंनी जो  उत्साह, धाडस आणि जोश दाखवला आहे, तो भविष्यातही कायम ठेवण्याची गरज आहे.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत जि. सांगली

# प्रसिद्धीच्या बाजारात बोलबाला मात्र अर्धसत्याचाच



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**प्रसिद्धीही क्षणभंगुर क्षणिक असते तर किर्ती हि अमर असते पण आपण किर्ती निर्माण होण्यासाठी प्रयत्न करत नाहीत तर क्षणिक क्षणभंगुर प्रसिद्धी मागे धावतोय हे खुप मोठ भयानक वास्तव आहे. सज्जनांची किर्ती वारया हाती माप असतं किर्ती हि अमर असते तर प्रसिद्धी हि क्षणिक असते . म्हणून आपण आपल्या जीवनात क्षणभंगुर प्रसिद्धी च्या मागे न धावता आपल्याला अजर अमर असणारी किर्ती निर्माण करता आली पाहिजे हिच जीवनातील सगळ्यात मोठी उपल्बधी असते . सुर्य हा किर्ती ने अमर आहे कोणी कितीही प्रयत्न केला तरी देखील गृहतारे सुर्य होऊ शकत नाहीत.आकाशातील सर्व तारकांना वाटलं कि आम्ही सुर्य आहोत.**

तर काय निष्पन्न होईल.लोक ऐकतील दुर्लक्ष करतील पण सुर्याला कधी मी सुर्य आहे हे सांगाव लागत नाही.छोटी छोटी धरण म्हटली आम्ही समुद्र आहोत .तर लोक ऐकतील सोडुन देतिल. पण समुद्राला कधी मी समुद्र आहे हे सांगावं लागतं नाही .तसंच सत्य जे असतं त्याला सांगावं लागतं नाही मी सत्य आहे .म्हणून ते आपोआप हिरया सारखं प्रकाशमान होत.सोशल मीडिया चा बाजार सध्या गरम आहे. सगळीकडे पोस्ट चा पाऊस आहे .पण यापैकी किती महिती हि वास्तव आहे.किंवा सत्य आहे. याचा विचार आपण कधी करतोय का ? प्रसिद्धी च्या बाजारात बहुतांश महिती हि अर्धसत्य आहे.तर काही माहिती खोडसाळपणाणे  तयार झालेली असते. समाजात काही घातक विघातक शक्ति कार्यरत असतात. आणि विघातक शक्ति वेगवेगळ्या उद्देशाने वेगवेगळी माहिती हेतु पुरस्कृत पेरत असतात .नवविचारवंत ह्या विघातक विचारांचे शिकार होतात .हि खुप गंभीर बाब आहे.महणुन समजिक विचारवंत यांनी खुप सज्जग आणि जागरूक राहण्याची आवश्यकता आहे . जेणेकरून समाजात चुकीची विचार पेरणी होणार नाही.पण असं न होता  बहुतांश लोक हे  इकडुन तिकडं आणि तिकडुन इकडं  अर्ध सत्य महिती शेअर करतात. हे अगदी कटु सत्य आहे.सत्य महिती पडताळणी करून शेअर करणं अगदी उत्तम पण प्रसिद्धी च्या नादात चुकीची माहिती अर्धसत्य महिती प्रसारीत होण म्हणजे आपण अ प्रत्यक्ष समाजाचं नुकसान करतोय . म्हणून कोणतीही माहिती जी अर्धसत्य आहे .ती प्रसिद्धी करण्या मध्ये घाई करण्याची आवश्यकता काय आहे. कशासाठी अपाण काय शेअर , करतोय याचा थांगपत्ता शेअर करणारांना नाही.मत कोणच लिहल कोणी त्याचा हेतू काय ,ते सत्य कि असत्य कि अर्धसत्य नेमकं काय माहित नाही.पण वाटलं म्हणून शेअर केलं .तर त्याचा उपयोग फार मोठा होऊ शकत नाही. सज्जनांची किर्ती वाऱ्या हाती माप खरंया आणि सत्य बाबींची प्रसिद्धी करावी लागत नाही. ती आपोआप होत असते . सत्य कधी प्रसिद्धी साठी अतुर नसतं . चांगलं कार्य चांगली माहिती योग्य उपदेश घरा घरात पोहचला पाहिजे.परंतु प्रसिद्धी च्या खेळात चुकीची माहिती अर्धसत्य महिती हि लोकांच्या पर्यंत गेली तर त्याचे दुष्परिणामही तितकेच भायनक असतात .म्हणून अर्धसत्य हे खुप घातक असतं .ज्यामुळे अनेकांच्या मत विचार प्रवाह बदलतात. समाजात चांगल्या वाईट प्रवृत्ती कार्यरत असतात.एखादया विषयांच्या अनुषंगाने कोण कोणत्या होतुने काय प्रसारीत करेल हे त्या व्यक्तीच्या शिवाय इतरांना किंचित यत्किंचितही शंका कुशंका वाटु शकत नाही.परंतु प्रत्येक विचार भुमिका मत याला दोन बाजू असतात.दोनही बाजु पडताळणी केल्यानंतर त्यातील सत्यता पडताळून झाल्यानंतर त्यापाठिमागे असणारा मुख्य हेतू समजल्यानंतर ते विचार पुढे पाठवण योग्य असतं पण सहसा आज काल चढाओढ लागली आहे .आपण दिवसभरात काय काय शेअर करतोय.पण त्याच सत्यता पडताळून झाल्यानंतर शेअर केले तर ते समाज हितकारक राहिल . अन्यथा त्याचा फार सकारात्मक परिणाम येणार नाही.अनेक वेगवेगळे विषय समाजात प्रसारीत होत असताना ते विचार ज्यांनी निर्माण केले. त्यांचा अभ्यास किती त्यांची इच्छा काय  , हेतु उदेश काय विवेक आणि भुमिका काय यावर त्या विचारांची सत्यता योग्यता अंवलबुन असते .कोणताही विचार कसा मांडायचा हा लिहणाराच्या अध्ययन शक्ति तर्क शक्ति सत्याची सचोटी वास्तविक भान अनेक या विषयांवर अंवलबुन असतं .एकाच विषयावर अनेक मत मतांतरे असतात काही लोक चांगल्या उद्देशाने एखाद्या विशिष्ट विषय मांडतात तर काही लोक चुकीच्या पद्धतीने विषय मांडतात .मांडलेला विषय चुक कि बरोबर हे वाचकांना समजलं पाहिजे.हे महत्वाचे पण सध्या  शेअर च्या  नादात अर्धसत्याचा बाजार जोरदार चालू आहे. जगतील प्रत्येक मुद्यावर विषयावर आपलं स्वतःचं अधिकृत मत विचार काय आहेत .आपली भूमिका काय आहे.आपल ज्ञान काय आहे . आणि आपण त्यावर आपलं मत आपले विचार आपल्या अधिकृत भुमिकेसह  व्यक्त करणं यावरून  आपली सामाजिक प्रतिम निश्चित होत असते . बाजारात फिरणारे अनेक विचार विषय हे त्या त्या भुमिकेतुन ज्यांनी जसे मांडले तसे फिरत असतात .किंवा एखादया  विषयावर आपलं स्वतः च मत नोंदवून तो विषय कसा बरोबर किंवा कसा चुक आहे हे मत व्यक्त करणं वेगळं आणि त्रयस्थ व्यक्तीच मत किंवा भुमिका आपल्याला पुर्ण समजण्या अगोदर प्रसिद्धी  मिळविण्यासाठी धडपड करण या मध्ये अंतर असतं . कार्य करत असताना त्या अनुषंगाने प्रसिद्धी मिळण हे नैसर्गिक आहे.परंतु प्रसिद्धी मिळविण्यासाठी सतत काही तरी शोधन हि वेगळी बाब आहे. सध्या बहुतांश लोक आपण लोकांपर्यत काय पोहचविले . यासाठी धडपड करताना दिसत आहेत.मग या धडपडीत अर्ध सत्य महिती लोकांच्या पर्यन्त पोहचुन फायदा होण्या ऐवजी दिर्घ कालिन नुकसान होत . म्हणून मोजकच थोडच पण सत्य आणि वास्तव महिती शेअर झाली पाहिजे. जेणेकरून प्रसिद्धी नाही मिळाली चालेल पण समाजाचं अहित होणार नाही.एवढी दक्षाता घेतली तरी पुरेसं आहे.

# आदर्श विद्यार्थी, संवेदनशील लेखक ते शोण्या कन्स्ट्रक्शन..अनोखा संघर्ष यात्री योगीराज पाटील

आधुनिक केसरी

**"आदर्श विद्यार्थी, संवेदनशील लेखक ते शोण्या कन्स्ट्रक्शन..एक अनोखा संघर्ष यात्री योगीराज पाटील." संघर्ष हा प्रत्येक मनुष्याच्या जीवनाचा अविभाज्य अंग असतो आणि संघर्षातूनच मनुष्याची प्रगती होत असते. मी आज ज्यांच्या वरती दोन शब्द आपल्यासमोर अभिव्यक्त होत आहे असे आमच्या मॉडेल कॉलेज घनसावंगी चे एक आदर्श विद्यार्थी श्री योगीराज पाटील यांच्या विषयी सांगावे तेवढे कमीच आहे एक विद्यार्थी म्हणून त्यांचा परिचय 2017 18 ला माझा परिचय भारतीय भाषा हिंदी क्लास, सांस्कृतिक कार्यक्रम आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग च्या माध्यमातून झाला.**

मंचावर वैचारिकपणे अभिव्यक्त होणे, सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेणे आणि महाविद्यालयातून सर्व विद्यार्थी गेल्यानंतर सुद्धा माझी साथ आणि संगत देत माझ्या कविता, गीत गजलींना दात देत माझ्या सृजनशील व्यक्तीत्त्वाच्या विकासातील साक्षीदार म्हणून मी त्यांचा विशेष उल्लेख करतो. आज त्यांचा जन्मदिवस आणि पाठीमागे वळून पाहता क्षणी मला आठवते की, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये स्वयं प्रेरणेने छोटी-मोठी कामे करत शिक्षण घेत आई-वडिलांच्या संस्कारात आणि पर्यायी गुरुजनावर अतोनात प्रेम करणारे व्यक्तिमत्व कोणत्याही विद्यार्थ्याला जर आपण विचारले की " तू भविष्यात काय होणार ? तर आयपीएस, आयएएस ,वकील डॉक्टर, इंजिनियर, तहसीलदार, उद्योजक, संशोधक, वैज्ञानिक अशी अनेक स्वप्ने आणि रंगवलेली असतात परंतु महाविद्यालयात अर्थशास्त्र विषय मुख्य विषय घेऊन अध्ययन करत असतानाच सांस्कृतिक वैचारिक आणि सामाजिक चळवळीशी ज्यांनी आपली नाळ घट्ट बांधून ठेवली आणि वैचारिक परिपूर्णतेकडे त्यांचे मार्गक्रमण



प्रा. कनूलाल विटोरे
9604527972

होत गेलं. समाजातील दुःख दारिद्र्य आणि स्वार्थ इतर विसंगती पाहून त्यांचे हृदय अत्यंत द्रवित होऊन त्या समस्येवर संवेदनशि तिने आपल्या लेखणीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विविध वर्तमानपत्रातून विविध अव्यक्त आणि दुर्लक्षित विषयांना न्याय दिला .त्यांच्यात दडलेला लेखक जेव्हा व्यक्त झाला तेव्हा एक शिक्षक म्हणून खूप आनंद झाला. हे करत असतानाच 2019 20 ला पदवीधर झाल्यानंतर आम्हाला अपेक्षा होती की योगीराज आता विद्यापीठात जाऊन एमए करतील, नेट सेटची तयारी करतील किंवा एमपीएससी ,यूपीएससी करून एक मोठा अधिकारी किंवा प्राध्यापक होणार कारण त्यांचे वक्तृत्व लेखन शैली आणि अभ्यास पाहून एकंदरीत विविध उपक्रमाच्या माध्यमातून समोर येत होते परंतु पदवीधर झाल्यानंतर त्यांनी आपला मोर्चा छोट्या उद्योगातून रोजगार देणाऱ्या( विहीर बांधकाम )या उद्योग व्यवसायाकडे वळविला या उद्योगाच्या माध्यमातून ग्रामीण शेतकऱ्यांच्या जुन्या विहिरी बांधून देऊन पावसाळ्यात त्यात गाळ साचू नये आणि व्यवस्थित बांधणी करून शेतकऱ्यांची सिंचन व्यवस्था चांगली व्हावी म्हणून कमी दरात काही बेरोजगार, भटक्या विमुक्त, आदिवासी समाजातील बेरोजगार युवकांना सोबत घेऊन "शोन्या कन्स्ट्रक्शन" ची स्थापना केली आणि बघता बघता जालना जिल्ह्यातील घनसावंगी, अंबड, परतुर ,जालना दूर दूर पर्यंत शेकडो विहिरी बांधण्याचा सपाटा त्यांनी लावला असं म्हणतात की माणसाची ओळख हे त्याचं काम असतं आणि योगीराज अत्यंत जोखीम भर हे काम प्राणप्रणाने मेहनतीने बांधावर शेतात जाऊन शेतकऱ्यांची स्थिती पाहून कमी दरात दरात मजबूत असं विहीर बांधण्याचं गेल्या पाच वर्षापासून करत आहेत. घरची परिस्थिती अत्यंत बेताची असल्यामुळे आणि यातून सुद्धा आपण रोजगार प्राप्त करू शकतो. इतरांना रोजगार देऊ शकतो .पर्यायी शेतकऱ्यांची सिंचन व्यवस्था आणि शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरती हास्य निर्माण करू शकतो हा उदात्त आदर्श हेतू डोळ्यासमोर ठेवून आज योगीराज पाटील पुढे मार्गक्रमण करत आहेत .आम्हाला हेवा वाटतो योगीराज सारखे आदर्श विद्यार्थी उद्योगाच्या माध्यमातून सेवाभाव मनात ठेवून वाटचाल करीत आहेत. याच्यापुढेही "समाजभान टीम" चे सदस्य म्हणून त्यांचे कार्य व खाण्याजोगे आहे. तसेच विविध सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विविध वैचारिक लेखक ,पत्रकार संपादक आणि वैचारिक मंडळींमध्ये त्यांची उठ बैठ असते. त्यामुळे हे सगळं करत असताना सुद्धा



रात्री त्यांचे वाचन सुरू असते .साहित्यिक कृती, कादंबऱ्या ,वैचारिक ललित लेख, आत्मकथात्मक ,साहित्य आणि जेव्हा केव्हा भेट होते तर वैचारिक विषयावरती चर्चा हमखास होते. ते नेहमी वैचारिक चळवळीतील कीर्तनकार भारूडकार, गायक, लेखक, कवी साहित्यकार ,डॉक्टर ,इंजिनिअर शिक्षक या सर्वांसोबत त्यांचे जिव्हाळ्याचे आणि आत्मीय संबंध आहेत .आज या भौतिकतेच्या युगात मनुष्य आत्मकंद्रीत झालेला आहे परंतु समाजाच सुद्धा काहीतरी म्हणून गोरगरिबांसाठी ते सदैव तत्पर असतात दवाखान्यामध्ये कोणी गरजवंत दिसल्यास त्याला आर्थिक मदत करण्याबरोबरच तसेच समाजातही काही दुर्बल घटकांना सोबत घेऊन आर्थिक समृद्ध प्रदान ते करीत आहेत .आजच्या युगात अशा संवेदनशील आदर्श व्यक्तिमत्त्वाची आवश्यकता समाजाला आहे .एक आदर्श विद्यार्थी, एक संवेदनशील लेखक आज "शोन्या कन्स्ट्रक्शन" चे संस्थापक अध्यक्ष या रूपाने त्यांनी घेतलेली गगनभरारी कौतुकास्पद, अभिमानास्पद आणि अभिनंदनिय आहे. ग्रामीण भागातील युवक सुद्धा वैचारिक सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगल्भ विचारांचा वारसा घेऊन आहे त्या परिस्थितीत समाजाला एक संदेश देऊ शकतो त्याचा आदर्श आणि ज्वलंत उदाहरण म्हणजे योगीराज पाटील होय. सलाम आपल्या संघर्षाला.. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपण शेतकऱ्यांचे मित्र म्हणून बांधावर जाऊन विहीर बांधण्याचे पवित्र कार्य करीत आहात. भटक्या विमुक्त समाजातील बेरोजगार युवकांना रोजगार देऊन प्रेरणादायी कार्य करीत आहात.. आपण पैसे किती कमवता याला महत्व नसून आपली भूमिका निर्मळ आणि प्रामाणिक आहे हे अत्यंत महत्त्वाचे आहे .हा अत्यंत जीवघेणा खडतर आणि जोखमीच काम करत असताना ही आपल्या चेहऱ्यावर आणि डोळ्यात एक वेगळी चमक दिसते.. आज शेतकऱ्यांना डुबलीकेट बियाणे देऊन कीटकनाशके विकून लोक लुटत आहेत. आपण शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याच्या कामी मोलाची योगदान देत आहात ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे. उच्चशिक्षित असूनही साधी राहणी आणि उच्च विचारसरणी जोपासण्याचे आपण कार्य करत आहात. छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार, महापुरुषांच्या विचारांनी प्रेरित होऊन ग्रामीण युवकसाठी एक नवा आदर्श आपण स्थापित केला आहे.. काम कोणत ही छोट आणि मोठ नसते त्याची लाज बाळगू नये आपण छाती ठोकपणे आणि पूर्ण समर्पणाने विहीर बांधण्याचे काम करत आहात.. आपल्या या खड तर आणि संघर्षपूर्ण जीवनाचा काही अशी मी साक्षीदार आहे.. प्रत्येकालाच नोकरी मिळेल असे नाही त्यामुळे युवकांनी उद्योग व्यवसायात सुद्धा आले पाहिजे.. हा संदेशही आपण दिलात. आपण संवेदनशील आहातच याची प्रचिती आपली लेखनी सदैव देते आहे .येणाऱ्या काळातही आपल्या" शोन्या कन्स्ट्रक्शन" च्या माध्यमातून मोठी मोठी विधायक कार्य होवो. ग्रामीण बेरोजगारी लोकांना आपल्या हातून रोजगार मिळो. आपल्या सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण होवो. या सदिच्छा व्यक्त करतो.. आपल्या जीवन संघर्षाविषयी इतकेच म्हणावे वाटते " बुझ जाए दिए पथ के सारे, तू अंदर की मशाल जलाए रख। वक्त तेरा ही था और तेरा ही रहेगा सदा। अंदर के तूफान को संभाल जरा ।हर सूखा,मुरझाया फूल, खिल-खिल मुस्कुराएगा , अंदर के तूफान को संभाले जरा ।बुझ जाए दिए पथ के सारे, तू अंदर की मशाल जलाए रख।"आपल्या अभिष्टचिंतन सोहळ्या प्रित्यर्थ आपणास हार्दिक हार्दिक शुभेच्छा देतो..

# लोकसमूह निर्मळ, निर्लेप आणि पवित्र करणारा लोकसंत



हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632

आधुनिक केसरी

**मित्रांनो दि.५/१०/२०२३ला माझ्या गावापासून ४ किलोमीटर अंतरावर विरूळ रोंघे येथे सत्यपाल महाराजांच्या प्रबोधनाचा जोरदार कार्यक्रम झाला. यावेळी महाराजांनी मला हेमंत भाऊ हे साहित्यिक आणि कवी असून माझे गुरु बंधू आहे असं म्हणत गाडगे महाराजांची प्रतिमा देऊन सत्कार केला. सत्यपाल महाराजांसारख्या महाराष्ट्रातील लोकसंताने मला साहित्यिक म्हणावं हाच माझ्यासाठी सर्वोत्कृष्ट पुरस्कार आहे. आपल्याला माहीतच आहे की महाराष्ट्र ही संतांची भूमी. अनेक संतांनी महाराष्ट्रातील जनसामान्यांसाठी आपला देह कणकण झिजवून इथली भूमी ही आपल्या असामान्य कर्तृत्वाने त्याग आणि समर्पणाने पावन केलेली आहे.**

आणि म्हणून महाराष्ट्राच्या या पावन पवित्र भूमीवर आजही संतांचा लोकांच्या मनावर जेवढा प्रभाव आहे तेवढा अन्यत्र कोणाचाही नाही. महापुरुषांपेक्षाही संतांचा अधिकार हा मोठा आहे. कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी तुकाराम महाराजांना आपल्या गुरुस्थानी मानलं आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे कबीरांना आपले मार्गदर्शक गुरु म्हणायचे संतांची ही अशी अजब केमिस्ट्री दुसरीकडे याच महाराष्ट्रामध्ये भोंदू साधूंचा चमत्कारी संतांचा सुळसुळाट हा पोट भरण्यासाठी जीवाचा प्रचंड आटापिटा करत असताना आपल्याला दिसत आहे. राष्ट्रसंतांनी म्हटल्याप्रमाणे "सुळसुळाट हा साधू जणांचा पोट भराया आला यथार्थ ना सांगे कुणी भ्याडपणा उरी आला आमच्या जागृत व्हा तरुणांनो" राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे वरील वचन हेच आपलं ब्रीद समजून गेल्या 56 वर्षापासून सत्यपाल महाराज मृत्यूच्या कसोटीवर या महाराष्ट्राचं यथार्थ प्रबोधन करत आहे. गांधींच्या शरीरयस्टी सारखा हा हळकुडा माणूस गेली 56 वर्ष महाराष्ट्राच्या मनात स्वतःला खिळवून ठेवतो. दिवसा गणित त्याची लोकप्रियता वाढतच जाते ही जादू कशाची राष्ट्रसंत म्हणतात "वालुका पात्री गंगाजळ ते पापनाशक मधुर निर्मळ" वाळूच्या पात्रामधील मधुर निर्मळ अर्थातच ते प्राणीमात्रांना तृप्त करणार पुण्यप्रद असल्यामुळे पापनाशक अशा गंगाजळाप्रमाणे सत्यपाल महाराजांचा जीवन प्रवाह इथल्या जनसमुहाला आळस झटकून उद्योगी बनवतो घातक रूढ अंधश्रद्धा बुवाबाजीच्या कचाट्यातून मुक्त करतो आणि म्हणूनच सत्यपाल महाराज नावाच्या या लोकसंताने महाराष्ट्राच्या संत परंपरेमध्ये मानाचा तुरा खोवलेला आहे. हे आपण नीटपणे लक्षात घेतलं पाहिजे.

बुद्ध आणि संतांनी शुद्ध व्यवहाराच्या पायावरच परमार्थाची इमारत उभी केली आहे आणि म्हणून आधी केले मग सांगितले याचं नियमाला महाराष्ट्राची संत परंपरा अधोरेखित करते. त्यामुळेच शेकडोवर्षानंतरही समाजमनावर या संतांचा प्रभाव आहे. सत्यपाल महाराजांची प्रत्येक कृती ही इथल्या तरुणांना चार पावलं प्रगतीच्या उन्नतीच्या आणि विशेष म्हणजे मानवतेच्या दिशेने घेऊन जाणारी आहे आणि जो सर्वसामान्य जनसमुहाला चार पाऊल मानवतेच्या दिशेने घेऊन जातो तोच खरा संत असतो ही विनोबांनी केलेली संतांची व्याख्या सत्यपाल महाराजांना तंतोतंत लागू पडते. मित्रांनो जेव्हा माझ्यासारखा सामान्य माणूस सत्यपाल महाराजांना लोकसंत अशी उपमा देतो तेव्हा अनेक लोकांना हे पचत नाही. हे सत्यपाल महाराजांच्या संदर्भातच घडतं असं नाही तर कुठल्याही खऱ्या संतांना ओळखण्यास जनसामान्य हे उशीर करतात ही वस्तुस्थिती आहे. तुकोबांनी म्हटल्याप्रमाणे "तुका म्हणे संत ओळखावे कैसे आपण व्हावे तैसे तेव्हा कळे" तर संत संगे संतपन हा ग्रामगीतेचा दाखला आहे आणि म्हणून महाराष्ट्रातील संतांच्या पावलावर पाऊल टाकतच सत्यपाल महाराज महाराष्ट्रातल्या लोकसमूहाला समृद्ध करत मार्गक्रमण करत आहे. प्रबोधनकार ठाकरेंचा वारसा चालवण्यासाठी जे दिव्य सत्यपाल महाराजांनी करून दाखवले त्यातूनच त्यांचं संतत्व प्रखर संघर्षातून तावून सलाखून निघालेलं आहे. तरुणांना आपल्या कीर्तनातून डोक्याच्या मालिश पासून तर बुटाच्या पोलीस पर्यंत कुठलाही उद्योग करा असा उद्योगाचा महामंत्र देणाऱ्या या लोकसंतामुळे लाखो तरुणांनी आपले स्वतःचे व्यवसाय उभे केले आहेत आणि आपल्या छोट्याशा





व्यवसायाचं उद्घाटन ते सत्यपाल महाराजांच्या हाताने करून घेण्यात धन्यता मानतात. महान व्यक्तीच्या लहान लहान गोष्टी आपल्याला महान बनवत असतात. सत्यपाल महाराज हे व्यसनाधीन आहे ते दारू पितात असा अपप्रचार करण्यात आला. हा विषय जेव्हा मी सत्यपाल महाराजांचा धामणगाव गढी येथील भव्य दिव्य अशा सामुदायिक विवाह सोहळ्याच्या पूर्वी होत असलेल्या त्यांच्या जाहीर कीर्तनात बोलून दाखविला तेव्हा सत्यपाल महाराजांनी स्टेजवर आपलं शर्ट काढलं आणि मोजा माझ्या हड्ड्या असश्रोत्यांना म्हणत हा सत्यपाल महाराज 56 वर्ष निव्वड गाडीमध्ये प्रवास करत असताना सततचं जागरण त्यामुळे अस्थिपंजर झालेला त्यांचा तो देह आणि 68 वर्षाच वय. या वयात सत्यपाल दारू पिला असता तर जिवंत राहिला असता का? असा प्रश्न त्यांनी लोकांना केला. पुढे मी दारू पीत नाही परंतु दारूच्या शिशांचे झाकणं गोळा करून ते किलोनं विकतो अशी माहिती आपल्या कीर्तनातून दिली. दारूच्या शिशांचे झाकणं विकणाऱ्या या आधुनिक संतांचे दर्शन महाराष्ट्राला झालं ते असं थेंबा थेंबाने जसा समुद्र बनतो तसंच संतांच्या जीवनातील त्यांच्या असामान्य कृतीतील कणाकणाने समाज हा असा समृद्ध होत असतो.

सत्यपाल महाराज इतकी गरिबी क्वचितच कोणाच्या नशिबी आली असेल. सत्यपाल महाराजांचा जेवढा अपमान समाजामध्ये झाला तेवढा अपमान क्वचितच कुणाचा झाला असेल. आज जरी या भारतातच नाही तर अमेरिकेसारख्या देशात त्यांचे कार्यक्रम होत असले तरी सुरुवातीच्या काळात याच सत्यपाल महाराजांना त्यांच्या खंजिऱ्यासहित स्टेजवरून त्यांना फेकून दिलं होतं ही वस्तुस्थिती आहे. सत्यपाल महाराज ज्या पद्धतीने खंजेऱ्या वाजवतात त्या पद्धतीवरही टीका करण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साथीदार सत्यपाल महाराजांना उलट्या खंजऱ्या वाजवतात हा खंजरीचा अपमान आहे असं म्हणत हिणवत होते. परंतु नदी जशी सतत प्रवास करत डोंगरदऱ्यांना चिरत सागरांना जाऊन मिळते अगदी तसा सत्यपाल महाराजांचा जीवन प्रवाह हा हजारो संकटांना तोंड देत जनसागरामध्ये जाऊन मिळाला. आज सत्यपाल महाराज हे महाराष्ट्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टार प्रचारक आहेत. त्यांना मिळणारा सन्मान त्यांना मिळालेले पुरस्कार आणि त्यांच्यासाठी आतुर असणारा प्रचंड जनसमुदाय या लोकप्रियतेला हुरळून न जाता त्यांच्या वागणुकीमध्ये तसूभरही फरक आपल्याला दिसत नाही आणि म्हणून याच कसोटीवर ते खऱ्या अर्थाने लोकसंत ठरतात.

# वंध्यत्वावर मात करणारी प्रणाली 'आयव्हीएफ' तंत्रज्ञान



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**गेल्या काही वर्षांत बदलती जीवनशैली, वाढते ताणतणाव, आहारात बदल आणि प्रदूषण आदी समस्यांमुळे स्त्री व पुरुषांमध्ये वंध्यत्वाची समस्या वाढत आहे. अनेक विवाहित जोडप्यांना आरोग्यविषयक बाबींमुळे मूल होण्यात अडचणी येत आहेत. मूल होत नसल्याने अनेक जोडपी वैद्यकीय उपचारही घेतात; मात्र उपचारांमुळे खात्रीशीर यश मिळतंच असं नाही. अशा जोडप्यांना आयव्हीएफ तंत्रज्ञान हे वरदान ठरत आहे. आयबीए तंत्रज्ञानाने वंध्यत्वावर मात करणे शक्य झाले आहे यामुळे संतान जोडप्यांचा याकडे कल वाढला आहे. आई होणे हे प्रत्येक स्त्रीला वाटत असते. मातृत्वाशिवाय सुख नाही, मातृत्वाशिवाय संसार नाही, असे प्रत्येक मातेला वाटत असते.जोडप्याला मुलं होत नसेल तर त्यासाठी स्त्रीला दोषी ठरवले जाते. मात्र यास महिला जबाबदार नसून पुरुषही जबाबदार आहे. जगभरातील बऱ्याच भागात वंध्यत्वाबद्दल अपुरे ज्ञान आहे. सर्वांत मोठा गैरसमज म्हणजे ही समस्या फक्त स्त्रियांशी निगडीत आहे.**

आपण एक लक्षात घेतले पाहिजे की,बाळ होण्यासाठी स्त्री आणि पुरूष हे दोघेही आवश्यक आहेत. संसारवेलीवर एक फूल उमलणे हा आयुष्यातील अतिशय मोठा टप्पा असतो,पण काही जोडप्यांमध्ये वंधत्वाची समस्या हा आनंद हिरावून घेतो. आयव्हीएफ या तंत्रज्ञानाने अपत्यहीन जोडप्यांचे जीवन सुखमय केलं आहे.

आयव्हीएफ तंत्रज्ञान म्हणजे काय ?

आयव्हीएफ या पद्धतीमध्ये स्त्रीच्या शरीरात तयार होणारी बिजांडे आणि पुरुषांचे शुक्राणू या दोघांचे मिलन शरीराबाहेर केले जाते. या उपचार पद्धतीमध्ये स्त्रीच्या शरीरातील बिजांड निर्मितीच्या प्रक्रियेचा अभ्यास करून, जास्त बिजांडे तयार होण्याची इंजेक्शन देऊन ही बिजांडे बाहेर काढली जातात. त्यानंतर त्यांचा शुक्रजंतू यांचा संयोग घडवून आणला जातो. हे भ्रूण २ ते ५ दिवस प्रयोगशाळेत वाढवले जातात. त्यानंतर यातील चांगल्या प्रतीचे भ्रूण हे स्त्रीच्या गर्भाशयात परत सोडले जातात. त्यानंतर दोन आठवड्यांनी या उपचार पद्धतीने गर्भधारणा यशस्वी झाली आहे किंवा नाही हे रक्ताची चाचणी करून ठरविण्यात येते. गर्भधारणेसाठी आयव्हीएफ उपचार पद्धतीकडे कल वाढला आहै. विविध कारणांमुळे नैसर्गिक गर्भधारणेस अडथळा येतो. अशावेळी अत्याधुनिक आयव्हीएफ तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गर्भधारणा यशस्वी केली जाते. नियोजित गरोदरपणाकडेही कल वाढला आहे. त्यासाठी स्वतःहून डॉक्टरांकडे आयव्हीएफ उपचार द्या, अशी मागणी दाम्पत्यांकडून होत आहे. परिणामी, सध्या भारतात जागोजागी श आयव्हीएफ सेंटरचे प्रमाण वाढलेले दिसत आहे.

या कारणांमुळे गर्भधारणेत अडथळा... उशिरा लग्न होणे वयाच्या २० ते ३० व्या वर्षात गर्भधारणा होऊन मूल होणे अपेक्षित असते; मात्र सध्या करिअर घडविण्याच्या दृष्टिकोनातून लग्नाचे वय वाढते. वयाच्या तिशीपर्यंतच गुणवत्तापूर्ण स्त्री बीजे महिलांच्या गर्भाशयात निर्माण होतात. त्याप्रमाणेच पुरुषांमध्येही शुक्रतंतूची संख्याही कमी व्हायला लागते. महिलांमध्ये चाळीशीनंतर मेनोपॉजचा काळ सुरू होतो. त्यामुळे निर्माण होणाऱ्या हार्मोनल समस्यांमुळे गर्भधारणेत अडचणी निर्माण होण्याची शक्यता वाढते. -स्त्री-पुरुषांमधील स्थुलत्व सध्या स्त्री आणि पुरुषांमधील स्थुलत्वाचे प्रमाण वाढले आहे. अनियंत्रित आहार आणि व्यायामाचा अभाव ही त्याची मुख्य कारणे आहेत. लठ्ठपणामुळे पुरुषांची सक्रियता कमी होते आणि शुक्रतंतूची संख्या घटते. तसेच महिलांच्या गर्भाशयातील चरबी वाढल्याने स्त्री बीजे विकसित होत नाहीत. त्यामुळे गर्भधारणेत अडचणी येतात. -व्यसनांचे वाढते प्रमाण तीव्र व्यसनाधिनतेचा परिणाम प्रजनन क्षमतेवर होतो. पुरुषांमध्ये सिगारेट, दारू, व्यायाम न करणे, तंबाखू यामुळे देखील शुक्रतंतूची संख्या कमी होते. सध्या महिलांमध्येही व्यसन करण्याचे प्रमाण वाढत आहे. -ताणतणाव व नैराश्य नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये तसेच बदलत्या जीवनशैलीमुळे ताणतणावाचे प्रमाण वाढले आहे. तणाव व नैराश्यामुळे पुरुषांमध्ये शुक्रतंतूची गुणवत्ता कमजोर होते. तणावामुळे महिलांमध्ये प्रोलेक्टिन नावाचे हार्मोन वाढतात. त्यामुळे नैसर्गिक गर्भधारणेसाठी समस्या उद्‌भवतात. -हार्मोन्समधील बदल आहारावर अनियंत्रण, चुकीचा आहार, झोप पूर्ण न होणे यामुळे महिलांमध्ये हार्मोन्समध्ये बदल होतात. ज्यामुळे थायरॉईड, पीसीओएससारख्या आजारांसोबत मासिक पाळीच्या चक्रात बदल होतो. त्याचा परिणाम स्त्री बीजांच्या निर्मितीवर होतो. -संयमाचा अभाव उशिरा होणाऱ्या लग्नामुळे नैसर्गिक गर्भधारणेसाठी संयम न ठेवताच डॉक्टरांकडे आयव्हीएफ उपचार पद्धतीची मागणी दाम्पत्यांकडून केली जाते. तंत्रज्ञानाबद्दल मिळणारी जलद माहिती आणि त्यातील यशस्वितेचे वाढते प्रमाण यामुळे ही दाम्पत्ये आयव्हीएफ उपचार पद्धती करण्याची मागणी करतात. -जोडीदारांची मने न जुळणे कामाचे वाढलेले तास, त्यामुळे एकमेकांना वेळ देता येत नसल्यामुळे वादविवादाचे प्रसंग उद्‌भवतात. त्यातही गर्भधारणेस उशीर झाल्यास त्यामुळे येणाऱ्या नैराश्यातूनही एकमेकांवर टीकाटिप्पणी केली जाते. त्यामुळे होणारे जोडीदारांचे सततचे भांडण, वादविवाद यामुळेही नैसर्गिक गर्भधारणेला खो बसतो. -पीसीओडीचे वाढते प्रमाण वाढता ताणतणाव, अनियंत्रित वजन, अवेळी जेवण, योग व व्यायामाचा अभाव यामुळे महिलांमध्ये पीसीओडीचे प्रमाण वाढले आहे. यामध्ये हार्मोन्समध्ये बदल होऊन पुरुषी संप्रेरके वाढल्यामुळे नैसर्गिक गर्भधारणेमध्ये अडथळे येतात. वंध्यत्वाच्या समस्येचं प्रमाण स्त्रियांइतकंच पुरूषांमध्येही आहे. कामाचा ताण, स्पर्धात्मक कामाचं स्वरूप, अनेकविध व्यसनं, व्यायामाचा अभाव, पुरेशी विश्रांती नाही, चुकीचा आहार यामुळे पुरूषांच्या वंध्यत्वाचं प्रमाण वाढत चाललं आहे. वंध्यत्वाच्या कारणांमध्ये नियमित स्त्री बीज तयार न होता किंवा स्त्री बीज प्रकियेत अडथळा निर्माण होणं, गर्भनलिका बंद असणं, गर्भनलिकेची कार्यक्षमता कमी होणं. पुरूषांमध्येही वंध्यत्वाचं कारण म्हणजे शुक्राणूंची संख्या किंवा हालचाल कमी आणि रचनेमध्ये बिघाड असणं यांचा समावेश आहे. वर्षभरात अपत्यप्राप्तीसाठी प्रयत्न केल्यानंतर देखील जोडप्याला बाळ होऊ शकत नसेल; तर अशा परिस्थितीला वंध्यत्व म्हणतात. अशांनी वेळीच डॉक्टरांचा सल्ला घेणं गरजेचं आहे. स्त्रीचं साधारण वय ३५पेक्षा अधिक असेल, तिच्या पोटाची काही शस्त्रक्रिया झाली असेल, तिची मासिक पाळी ही अनियमित असेल किंवा तिच्या जोडीदाराच्या शुक्राणूंची संख्या कमी-जास्त असेल, हालचाल कमी असतील तर त्यांनी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# राष्ट्रधर्माचे शिक्षक राष्ट्रसंत

आधुनिक केसरी

**देशात ज्याकाळी उपासमारी, बेरोजगारी,परिकीयांची सत्ता,परकीयांचे आक्रमण,परिकीयांची गुलामी इंग्रजी सत्ता, जातीयवाद, धर्म,पंथ,संप्रदाय यांचे आपसी मतभेद, गरिब श्रीमंतीचा प्रश्न , दुष्काळ , नापिकी, आणी निसर्गाकडून भूकंपासारखे भयंकर स्वरूपाची संकटे देशात थयमान घालत असतात.एक महात्मासंत कडाडून उठतो आणि आपल्या स्वतःच्या विणेला क्रांती वीणा बनवून देशाच्या कानाकोपऱ्यात फिरून या राष्ट्रावर आलेल्या संकटान समोर लढण्यासाठी राष्ट्रसेना उभी करतो आपल्या विशाल परिवर्तनिय विचारातून साहित्यातून देशातील संतमहात्मे साधू विद्वान पंडित नेते पुढारी समाज सुधारक यांच्या पासून तर देशातील प्रत्येक मानसाला समतेची मानवतेची व राष्ट्रधर्माची शिकवन देणाचे काम ज्यांनी केले ते म्हणजे खऱ्या राष्ट्रधर्माचे शिक्षक व.राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपले संपुर्ण आयुष्य स्वातंत्र्यासाठी देशात स्वराज्य निर्माण होण्यासाठी देशातील लोकशाही बळकट होण्याठी त्यांनी व्यतिथ केलं आहे.**

नवंनिर्माण आणि प्रगतिशील राष्ट्रजर तयार करायचा असेल तर त्यामधली नियमप्रणली कायदे सुव्यवस्था चांगल्या पद्धतीची आणि मजबूत असायला हवी हे ते जाणून होते. याचा त्यांनी अभ्यास केलेला होता.आणि लोकशाही म्हणजे काय देशाचा कारभार कसा चालतो कोण चालतो आणि प्रत्येकाने आपल्या देशासाठी काय केले पाहिजे आणि काय करू शकतो .त्यामध्ये आपण कशी मदत करू शकतो याचे ज्ञान जाणीव या देशातील सामान्यतील सामान्य माणसाला असावी हे प्रयत्न त्यानी केला ते आपल्या विचारातून साहित्यातून नेमही शिकवण्याचा आणि सांगण्याचा प्रयत्न त्यांनी केला.राष्ट्र बळकट करायचे असेल तर त्यामधील लोकशाही मजबूत असली पहीजे म्हणून लोकशाही म्हणजे काय हे सांगताना ग्रामगीतते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात..

लोकशाही म्हणजे लोकांचे हित ।लोकांकडोनी व्हावे हातोहात ।सर्व मालक म्हणोनि सत्य ।जबाबदारी ओळखावी।।

लोकशाहीत राज्यकर्त्यांनीच फक्त आपली जबाबदारी पाळून होत नाही तर देशातील प्रत्येक घटकाने आपली देशाविषयी कार्य करण्याची जबाबदरी ओळखुन लोकशाहीच्या प्रति जागृत राहायला पाहिजे.तसेच लोकशाचे चालक मालक फक्त नेते पुढारी सत्ताधारी राज्यकर्ते नुसन देशातील सर्वसामान्य लोक असतात.लोकशाही विषयी लोक जागरूकता असणं लोकशाहिच्या यशाचे मुळसूत्र आहे.तेच लोक त्या लोकशाहिला प्रगल्भ बनवू शकतात. प्रत्येकांने आपल्या जबाबदारीचे भान ठेवुन लोकशाहितले सत्ताधारी हे मालक नसून फक्त कारभारी असतात हे सांगताना स्पष्टपणे व.महाराज ग्रामगीतेत म्हणतात..

लोकशाहित जो सत्ताधारी ।तो मालक नव्हेची निर्धारी। लोकसेवेचा कारभारी। जबादारी हि त्याची।। या सत्ताधारी लोकांना सांगता तुकडोजी महाराज म्हणतात लोकशाहीत शासनपद्धती सत्ताधाऱ्यांची लोकांप्रति जबाबदारी असते.राज्यकर्ते हे मालक नसून ते लोकसेवक असतात याची जाणीव ठेवूनच त्यांनी आपले कर्तव्य काम चोख पणे पूर्ण केलं पाहिजे.तेव्हाच देशात लोकशाहीचे महत्व राहील. आणि तेव्हाच हे विद्वांन राज्यकर्ते नेते पुढारी समजा सुधारक इतरांसाठी आदर्श होतील. राष्ट्रसंतांनी राज्यकर्ते नेते पुढारी विद्वान पंडित यांनी आपल्या सत्तेचा ज्ञानाचा दुरुपयोग न घेता त्यांनी राष्ट्रासाठी झटून आदर्श दिला पाहिजे त्यांना बजावून सांगताना राष्ट्रसंत म्हणतात..

असो साधू भक्त विद्वान। त्यांनीही न खावे कष्टावीण ।उलट आदर्श द्यावं झटून। सर्व लोकांसी।।

महाराजांनी फक्त उपदेशच केले नाहीतर ते स्वतः प्रथम. अमलात आणले महाराजनी राष्ट्रहिताची शिकवनच दिले नाहीतर प्रत्येक राष्ट्रीय कार्यात हिरहिरीने भाग घेत होते स्वतः झटत होते श्रम प्रतिष्टेला महत्व देताना तुकडोजी महाराज म्हणतात..

एकहात खोदावी जमीन। ते असे पूजनाहूनी पूजन। शेकडो व्याखानाहून। परिणाम तयाचा।।

महाराजांनी नुसते उपदेशच केले नाहीतर ते आचरले आणि सर्वांना दशेधर्म व दुसऱ्यासाठी काही कार्य आपल्या हातून घडले पाहिजे यातच राष्ट्रसेवा देशसेवा धर्मसेवा आहे पटवून देवून लोकांना कर्म करण्यास प्रवृत्त केले. राष्ट्रसंत स्वतःपुरते कामकरणाऱ्या लोकांना सांगताना म्हणतात.. पोटासाठी करणे काम। हे नव्हेत पुण्य परिश्रम। उरल्या वेळी जे सेवाकर्म। त्यासी धर्म बोलती।। तेचि माणुसकीचे कर्म। जे दुसऱ्यासाठी केले श्रम।

कर्मातुम धर्म निर्माण होतो हा गीतेचा संदेश आहे तेच राष्ट्रसंतांनी ग्रामगितेतून सोप्या शब्दात मांडला. आणि धर्म माणसे घडतो आणि घडलेला माणूसच राष्ट्र घडवतो.म्हणून राष्ट्रसंत सच्चा कर्माचे पुरस्कर्ते होते.आपल्या कर्मातूनच आपण राष्ट्राची सेवा करू शकतो हे थोडक्यात त्यांनी सांगितले..

काही कर्मे स्वतः करीत ।काही कर्मे कुटुंबाचिया हिता ।काही कर्मे गावालोकांकरिता। सेवा धर्मरूप।।

कारण स्वार्थ आणि परमार्थ याची सांगड कर्मामध्ये घालता आली पाहिजे तरच ते धर्म होऊ शकतो.आणी त्यामधून धर्माची सेवाही होऊ शकते.आणी याच प्रकारे राष्ट्रला बळकट करण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे आपल्या विचारातून प्रबोधन करून वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न चालू होते.प्रत्येक व्यक्तीचा धर्म राष्ट्राच्या धारनेने कोणत्या पद्धतीचा असावा हे सांगता महाराज म्हणतात.. व्यक्तिधर्म सर्वां कळावा ।कुटबंधर्म आचारणी यावा ।ग्रामधर्म अंगी बणावा ।राष्ट्रधर्माच्या धारणेने।।

कोणत्याही धर्माचा पंथाचा पक्षाचा व्यक्ती असो. त्याच्या धर्माचा पंथाचा.कार्याचा त्याच्या विचारांचा त्याचा आचरणाचा त्याचा मूळउद्देश आणि मुलाधार हे राष्ट्र असले पाहिजे.आणि राष्ट्रधर्म टिकवणे हा असला पाहिजे.असे सांगून राष्ट्रधर्म जोपासणाऱ्या राष्ट्रधर्मचा पुरस्कार करणाऱ्या राष्ट्रसंतांनी सर्वांना समजावून दिले होते की... माझे देशची माझे घर ।देश दुःखी जणू माझेची शरीर ।त्यासाठी मी निरंतर। कष्टी होईन संभाळाया।।

प्रत्येक माणूस हा आपल्या देशाचा घटक असतो.ते माणसाला समजलं की त्या माणसामध्ये राष्ट्रवृत्ती निर्माण व्हायला वेळ लागत नसते.हेच सांगता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज एक साधारण माणसाचा ही संबंध संपूर्ण विश्वासी कसा जुडतो हे स्पष्ट करताना सांगतात की..विश्व ओळखावे आपणावरून। आपणची विश्व घटकजान। विश्वाचा घटक देश। गावाची देशाचा अंश। गावाचा मुळपाया माणूस। त्यासी करावे धार्मिक।। या विचार वाचून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज राष्ट्राची उन्नतीच्या मुळा पर्यन्त पोहोचले होते यावरून समजते.राष्ट्राची प्रगती राष्ट्रातील गावाच्या प्रगतीवरून ठरवू शकतो .आणि गावाची त्या गावातील घरावरून आणि घराची त्या घरातील राहणाऱ्या माणसावरून आपण ठरवू शकतो.राष्ट्रसंत म्हणतात...

मानवमात्राचे प्रथम माहेर। आपुले गाव त्यातील घर ।यातून प्रगती करीत सुंदर ।पुढे जावे विश्वाच्या।।

राष्ट्राच्या उन्नतीसाठी आपल्या घराची आपल्या गावाची उन्नती प्रथम उन्नती होणे गरजेचे असते.राष्ट्राच्या प्रगितीचे बीजे राष्ट्राच्या गावागावातील घराघरात पडणे गरचे .आहे तेव्हाच राष्ट्राची प्रगती साध्य होईल.देशाच्या अवस्थेची दिशा गावावरूनच ठरत असते. ग्रामगीतेत सांगतात...

गाव हा विश्वाचा नकाशा। गावावरून देशाची परीक्षा। गावाची भंगता। अवदशा येईल देशा।।

यावरून जर राष्ट्र बळकट प्रगतिशील विकसनशील करायचे असेल तर त्यासाठी राष्ट्रातील गावचीगाव त्यानुसार बनवली पाहिजे. त्यासाठी गावागावाला प्रगती पथाच्या मार्गावर आणणे गरजचे असते.आणि याची जबाबदरी गावातील प्रत्येक घटकावर अवलंबून असते.आणि गावागावाने राष्ट्र घडत असते.गावातील प्रत्येक व्यक्तीचे परिवर्तन हेच आदर्श गावाचे लक्षण असते.व राष्ट्रसंत तुकडोजीन महाराजांनी आयुष्यभर व्यक्ती,घर ,गाव ,राष्ट्रला मजबूत बळकट आदर्श करण्यासाठी आपल्या विचारातून आणि कार्यातून या पद्धतीने सर्वांच्या हिताचाअसा राष्ट्रधर्म शिकवण्याचा प्रयत्न केला.राष्ट्रसंतांनी राष्ट्रसंत उपमा घेऊन ते कार्य त्यांनी चोख पद्धतीने आदर्शरित्या आपल्या जीवनात पूर्ण केले.राष्ट्रसंत सांगतात...

महेंद्रा रा .सावके (हिरंगी)
९६०४६८०६८३

# अंधश्रद्धेच्या विळख्यात भारत

आपल्या भारत देशात अनेक अनेक थोर संत विचारवंत, कलावंत, लेखक, कवी व महामानव होऊन गेले. त्यांनी आपल्या देशात निर्मळ विचारांची पेरणी करून अंध्दश्रध्देवर कडाडून टीका केली. अंध्दश्रध्दा ही समाजाला व देशाला लागलेली किड आहे.जो कोणी अंधश्रद्धेच्या आहारी जाईल तो समूळ नष्ट झाल्याशिवाय राहाणार नाही.हे त्यांनी मनोमन ओळखले होते.म्हणूनच त्यांनी अंध्दश्रध्देवर जोरदार हल्लाबोल केला.त्यात अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे संस्थापक अध्यक्ष डॉ.नरेंद्र दाभोळकर हे एक निर्भिड व्यक्तीमत्व अंधश्रद्धेचा गर्दनकाळ व प्रहार ठरले. त्यांनी गावोगावी खेडोपाडी जाऊन अंध्दश्रध्देविरुध्द प्रचार व प्रसार केला की आपल्या देशात देव नाही वा धर्म नाही.भूतबाधा नाही वा करणी नाही किंवा भानामती नाही.हे भट ब्राह्मणांनी रचलेले थोतांड आहे. हे जणतेला पटवून दिले.तसेच जाणते म्हटले जाणारे लोक फाफू करून वा अंगात देव देवी आल्याचे नाटक करून गोरगरीब व अशिक्षित लोकांना भानामती झाली करणीच झाली असे काहीतरी म्हणून फसवतात.आणि त्यांच्याकडून मायंदळ पैसा उकळतात.आणि जणतेला पार भिकेला लावून टाकतात.परंतू आमची मायबाप भोळी जणता.ज्यांना की चटकन काही कळत नाही वा समजत नाही.ते असल्या भोंदूबाबावर पटकन विश्वास ठेवतात.खरे काय आणि खोटे काय याची शहानिशा न



करता त्यांच्या भूलथापांना बळी पडतात.शेवटी त्यांना काही फरक पडत नाही.भोंदूबाबाचा गूण येत नाही.मग पश्चात्तापाशिवाय काहीच उरत नाही.सांगायचा मुद्दा काय तर मी सुध्दा मुद्दाम निरीक्षणासाठी बुलढाण्याच्या सैलानी बाबाला व परभणीच्या तुरत पिराला गेलो होतो. तिथे लोकांची भरपूर गर्दी होती.पण त्या लोकांमध्ये मला निरीक्षण केल्यानंतर आडानी लोकांपेक्षा सुशिक्षित लोकांचीच फौज मोठी दिसली.शिकलेल्या लोकांच्याच अंगात येण्याचे प्रमाणही जास्त दिसू लागले.शिक्षक प्राध्यापक वर्ग मोठ्या संखेने दिसू लागला.आपण म्हणतो की शिकलेल्या लोकांचा काहीतरी आदर्ष घ्यावा.त्याच्याकडून काहीतरी शिकावे परंतू जर तेच अंधश्रद्धाळू असतील तर मग विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडून काय ज्ञान घ्यावे.मान्य आहे की सर्वच शिक्षक तसे नसतात.पण जे शिक्षक खरेच तसे असतात त्यांच्यासाठी तर लिहावेच लागेल ना.शाळेमध्ये सुध्दा अंधश्रद्धा शिकवली जात नाही.त्यावर पाठ्यपुस्तकात धडे नाहीत. शासनाने यावर उपाय योजना काढल्या पाहिजेत. आणि तसे धडे उपलब्ध करून दिले पाहिजेत व अंधश्रध्दा निर्मूलनासाठी शासनाने ठोस पावले उचलली पाहिजेत.सध्या जिकडे बघावे तिकडे अंधश्रद्धेचा बोलबाला आहे.माझी सुध्दा जणतेला नम्रतेची विनंती आहे की कंदोरी करणे,बकरे कापणे,कोंबडे कापणे, देवाला नवस बोलने व खूर मूंडीचा नैवद्य दाखवणे हे आपल्यातले खूळ आता बंद झाले पाहिजेत.

बुद्धभुषण कांबळे

# चौदाशे वर्षांच्या चांगदेवांची आध्यात्मिक गुरु!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात अनेक संत महात्म्ये होऊन गेले. या संतांमध्येच अनेक स्त्रीसंतही समाविष्ट आहेत. ज्यांनी समाजकार्यात बहुमूल्य वाटा उचलला, ज्यांनी मायमराठीच्या सारस्वतात भक्तीचा मळा फुलवला व मराठी साहित्याचे दालन भावसंपन्न केले, ज्यांना असामान्य बुद्धिमत्ता लाभली, ज्या अलौकिक भावंडांच्या वलयात वाढल्या, भक्तियोग मार्ग यात पारंगत असलेल्या ज्ञानेश्वरांची बहिण म्हणजेच संतशिरोमणी मुक्ताबाई होत. संपूर्ण जग चालवणारी आदिमाया आदिशक्ती ही संत मुक्ताईच्या रुपातील एक स्त्रीशक्तीच होय. त्यांच्याबद्दल पैठणकरांची प्रतिक्रिया होती- "हे तिन्ही अवतार तीन देवांचे| आदिमाता मुक्ताई मुक्तपणे अवतरली||" संतश्रेष्ठ मुक्ताबाई यांचा जन्म महाराष्ट्रातील आपेगाव येथे इ.स.१२७९ साली झाला. तो दिवस मराठी कालगणनेनुसार आश्विन शुद्ध प्रतिपदा- घटस्थापनेचा होता.**

या महाराष्ट्रातील स्त्रीसंत व कवयित्री होत्या. संत मुक्ताबाई या मुक्ताई नावानेही ओळखल्या जातात. त्यांचा संतवाङ्मयात ब्रह्मचित्कला नावाने देखील सन्मान झाला असल्याचे आढळते.

रुक्मिणी व विठ्ठलपंत हे त्यांचे आई वडील होते. संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर व संत सोपानदेव हे मुक्ताबाईंचे थोरले भाऊ होते. खरे तर विरक्ती, ज्ञान, भक्ती आणि मुक्ती यांचे मूर्तिमंत स्वरूप घेऊन निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई जन्माला आले. साक्षात दिव्यत्वाची ही चार रूपे रुक्मिणी आणि विठ्ठलपंतांचे मातृ-पितृत्व धन्य करणारी! पण हे दिव्यत्व जगाला समर्पित करून मातापित्याला जगाचा निरोप घ्यावा लागला. पोरवयातच निवृत्तीनाथ आणि त्यांच्या भावंडाना संन्याशाची पोरं म्हणून वाळीत टाकून त्यांची विटंबना केली, परंतु हे सारे भोग सोसत या चारही बहिणभावंडानी ब्रह्मविद्येची अखंड उपासना केली. आपल्यानंतर आपली मुलं सुखी रहावीत, या आशेने विठ्ठलपंत व रुक्मिणी यांनी निर्दय समाजाने दिलेल्या देहांत प्रायःश्चिताचा निर्णय मान्य करून देहत्याग केला. मातापित्याच्या या देहत्यागानंतर या अनन्य साधारण कुटुंबाच्या गृहीणीपदाची नाजूक जबाबदारी मुक्ताबाईंवर पडली. ती तितक्याच समर्थपणे तिने उचलली आणि पेलली. आपल्या भावंडांची जणू त्या माउलीच झाल्या. त्यामुळे खेळण्या बागडण्याच्या वयातच त्या प्रौढ, गंभीर, सोशिक आणि समंजस बनल्या.

**"तात आणि माता गेलीसे येथून| तेव्हा आम्ही लहान पांडुरंगा|| निवृत्ती ज्ञानेश्वर कोरान्नाचे अन्न| सांभाळी सोपान मजलागी|| तुझ्या योगे हरी क्रमियेला काळ|**..."

संत मुक्ताबाईच्या हातून विश्व उद्धाराचे कार्य घडले. चौदाशे वर्षे जगलेला योगी चांगदेव एवढा मोठा तपस्वी होता. परंतु त्याने गुरु केला नसल्याने त्याला ईश्वरदर्शन झाले नव्हते. संत मुक्ताबाईंनी त्यांना पासष्टीचा अर्थ उलगडून दाखविला. त्यांच्या अनुग्रहाने चांगदेवांना आत्मरुपाची प्राप्ती झाली. तेव्हा त्यांचे जीवन धन्य झाले. आठ वर्षांची मुक्ताई चौदाशे वर्षांच्या चांगदेवांची अध्यात्मिक गुरु बनली. कृतार्थतेने ते म्हणतात, की मुक्ताई करे लेइले अंजन! संत ज्ञानेश्वरांनी एकदा त्यांना मांडे बनवण्यास सांगितले, तेव्हा त्या मातीचे खापर आणण्यासाठी कुंभारवाड्यात गेल्या. विसोबा चाटी हा त्या गावाचा प्रमुख होता, जो या चार भावंडांचा द्वेष करत असे. त्याने यांना कोणीही खापर देऊ नये, अशी गावात ताकीद दिली. त्यामुळे त्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले. त्यांचा हिरमुसलेला चेहरा बघून ज्ञानेश्वरांनी योगबळाने स्वतःची पाठ तापवली. त्यांना ते तेथे भाजण्यास सांगितले. तो चमत्कार पाहून विसोबा त्यांना शरण आले. त्यांनी



मुक्ताईने भाजलेले मांडे प्रसाद म्हणून खाण्यासाठी धावतच झडप घातली. त्यावर मुक्ताईने त्यांना खेचर पक्षी असे म्हटले. तेव्हापासून त्यांनी तेच नाव धारण करून ते संत विसोबा खेचर बनले. संत मुक्ताईवर गोरक्षनाथांच्या कृपेचाही वर्षाव झाला होता. त्यानंतर त्यांना अमृत संजीवनीची प्राप्ती झाली. त्यांचा बोधप्रद अभंग-

**“अखंड जयाला देवाचा शेजार, कारे अहंकार नाही गेला| मान अपमान वाढविसी हेवा,
दिवस असता दिवा हाती घेसी||”**

संत मुक्ताबाईंनी रचलेले ताटीचे एकूण ४२ अभंग प्रसिद्ध आहेत. या अभंगांमध्ये त्यांनी आत्मक्लेशामुळे दरवाजा बंद करून बसलेल्या ज्ञानदेवांनी दरवाजाची ताटी उघडावी म्हणून विनवणी केली आहे. त्यांनी त्यांना आदिनाथांपासून गहीणीनाथांकडे आणि त्यांच्याकडून निवृत्ती, ज्ञानदेवाकडे आलेल्या नाथसंप्रदायाची आठवण करून दिली. घराण्याच्या मोठेपणाचे, योगीपणाचे स्मरण करून दिले. जो जनांचे अपराध सहन करतो तो योगी. अवघे विश्व जरी आपल्यावर रागावले तरी जलासारखे थंडपण घेऊन त्या क्रोधाग्निला विझवायचे. लोकांच्या शब्दरूपी शस्त्राने जरी त्रास झाला तरी चांगला उपदेश मान्य करायचा. अशा शब्दात समजावताना मुक्ताईंच्या शब्दांचे अभंग झाले, तेच ताटीचे अभंग होत-

**"योगी पावन मनाचा| साहे अपराध जनांचा|| विश्व रागे झाले वन्ही| संती सुखे व्हावे पाणी|| शब्दशस्त्रे झाले क्लेश| संती मानावा उपदेश|| विश्वपट ब्रह्मदोरा| ताटी उघडा ज्ञानेश्वरा||"**

समजवताना म्हणतात, आपलाच हात आपल्याला लागला तर त्याचे दुःख करू नये. आपली जीभ आपल्या दाताखाली आली म्हणून लगेच काही आपण दात पडून टाकत नाही. ब्रह्मपदाला पोहोचायचे तर लोखंडाचे चणे खावे लागतात, हाल-अपेष्टा सहन कराव्या लागतात. समजवण्याच्या सगळ्या मार्गांनी जाऊनही ज्ञानदादा काही ताटीचे दार उघडेना. तेव्हा हळव्या झालेल्या मुक्ताई म्हणतात- "हात आपुला आपणा लागे| त्याचा करू नये खेद|| जीभ दातांनी चाविली| कोणे बत्तीशी पाडिली|| चणे खावे लोखंडाचे| मग ब्रह्मपदी नाचे|| लडिवाळ मुक्ताबाई| जीव मुद्दल ठायीचे ठायी|| तुम्ही तरून विश्व तारा| ताटी उघडा ज्ञानेश्वरा||" ज्ञानदेवांनी ताटीचे दार उघडले आणि त्यानंतर आयुष्यात त्यांच्या हातून अलौकिक कार्य घडले. त्यांच्या अलौकिक कार्याला श्रीनिवृत्तीनाथांची कृपा व मुक्ताईंची धेयस्वप्नांची जाणीव होती. समाजाभिमुख आणि अत्यंत अर्थपूर्ण अशी मुक्ताबाईच्या अभंग रचना आहेत. मुक्ताबाईंनी ताटीचे अभंग लिहिले त्याचप्रमाणे हरिपाठाचे व गहन अर्थाचे सुद्धा अभंग लिहिलेत-

**"मुंगी उडाली आकाशीं| तिनें गिळीलें सूर्याशीं||"** त्यांचे विचार फार साधे मात्र परखड होते. मराठीतील पहिल्या कवयित्री म्हणून आज देखील त्यांचा नामोल्लेख होतो. त्यांनी ज्ञानबोध या ग्रंथाचेही लेखन केले. त्यांत संत निवृतिनाथ व संत मुक्ताबाई यांचा संवाद आलेला आढळतो, त्यावरून ते कळते. संत ज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर ज्येष्ठ बंधू निवृतिनाथ मुक्ताबाईंना घेऊन तीर्थयात्रा करण्याकरीता निघाले. ते तापी नदीवर आले असता अचानक वीज कडाडली. दि.१२ मे १२९७ रोजी संत मुक्ताबाई विजेच्या प्रचंड प्रवाहात लुप्त झाल्या, असे सांगितले जाते. त्यांची समाधी कोथळी येथे आहे. !! संतशिरोमणी मुक्ताबाईंना पावन जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन !!

# लता मंगेशकर, मोहम्मद रफी यांच्यातील 'तो' गाजलेला वाद !

आधुनिक केसरी

**महान पार्श्वगायिका लता मंगेशकर आणि महान पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्यांत अनेक वर्षांपूर्वी स्वामित्व धनावरून (रॉयल्टी) तीव्र स्वरूपाचे मतभेद निर्माण होऊन दोघांनीही ३ वर्षे एकमेकांसमवेत एकही द्वंद्वगीत गायिले नाही. पण त्यांच्यांतील शीतयुद्ध सुरू होण्यास केवळ हाच वाद कारणीभूत ठरला नव्हता; तर त्याआधी एका हिंदी चित्रपटाच्या द्वंद्वगीताच्या ध्वनिमुद्रणाच्या वेळी या वादाची ठिणगी पडली होती. त्या चित्रपटाचे नाव 'माया' (१९६१). त्यात देव आनंद आणि माला सिन्हा नायक-नायिका होते. दिग्दर्शन डी. डी. कश्यप यांनी केले होते.**

गीते मजरूह सुलतानपुरी यांनी लिहिली होती आणि संगीत सलिल चौधरी यांनी दिले होते. या चित्रपटातील "तसवीर तेरी दिल में, जिस दिन से उतारी है, फिरूं तुझे संग लेके, नए नए रंग लेके, सपनों की महफिल में" हे द्वंद्वगीत लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी गाणार होते. मूळ बंगाली असलेले हे एकक (सोलो) गीत सलिल चौधरी यांनी १९६० साली लता मंगेशकर यांच्याकडून गाऊन घेतले होते. ते बंगाली चित्रपटात समाविष्ट करण्यात आलेले नव्हते. हिंदीसाठीही त्यांनी तीच चाल वापरली. मध्य मुंबईतील प्रख्यात 'फेमस' ध्वनिमुद्रण स्टुडिओत गीताचे ध्वनिमुद्रण होणार होते. गीतकाराचे शब्द आणि संगीतकाराची चाल यात लता मंगेशकर बदल करतात असे बोलले जात असे. मोहम्मद रफी मात्र जे शब्द असतील तसे आणि चालीप्रमाणेच गाण्याबाबत प्रसिद्ध होते. गीतकार व संगीतकार यांना ते गुरुस्थानी मानत असत. लता मंगेशकर यांना 'मधुमती' चित्रपटात त्यांनी गायिलेल्या "आजा रे परदेसी" या गीताप्रमाणेच "तसवीर तेरी दिल में" या गीताची पंचम सुरांमधे सुरुवात करावयाची होती. पण प्रत्यक्षात गीताच्या केवळ मुखड्याचेच अकरा वेळा फेरध्वनिमुद्रण (रिटेक) झाले. रफी विचारात पडले, की ऐकायचे कोणाचे ? सलिल चौधरींचे की लता मंगेशकरांचे ? त्यात पुन्हा सलिल चौधरी यांनीही लता मंगेशकर यांचीच बाजू घेतली. पण नंतर लता मंगेशकर यांचा स्वर अनियंत्रित होऊ लागला. त्या मानाने रफी यांचा स्वर नियंत्रित होता. रफी यांना गीताचे एकापेक्षा अधिक टेक देण्याची सवय होती. गीत मनासारखे होईपर्यंत ते स्वस्थ बसत नसत. त्यामुळेही लता मंगेशकर संतापल्या होत्या. शेवटी हे गीत कसेबसे ध्वनिमुद्रित झाले. ऐकताना ते अत्यंत मधुर आणि सुश्राव्य बनले; पण ते तयार होताना दोन्ही पार्श्वगायकांमधे कमालीचा कडवटपणा निर्माण झाला होता. त्यानंतर लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी यांच्यांत गीतगायनाच्या स्वामित्व धनावरून (रॉयल्टी) तीव्र मतभेद निर्माण झाले. लता मंगेशकर यांचे म्हणणे असे होते, की संगीत दिग्दर्शकांना जसे ध्वनिमुद्रिकांच्या विक्रीतून स्वामित्व धन मिळते तसे ते पार्श्वगायकांनाही मिळावयास हवे. भविष्यकाळात आपल्याला काम मिळाले नाही किंवा ध्वनिमुद्रिकांची विक्री झाली नाही तर स्वामित्व धनाचा फायदा होऊ शकतो. पण रफी यांना हे मान्य नव्हते. त्यांचे म्हणणे होते, की निर्मात्याने पार्श्वगायकाला त्याने गायिलेल्या गीताचे मानधन दिले की प्रश्न मिटला. पण लता मंगेशकर काहीही ऐकावयाच्या मनस्थितीत नव्हत्या. शेवटी रफी संतापून लता मंगेशकर यांना उद्देशून म्हणाले, या महाराणी सांगतील तसेच त्यांना व्हावयाला



हवे आहे ! यांच्याबरोबर यापुढे गायन करणे कठिण आहे ! त्यावर लता मंगेशकर रफी यांना म्हणाल्या, की हो, आहेच मी महाराणी ! आणि तुम्ही कशाला त्रास घेता, मीच यापुढे तुमच्याबरोबर गाणार नाही ! मोहम्मद रफी यांचे म्हणणे होते, की जर पार्श्वगायकांना स्वामित्व धन हवे असेल तर जेव्हा एखादा चित्रपट आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे अपयशी ठरतो तेव्हा निर्मात्याच्या आर्थिक नुकसानाची भरपाई करावयास पार्श्वगायक हातभार लावतील काय? या संदर्भातील एक आदर्श स्वतः मोहम्मद रफी यांनीच घालून दिला. अभिनेते जॉय मुखर्जीनिर्मित आणि अभिनीत 'हमसाया' हा चित्रपट पडला तेव्हा रफी यांनी त्या चित्रपटाची जितकी गीते गायिली होती त्यांचे मानधन जॉय मुखर्जी यांना परत केले.

१९६४ साली राजेंद्र कुमार, सायरा बानू आणि धर्मेंद्र यांच्या प्रमुख भूमिका असलेला 'आई मिलन की बेला' हा चित्रपट प्रदर्शित झाला. त्याला शंकर-जयकिशन यांचे संगीत होते. त्या चित्रपटातील गीतांचे काम चालू असताना लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी यांच्यांतील बेबनाव संपलेला नव्हता. शंकर-जयकिशन यांना नायक राजेंद्र कुमार आणि नायिका सायरा बानू यांच्यासाठी एक युगुलगीत ध्वनिमुद्रित करावयाचे होते आणि ते त्यांना लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी यांच्याकडूनच गाऊन घ्यावयाचे होते. दोन्ही पार्श्वगायकांशी 'एसजे' जोडीचे चांगले संबंध होते. गीतकार शैलेंद्र यांनी लिहिलेल्या त्या गीताचा मुखडा होता : "ओ सनम तेरे हो गए हम, प्यार में तेरे खो गए हम, जिंदगी को ऐ हमदम, आ गया मुस्कराना" मग शंकर-जयकिशन यांनी एक शक्कल लढविली. दोघांकडून त्यांच्या त्यांच्या ओळी स्वतंत्रपणे गाऊन घ्यावयाच्या ! ते दोघेही अशा पद्धतीने गाण्यास तयार झाले. लता मंगेशकर आल्या आणि आपल्या ओळी गाऊन गेल्या. त्यानंतर मोहम्मद रफी यांनी येऊन त्यांच्या ओळी गायिल्या. नंतर या ध्वनिमुद्रित ओळींचे अशा बहारदारपणे संकलन करण्यात आले, की श्रोत्याला वाटावे दोघे एकत्रितच गायिले आहेत ! दिग्दर्शक मोहन कुमार यांनी गीताचे चित्रीकरणही परिणामकारक केल्याने हे गीत चित्रपटाचे प्रमुख आकर्षण बनले. तीन वर्षे अशीच गेली. त्या काळात लता मंगेशकर यांच्याबरोबरची काही द्वंद्वगीते महेंद्र कपूर आणि मन्ना डे यांना मिळाली तर मोहम्मद रफी यांच्याबरोबरची द्वंद्वगीते सुमन कल्याणपूर, आशा भोसले व मुबारक बेगम यांना मिळाली. सुमन कल्याणपूर तर लता मंगेशकर यांच्या मानधनाच्या निम्मे मानधन घेऊन गीते गात होत्या. त्यांना अधिकाधिक गीते मिळू लागली. या सगळ्याचा परिणाम असा झाला, की लता मंगेशकर यांना वर्षाला साधारणपणे २२० गीते मिळत त्यांची संख्या घसरून एकदम १४० वर आली. लता मंगेशकर साहजिकच फार बेचैन झाल्या. शेवटी त्यांनी संगीतकार जयकिशन यांना दोघांमधे समेट घडवून आणण्याची विनंती केली. जयकिशन यांनी दोघांमधे समेट घडवून आणला.

आणि समेटानंतरचे पहिले द्वंद्वगीत होते 'पलकों की छांव में' या चित्रपटातील ! 'पलकों की छांव में' या चित्रपटाला लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी संगीत दिले होते. गीत ध्वनिमुद्रित झाले ; पण त्याची चाल फारशी आकर्षक नव्हती आणि तो चित्रपट प्रदर्शित झालाच नाही. त्यामुळे ते गीत श्रोते कधी ऐकू शकले नाहीत. जर कोणी कधी ऐकले असेल तर ते लक्षातही राहिले नसेल !

मोहम्मद रफी यांनी लेखी क्षमा मागितल्यामुळे आमच्या दोघांमधील वाद संपुष्टात आला असे लता मंगेशकर यांनी जाहीरपणे सांगितले. परंतु मोहम्मद रफी यांचे कुटुंबीय हे मान्य करणे शक्यच नव्हते. रफी यांचे पुत्र शाहीद रफी यांनी लता मंगेशकर यांना आपल्या वडिलांनी दिलेली लेखी स्वरूपातील क्षमायाचना दाखवा, अशी जाहीर विनंती केली; पण लता मंगेशकर यांनी हयात असेपर्यंत कसलाही कागद रफी यांच्या कुटुंबीयांना दाखविला नाही.दिवस असेच जात होते. १९६७ साल उजाडले. अभिनेते देव आनंद आपल्या 'ज्वेल थीफ' या चित्रपटाची जुळवाजुळव करू लागले. त्यांनी या चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी दादा बर्मन (सचिन देव) यांच्यावर सोपविली. या चित्रपटातील गीते लता मंगेशकर, किशोर कुमार आणि मोहम्मद रफी गाणार होते. लता मंगेशकर यांची किशोर कुमार यांच्यासमवेत दोन व भूपेंद्र यांच्यासमवेत एक अशी द्वंद्वगीते ध्वनिमुद्रित झाली. आणखी एक द्वंद्वगीत होते. त्याचा मुखडा होता : "दिल पुकारे आ रे आ रे आ रे, अभी ना जाओ मेरे साथी....." हे गीत मात्र दादा बर्मन यांनी लता मंगेशकर आणि मोहम्मद रफी यांच्याकडूनच गाऊन घेतले. आणि सर्वाधिक चर्चा याच गीताची झाली ! मोहम्मद रफी आणि लता मंगेशकर यांनी एकमेकांसमवेत द्वंद्वगीत गाणे बंद केल्यानंतर तीन वर्षांनी जेव्हा त्यांनी पुन्हा एकत्र गीतगायन करण्यास प्रारंभ केला त्याचा ख-या अर्थाने श्रीगणेशा 'ज्वेल थीफ'च्या या मधुर युगुलगीताने झाला.

अनिल रा. तोरणे
९२२६१६०६५४

# मिशन इंद्रधनुष्य ५.० अंतर्गत लसीकरणापासून वचितांसाठी तिसरा टप्पा ९ ते १४ ऑक्टोबर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लसीकरणापासून वंचित राहिलेल्या लाभार्थ्यांसाठी विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० चा तिसरा टप्पा उद्या ९ ते १४ ऑक्टोबर दरम्यान राबविला जाणार असुन यात शून्य डोज घेतलेले, सुटलेले व वंचित लाभार्थी क्षेत्र, गोवरसाठी अतिजोखमीचा भाग, नवीन लसीअंतर्गत कमी काम झालेले क्षेत्र, नियमित लसीकरण सत्र न झालेले क्षेत्र, स्थलांतरित भागातील लाभार्थ्यांचे लसीकरण करण्यात येणार आहे.

बालकांमधील मृत्यू व आजारपणाचे प्रमाण कमी करण्यासाठी लसीकरण हे एक प्रभावी साधन असून, अर्धवट लसीकरण झालेले, तसेच लसीकरण न झालेली बालके ही पूर्ण लसीकरण झालेल्या बालकांपेक्षा लवकर आजारी पडतात किंवा मृत्यू पावतात त्यामुळे केंद्र शासनाने डिसेंबर २०२३ पर्यंत गोवर रूबेला आजाराचे दुरीकरण करण्याचे ध्येय निश्चित केले असून, यासाठी चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रात ऑगस्ट महिन्यापासून विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० चंद्रपूर मनपातर्फे राबविण्यात येत आहे. ।संदर्भात सिटी टास्क फोर्स समितीची आढावा बैठक ५ ऑक्टोबर रोजी अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मनपा सभागृहात घेण्यात आली.याप्रसंगी डॉ. वनिता गर्गेलवार,डॉ. साजिद, आयएमए व आयएपीचे प्रतिनिधी उपस्थीत होते. विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० या मोहिमेंतर्गत झीरो ते दोन वर्ष वयोगटांतील लसीकरणापासून वंचित किंवा गळती झालेल्या लाभार्थ्यांचे सर्व लसींद्वारे लसीकरण करण्यात येणार आहे. दोन ते पाच वयोगटांतील ज्या बालकांचे गोवर रूबेला लसीचा पहिला व दुसरा डोस राहिला असेल, तसेच डीपीटी व ओरल पोलिओ लसीचा बूस्टर डोस राहिला असेल त्यांचेही लसीकरण करण्यात येत आहे. त्याचबरोबर गर्भवती महिला यांचे लसीकरण कार्यक्रमांतर्गत करण्यात येत असुन ६ ऑगस्ट २०१८ किंवा त्यानंतर जन्मलेल्या बालकांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. मिशन इंद्रधनुष्यकरिता मनपा आरोग्य विभागामार्फत ७० लसीकरण केंद्रे व ६ मोबाईल टीम तयार करण्यात आल्या असून आपली बालके निरोगी व सुदृढ राहण्यासाठी नियमित लसीकरण करणे गरजेचे असल्याने कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहू न देण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिका आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.

# मनोज जरांगे पाटील आज बिडकीनमध्ये

आधुनिक केसरी न्यूज

**रवींद्र गायकवाड**

**बिडकीन :** मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील दि.११ आक्टोंबर बुधवार रोजी बिडकीन (ता. पैठण) येथील निलजगाव फाट्यावर गेल्या १३ सप्टेंबरपासून सुरू असलेल्या बेमुदत साखळी उपोषण स्थळी भेट देणार असुन समाज बांधवांशी संवाद साधुन मराठा आरक्षणासाठी जनजागृती करणार आहेत. मराठा आरक्षणासाठी लढणारे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दि. ३० सप्टेंबर पासून मराठा आरक्षण जनजागृती राज्यव्यापी दौरा सुरू केला आहे. जालना, बीड, छत्रपती संभाजीनगर, तसेच परिसरातील जिल्हा, तालुका, गावोगावी, खेडोपाड्यात संवाद दौऱ्यांचे आयोजन करण्यात आले असताना मराठा व इतर बांधवांच्या वतीने मोठ्या प्रमाणात उत्सफुर्द प्रतिसाद मिळत आहे. उद्या दि.११ रोजी मनोज जरांगे पाटील हे गंगापूर, कायगाव, शेंदुरवादा, शेकटा मार्गे बिडकीन येथे दुपारी तीन वाजता येथे येणार असून बिडकीन बस स्थानक, शासकीय विश्रामगृह परिसरात दाखल होतील. तेथुन ढोल ताशांच्या गजरात, फटाके फोडुन मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात येऊन निलजगाव फाट्यापर्यंत मिरवणूक काढण्यात येईल अशा पद्धतीने पायी रॅली काढण्यात येणार आहे. बेमुदत साखळी उपोषणाला मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ बिडकीन निलजगाव फाट्यावर सुरू असलेल्या मराठा आरक्षण बेमुदत साखळी उपोषणाला भेट देतील. त्यानंतर समाज बांधवांशी जरांगे पाटील संवाद साधणार आहेत. निलजगाव फाटा येथील कार्यक्रम स्थळी

शिवशाहीर सुनिल वाघचौरे हे आपल्या सहकाऱ्यांसोबत पोवाड्याचा शाही कार्यक्रम सादर करणार आहेत. संवाद दौरा या होणाऱ्या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू केली असुन बिडकीन परिसरातील व पैठण तालुक्यातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन बेमुदत साखळी उपोषणकर्ते व सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.





# भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे करणार पनवेलमध्ये महाविजय २०२४ संकल्प दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**हेमंत धायगुडे**

**पनवेल :** महाविजय २०२४ च्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा बुधवार दिनांक ११ ऑक्टोबर रोजी पनवेलमध्ये संघटनात्मक दौरा होणार असल्याची माहिती भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी मावळ लोकसभा मतदार संघ निवडणुक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज ( दि. ०९ ऑक्टोबर ) येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

शहरातील मार्केट यार्ड येथे झालेल्या या पत्रकार परिषदेस भाजपचे पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, ॲड. प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, तालुका मंडल सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील आदी उपस्थित होते. अविनाश कोळी यांनी पुढे माहिती देताना सांगितले कि, भारतीय जनता पार्टीच्या वतीने आगामी लोकसभा निवडणुकीकरिता संपूर्ण देशभरात महाविजय २०२४ अंतर्गत लोकसभा मतदार संघाची बांधणी सुरु आहे. आगामी निवडणुकीसाठी भाजपने राष्ट्रीय पातळीवर ४०० प्लस तर

> भाजप इतरांपेक्षा वेगळा आणि जबाबदारीने काम करणारा पक्ष आहे .सतत कार्यक्रम आणि त्या अनुषंगाने लोकांमध्ये राहणारा पक्ष आहे .एनडीए जिंकले पाहिजे यासाठी आमचा प्रवास आहे . भाजपचे संघटन ताकदीने सर्व २८८ विधानसभा मतदार संघात उभे आहे .
> **आमदार प्रशांत ठाकूर**

महाराष्ट्र राज्यात ४५ पेक्षा जास्त जागांवर विजय मिळवण्याचे उद्दिष्ट केले आहे. त्या अनुषंगाने भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा महाराष्ट्रातील सर्व लोकसभा मतदार संघात प्रवास सुरु आहे.त्यातील एक भाग असलेल्या ३३ मावळ लोकसभा मतदार संघात बुधवारी त्यांचा दौरा होणार असून त्यांच्या या दौऱ्याच्या अनुषंगाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

पक्षाची माहिती, ध्येय धोरणे बुथ मधील शेवटच्या नागरिकापर्यंत माहिती व्हावी, याकरिता एका प्रमुख पदाधिकाऱ्याकडे विधानसभा मतदार संघातील तीन ते चार बुथची संपूर्ण जबाबदारी सोपवण्यात आली असून पक्षाने त्यांना 'विधानसभा वॉरियर्स' म्हणून संबोधले आहे. अशा मावळ लोकसभा मतदार संघातील विधानसभा वॉरियर्सची बैठक स्वतः प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी ९. ३० वाजता घेणार आहेत.तत्पूर्वी ते पनवेल शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करणार आहेत. निवडणुकीत मतदान होईपर्यंत तो बुथ अधिकाधिक मजबूत करण्यासाठी म्हणजेच त्या बुथवर ५१ टक्के चे गणित करण्यासाठी घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसंदर्भात या बैठकीत श्री.बावनकुळे 'विधानसभा वॉरियर्स' सूचना देणार आहेत. देशाच्या प्रगतीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निर्णय घेतले, लोकहिताच्या विविध योजना अंमलात आणल्या त्याची माहिती देण्यासाठी 'घर घर चलो संपर्क अभियान' सुरु आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील मावळ मतदार संघातील पनवेल, उरण, कर्जत या तीनही विधानसभा मतदार संघातील ही बैठक झाल्यानंतर पनवेल शहरात 'घर घर चलो' अभियान व 'मेरी माटी मेरा देश' अभियान राबविण्यात येणार आहे. या घर घर चलो संपर्क अभियानात प्रदेशाध्यक्षांसोबत तीनही विधानसभेतील हजारो कार्यकर्ते त्यांच्याबरोबर सहभागी होणार आहेत.त्यानंतर ते पनवेल मधील काही परिवाराच्या भेटी घेणार असून त्यानंतर होणाऱ्या कॉर्नर बैठकीत ते कार्यकर्ते आणि नागरिकांशी संवाद साधणार आहेत.प्रदेशाध्यक्षांच्या या संघटनात्मक दौऱ्याची पनवेलमध्ये तयारी जल्लोषात सुरु असल्याचेही अविनाश कोळी यांनी सांगितले.

# विकासकामे मार्गी लावण्याकरिता प्रशिक्षण गरजेचे : सरपंच सविता निकम

## कन्नड तालुक्यातील नादरपूर गावात विकासासाठी शाश्वत प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरूवात

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** तालुक्यातील नादरपूर गावत विकासासाठी शाश्वत प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करण्यात आला त्यात शाश्वत विकासाची 17 उद्दिष्टे,9 संकल्पना यांचे प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्‌घाटन विद्यमान सरपंच मा. सौ. सविताताई दिलीप निकम यांच्या हस्ते करण्यात आले. प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवसापासून पिशोर व नाचलेले सर्कलमधील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक व कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. त्यात प्रामुख्याने सरपंच, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, पोलीस पाटील, शाळेचे मुख्याध्यापक, जलरक्षक, पाणीपुरवठा कर्मचारी, ग्रामपंचायत कर्मचारी , वृत्तपत्राचे पत्रकार, मंडळी हे उपस्थित होते. प्रशिक्षण देण्यासाठी पंचायत राज प्रशिक्षण केंद्राचे प्रविण प्रशिक्षक मनोहर बन्सवाल, आदर्श गाव पाटोदाच्या विद्यामान सरपंच जयश्री दिवेकर, वरठाण ग्रामपंचायतचे सरपंच श्री अनिल साळुंके, यशोदा पुणे च्या प्रवीण प्रशिक्षक श्रीमती भारती खरटमल हे उपस्थित होते. प्रशिक्षणाचे समन्वयक श्री सतीश वानखेडे हे देखील या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. सर्व प्रशिक्षण कार्यक्रम नादरपुर तालुका कन्नड, वाकी, अंधानेर या तिन्ही ठिकाणी यशस्वीरित्या पार पडला. या सर्व कार्यक्रम प्रक्रियेसाठी प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य श्री अजय झाडोकार यांनी उत्तम प्रकारे नियोजन केले. गावाचा विकास करण्यासाठी पाटोदा गावच्या सरपंच यांनी आदर्श गावकऱ्यांसाठी कोणकोणत्या योजना राबविल्या त्याबाबत माहिती दिली. शाश्वत विकासाच्या नऊ संकल्पना मध्ये गरिबी मुक्त उपजीविका पोषक गाव, आरोग्यदायी गाव, बालस्नेही गाव, जलसमृद्ध गाव, स्वच्छ व हरित गाव, पायाभूत सुविधा मुक्त गाव, सामाईक सुविधा युक्त गाव, सुशासन युक्त गाव, लिंगसमभाव / महिला स्नेही गाव, अशा 9 संकल्पनावर मा. श्री. सय्यद अजरुद्धीन प्रशिक्षक समन्वयक यांनी सखोल अशी माहिती दिली. जीपीडीपी अंतर्गत आराखड्यातून शाश्वत विकास कसा साध्य करता येईल याची माहिती दिली. प्रशिक्षणात तिसऱ्या नादरपूर गावच्या विकासा विषयी माहित दिली व नादरपूर प्रमाणे इतर गावानीही आदर्श गाव बनवावे असे सांगितले. दिलीप निकम यांनी शाश्वत विकासाच्या 9 थिमबद्दल माहिती देऊन नादरपूर येथे येणाऱ्या प्रमुख अतिथिंचे स्वागत केले, तसेच ग्रामसेवक बनकर, यांनी सुद्धा शासनाच्या विविध



योजनेची माहिती दिली. तसेच नाचनवेल येथील अंगणवाडी कर्मचारी सौ. तारा अनिल सुरडकर व मनीषा कैलास थोरात यांचा महात्मा गांधी जयंतीनिमित्त अहिल्यादेवी होळकर ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सत्कार झाल्याबद्दल त्यांचा ग्रामपंचायत नादरपूर च्या वतीने सरपंच सौ. सविता दिलीप निकम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

शेवटी मा. सरपंच सौ. सविता दिलीप निकम यांनी उपस्थित सर्व प्रमुख अतिथिंचे आभार मानले.

# मालधक्क्याच्या विरोधात उलगुलान संघटनेच्या नेतृत्वात आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** केळझर येथील मालधक्याच्या विरोधात गावकऱ्यांनी आज मंगळवारी उलगुलान संघटनेच्या नेतृत्वात रास्ता रोको आंदोलन केले असून सुरजागड कंपनी व लोयड्स मेटल्स कंपनी तसेच स्थानिक प्रशासनाविरोधात तीव्र रोष व्यक्त केला आहे.दरम्यान पोलिसांनी बळाचा वापर करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न देखील केला.त्यांनतर मूल पोलिसांनी आंदोलकाना ताब्यात घेत सुटका केली.मात्र जोपर्यंत गावकऱ्यांच्या मागण्या मान्य होणार नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असा पवित्रा उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी घेतल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, तहसीलदार व लोयड्स मेटल्स चे कर्मचारी यांनी लवकरच गावकऱ्यांच्या मागण्या मान्य करू तसेच सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिल्यानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.



सुरजागड येथील लोह प्रकल्पातील आयरन मोठ्या प्रमाणात केळझर येथे ट्रकच्या माध्यमातून आणल्या जात आहे.हे ट्रक गावच्या मधोमध चालत असून रस्त्यांची अक्षरशः दुर्दशा झाली आहे.तर दिवसरात्र जड वाहतूक होत असून नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.केळझर येथे रेल्वेस्टेशन लगत व परिसरात अनेक नागरिकांच्या शेती आहेत. परिणामी ट्रकच्या ओव्हरलोड वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असून शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे प्रचंड नुकसान होत आहे.इतकेच नव्हे तर अनेक नागरिकांना विविध आजारांची लागण सुद्धा झाली आहे.

या सर्व समस्या मागील अनेक दिवसांपासून शासन दरबारी मांडल्या गेल्या.मात्र प्रशासनाने कुठलीही दखल घेतली नाही.परिणामी समस्या जैसे थे च असून शासनाला जागे करण्यासाठी मंगळवारी गावकऱ्यांना सोबत घेऊन केळझर गावात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे. यावेळी गावकऱ्यांचा रोष बघता मूल येथील उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक घटनास्थळी दाखल झाले.दरम्यान आंदोलकांना ताब्यात सुद्धा घेतले. त्यामुळं काही काळ तणावाचे वातावरण सुद्धा निर्माण झाले होते. त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी व कंपनी व्यवस्थापनाने गावकऱ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी, रस्ते, आरोग्य, प्रदूषण, शिक्षण, शेत पिंक नुकसान भरपाई व अन्य समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले त्यानंतर राजू झोडे यांनी निवेदन देत आंदोलन मागे घेतले.मागण्यांची पूर्तता न झाल्यास येत्या काही दिवसात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी दिला आहे.यावेळी उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे, सरपंच पुनम रामटेके, सुभाष रणदिवे, श्रीकांत घोनमोडे, श्याम झिलपे,मनोज कोडापे, कैलाश घडसे,राजु लोणबले, डेविड खोब्रागडे,निलेश मानकर, सरोज खोब्रागडे, सुरेश फुलझले,पंचशील तामगाडगे आदि गावकरी उपस्थित होते.

# देवेंद्र फडणवीस दिल्लीला जावे ही मुख्यमंत्री शिंदे यांची इच्छा : महेश तपासे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत जाऊन नेतृत्व करावं अशा प्रकारचे वक्तव्य शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाठ यांनी नुकतंच केलं. शिरसाट यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे म्हणाले महाराष्ट्रात एकनाथ शिंदे मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीत बसले असले तरी देखील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच सुपर सीएम आहेत आणि वेळोवेळी याची जाणीव ते मुख्यमंत्री शिंदेंना व दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना करून देतात.

विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयाच्या टांगत्या तलवारीचा रिमोट कंट्रोल श्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे हे संजय शिरसाठ यांना व मुख्यमंत्री शिंदे यांना माहीत असल्यामुळे देवेंद्र फडणवीस यांनी दिल्लीत जाऊन नेतृत्व करावे अशी इच्छा प्रकट करण्यात आली. अर्थात ही सदिच्छा फडणवीस यांच्या प्रेमापाई नव्हे तर मुख्यमंत्री कार्यालयातील कारभारामध्ये वाढत्या हस्तक्षेपामुळे केली असल्याचे तपासे म्हणाले. शिरसाट यांचा बोलवता धनी कोण याचा शोध लावणे कठीण नाही आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीच अशी इच्छा असावी असा टोला महेश तपासे यांनी लगावला.

# ही लढाई जनतेच्या हातातली लढाई : अॅड.प्रकाश आंबेडकर

## साताऱ्यात संविधान सन्मान सभा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**सातारा :** लव्ह जिहादच्या नावाने, गोरक्षकाच्या नावाने, जे गावा गावामध्ये, शहरा-शहरामध्ये फिरतायेत, त्यांचा बंदोबस्त पोलिस करणार नाहीत. पोलिसांचे हात बांधलेले आहेत. त्यांना आदेश देण्यात आलेले आहेत की त्यांच्याकडे नरमाईने बघा, यांचा बंदोबस्त हा नागरिकांनाच करावा लागेल. हिटलर आयुष्यात एकाच गोष्टीला लढत होता अन घाबरत होता. तो असं म्हणत होता की, लोकांच्या जनशक्ती समोर कुणीच लढू शकत नाही आणि मी पण लढू शकत नाही. पण एकट्या एकट्याला गाठून मी निश्चितपणे लढू शकतो. हा जो नवा हिटलर देशामध्ये जन्माला येतोय, त्याच्याशी लढायचं असेल तर आपल्या सगळ्याची शक्ती एकत्र आली पाहिजे. जनशक्ती सोबत इथला असलेला हिटलर ही टिकलेला नाही. हा असला सैतान सुद्धा टिकणार नाही. ही लढाई जनतेच्या हातातली लढाई आहे. ही सत्तेची लढाई नाही, असे अॅड.प्रकाश आंबेडकर यांनी साताऱ्यातील सभेतून म्हटले.



दलित, मुस्लिम, ओ.बी.सी, गरीब मराठा, अल्पसंख्यांक यांच्यावर अन्याय व अत्याचार घडत आहेत. या अन्याय व अत्याचाराच्या विरोधात आवाज उठविण्यासाठी संविधान जनजागृती विचारमंच यांच्या वतीने संविधान के सन्मान मे, बाळासाहेब मैदान में या कार्यक्रमाचे आयोजन साताऱ्याच्या गांधी मैदान येथे करण्यात आलेले होते. यावेळी या कार्यक्रमातून अॅड.बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांनी हजेरी लावत जोरदार टीका केली. या देशांमध्ये उद्या कोणाच्या विचाराचं सरकार चालेल. यावेळी रेखाताई ठाकूर, सोमनाथ साळुंखे, सुप्रसिद्ध अभिनेते किरण माने, आदिवासी भटक्या विमुक्तांचे अरुण जाधव, प्रा.किसन चव्हाण, धनगर समाजाचे नेते अॅड. अविनाश धायगुडे, शेख सुभान अली, बाळकृष्ण देसाई, इम्तियाज नदाफ आदींनी मनोगते व्यक्त केली. इंडियाची युती झाली फार चांगलं आहे. आम्ही स्वागतच करायला बसलेलो आहे. आम्ही इंडियाला म्हणतोय आम्हांला ही तुमच्या बरोबर घ्या. आपण शेवटपर्यंत प्रयत्न करणार आहोत की सगळे एकत्र मिळून लढलं पाहिजे. जसा प्लॅन ए असतो. तसा प्लॅन बी सुद्धा आपण तयार ठेवला पाहिजे. तो लोकांनी तयार ठेवला पाहिजे.दिवाळी होऊन जाऊ द्या, मेलेला हिटलर पुन्हा या देशांमध्ये जिवंत होईल असे सुद्धा अॅड.प्रकाश आंबेडकर म्हणाले.

सुभान अली शेख म्हणाले की,आम्ही संविधानाचे उल्लंघन करणार नाही.आमचा जन्म हा संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी झाला आहे.संविधान सन्मान कसा करायचा हे शिकवायला बाळासाहेब आलेले आहेत.गळ्यातील भगव्या रंगाच्या उपरण्याकडे हात लावत धनगर समाजाचे नेते अॅड.अविनाश धायगुडे म्हणाले की, बुध्दापासून ते छत्रपती पर्यंत हे आपलंच आहे. हे चुकीच्या लोकांच्या हातात गेलं आहे. मुस्लिमांचा द्वेष करणे हे हिंदुत्व आहे का? असा सवाल उपस्थित केला.सातारा ही समानतेचा विचार पेरणारी भूमी आहे.असे आदिवासी भटक्या विमुक्तांचे अरुण जाधव यांनी म्हटले.

**संविधान आपलं तेव्हाच रक्षण करेल जर आपण संविधानाचं रक्षण केलं तर ...!**

सुप्रसिद्ध अभिनेते किरण माने म्हणाले की, सातारा ही शिव फुले शाहू आंबेडकर यांची भूमी आहे .साताऱ्याच्या भूमित पुसेसावळीची घटना घडली हे दुर्दैव आहे .हा माझा सातारा असूच शकत नाही .माझ्या साताऱ्यात असे काही घडूच शकत नाही .असा विश्वास साताऱ्याबाबत व्यक्त करताना जी पुसेसावळीची घटना घडली .त्याबद्दल त्यांनी दु :ख व्यक्त केले .महात्मा फुले यांनी महंमद पैगंबरांवर पोवाडा लिहिला हे किती लोकांना माहीत आहे .महमंद पैगंबर हे पुरोगामी विचारांची धगधगती मशाल होते . हे आपल्या पर्यंत कुणी कसं पोहचविले नाही .संविधाना बाबत बोलताना म्हणाले की, संविधान आपलं तेव्हाच रक्षण करेल जर आपण संविधानाचं रक्षण केलं तर .. संविधानाचे संरक्षण आपल्याला करावे लागेल .ही प्रत्येक भारतीयांची जबाबदारी आहे .

पुसेसावळीच्या दंगलीत ज्या नुरुल हसन यांना जीवास मुकावे लागले. या घटनेबद्दल सुद्धा सभेतून निषेध व्यक्त करण्यात आला. प्रास्ताविक सादिकभाई शेख यांनी करताना जाती भेदाला थारा नाही, धर्म द्वेषाला थारा नाही अशी शपथ सर्वांना दिली. पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अरे साताऱ्यात आला, वाघ आला या घोषणेने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. सातारा जिल्ह्यासह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील बौद्ध,मुस्लिम व समस्त बहुजन समाजातील लोकं उपस्थित होते.समता सैनिक दलाकडून प्रकाश आंबेडकरांना मानवंदना देण्यात आली. यावेळी चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.




# सामान्य जनतेचे खेटे मारणे थांबवा अन्यथा आंदोलन : आकाश रेड्डी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** धर्माबाद तालुक्यातील गोरगरीब जनता असो किंवा शेतकऱ्यांना आपले शासकीय काम करून घ्यावायचे असेल तर अनेकदा खेटे मारावे लागतात. तरीही यंत्रणा मात्र गोगलगाय च्या संथगतीने काम करीत असते. किंबहुना त्यांना चिरीमिरी दिल्याशिवाय काम पूढे सरकत नाही अशा तक्रारी आहेत. जर यापुढील काळात सामान्य लोकांना नाहक चकरा माराव्या लागल्या तर शिवसेना आक्रमक पवित्रा घेईल अशी भूमिका नांदेड जिल्ह्याचे संपर्क प्रमुख आकाश रेड्डी येताळकर (शिंदे गट) यांनी मांडली आहे. धर्माबाद शहर असो अथवा तालुक्यातील मजुरदार वर्ग, शेतकरी यांचे अनेक कामे उपविभागीय कार्यालय, तहसिल कार्यालय प्रलंबीत आहेत.यामध्ये राशनकार्ड,संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना,जात प्रमाणापत्र,वि द्यार्थ्यांचे शैक्षणिक शासकीय कागदपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र वेळेवर देण्यास आपल्या कार्यालयाकडून टाळाटाळ होत आहे अशा नागरीकांच्या तक्रारी आहेत.याचा नाहक त्रास जनसामान्य लोकांना होत आहे.

गोरगरीब जनता असो किंवा कोणीही नागरिक असो त्यांची वेळेवर काम करणे हे अधिकारी, कर्मचाऱ्यांची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे . मात्र सुस्तावलेली यंत्रणा कधी हेतूपूर्वक तर कधी बेपर्वाइने काम टाळत असते . यापुढे तालुक्यातील लोकांची कामे वेळेवर केली नाही तर शिवसेना आपल्या स्टाईलने काम करून घेईल .
**आकाश रेड्डी येताळकर, शिवसेने सहसंपर्क, नांदेड जिल्हा**

खरं तर एका बाजूला सरकार शासन आपल्या दारी म्हणत गतिमान पद्धतीने कामकाज करत आहे. पण प्रशासनातील सरकारी काम सहा महिने थांब ही खोड काही जात नाही.

यापुढील काळात मात्र आम्ही हे खपवून घेणार नाही. लोकांची प्रलंबित कामे तात्काळ झाले पाहिजेत.

अन्यथा शिवसेना आपल्या स्टाईलने आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात करेल असा इशारा निवेदनाच्या माध्यमातून उप विभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

या निवेदनावर सेनेचे जिल्हा सहसंपर्क प्रमुख आकाशरेड्डी येताळकर, दिगांबर पाटील जगदंबे, व्यंकट ममोड, अनि कमलाकर, पिंटू डाकोरे, आजम शेख आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सामाजिक न्याय विभागाची बैठक संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** येथे शासकीय विश्रामग्रहामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट सामाजिक न्याय विभागाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत सामाजिक न्याय विभागाच्या परतूर तालुकाध्यक्ष पदी संतोष आखाडे यांची नियुक्ती करून सत्कार करण्यात आला. या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे अल्पसंख्याक प्रदेश उपाध्यक्ष खय्युम खान पठाण, सामाजिक न्याय विभागाचे जालना जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे, कार्याध्यक्ष अमोल खरात यांची उपस्थिती होती.

यावेळी बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष प्रभाकर घेवंदे म्हणाले की अजित दादा पवार हे एकमेव नेते आहेत जे शब्द देतील ते पूर्ण करणारे नेते आहेत. अजित पवार यांना राज्यात बळ देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने कार्य करावे, व पक्ष बळकट करण्यासाठी जेष्ठांच्या सल्ल्यानुसार पक्षाचे काम करीत राहवे असे आवाहन केले. तर आपल्या अध्यक्षीय भाषणात खय्युमखान पठाण म्हणाले की अजित दादा पवार यांनी अल्पसंख्याकांना पाच टक्के आरक्षण देण्याची आश्वासन दिले आहेत आणि ते आश्वासन पूर्ण करतील असा विश्वास व्यक्त केला. महाराष्ट्रातील सर्व समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत. अजित दादा पवार यांनी विदेशात पिएचडी करणाऱ्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती मंजूर करून घेतल्याचे त्यांनी सांगितले. तर यावेळी तालुकाध्यक्ष विठ्ठल बरकुले, युवक तालुकाध्यक्ष विक्रम धुमाळ, जिल्हा कार्याध्यक्ष अमोल खरात, तालुकाध्यक्ष संतोष आखाडे, आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. नवनियुक्त सामाजिक न्याय विभागाचे तालुकाध्यक्ष संतोष आखाडे यांचा प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी अजित दादा पवार गटाचे तालुकाध्यक्ष विठ्ठल बरकुले, तालुका युवक अध्यक्ष विक्रम धुमाळ, परतुर तालुकाध्यक्ष सामाजिक न्याय विभाग संतोष आखाडे, मोहम्मद लायेक कुरेशी, तालुका सचिव हनुमान कवडे, कपील आखाडे, अशोक गरड, आदींची उपस्थिती होती.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in



शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# कलेची जपणूक केली पाहिजे : प्रा.डॉ.आर. बी.देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** डार्विन या इंग्लंड मधील जगप्रसिद्ध संशोधकाने दोन वर्ष पृथ्वीचे भ्रमण करून उत्क्रांतीवादाचा सिद्धांत मांडला.त्यात त्यांनी सृष्टीच्या निर्मितीची उकल केली.पृथ्वीची निर्मिती पेशीपासून झाली हे संशोधनातून त्यांनी सिद्ध केले. महाविद्यालयामध्ये मुलांच्या मध्ये औद्योगिक, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण झाला पाहिजे. दैनंदिन जीवनात विद्यार्थ्यांनी विज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांने कलेची जपणूक केली पाहिजे. कलागुणांनाच जगामध्ये संधी मिळेल. मानवाची निर्मिती  चिंप्यांजी आणि गोरिला यांच्यापासून झाली आहे.असे प्रतिपादन एस.पी. एम. महाविद्यालय शारदानगर येथील बॉटनी विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.आर.बी.देशमुख यांनी केले. लोणंद ता.खंडाळा येथील रयत शिक्षण संस्थेचे शरदचंद्र पवार महाविद्यालयात विज्ञान मंडळ आणि अविष्कार सेल यांच्या संयुक्त विद्यमाने पोस्टर प्रेझेंटेशन, रांगोळी, पुष्परचना या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रदर्शनाचे प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून ते कार्यक्रमातून बोलत होते. दुसरे प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून रयत शिक्षण संस्थेचे इंग्लिश स्कूल व ज्युनि. कॉलेज, (मुलींचे) लोणंद प्राचार्या सुनंदा नेवसे उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जनजागृती करण्यासाठी अशा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी चांगला सहभाग घेतला होता. पोस्टर प्रदर्शनातून योगेश साळुंखे, सनी शेळके (प्रथम), अश्विनी धायगुडे, शुभदा भुजबळ (द्वितीय), मोनिका नरुटे (तृतीय) तसेच मॉडेल मध्ये प्रतीक शिंदे, जयदीप धायगुडे (प्रथम), राखी धायगुडे, प्रतिक्षा जगदाळे, चैत्राली कऱ्हे (द्वितीय), अनुज बर्गे, विनायक नरळे (तृतीय) आदी विद्यार्थ्यांना मान्यवर परीक्षकांकडून गुण क्रमांक देण्यात आले. रांगोळीच्या माध्यमातून निसर्गाचे संवर्धन कसे करावे हे पोस्टर सादरीकरणातून औद्योगीकरण विज्ञान तंत्रज्ञान दैनंदिन जीवनामध्ये वापरात येणाऱ्या गोष्टींचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. पुष्परचनेच्या माध्यमातून पुष्परचना उद्योगाची निर्मिती करता येते. हा संदेश विद्यार्थ्यांनी दिला. विद्यार्थ्यांमध्ये अशा उपक्रमातून एक चांगला उत्साह दिसून आला.



# साथीच्या आजारांना आळा नियंत्रणात ठेवण्यासाठी धूर फवारणी

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने अनेक ठिकाणी डबके साचलेले असतात. त्यामुळे डासाचे प्रमाण वाढले आहे.परिणामी ग्रामस्थांना साथीचे आजार उद्भवू शकतात. याची खबरदारी म्हणून सेलू तालुक्यातील चिकलठाणा (बू) ग्रामपंचायतच्या वतीने गावात धूर फवारणी करण्यात येत आहे. त्यामुळे साथीच्या आजाराला आळा घालण्यासाठी ग्रामपंचायत कडून प्रयत्न सूरू आहे. ग्रामपंचायतच्या वतीने दोन दिवसापासून गावात धूर फवारनी करण्यात येत आहे. फॉर्गीन मशीन द्वारे संपुर्ण गावात धूर फवारनी करण्यात येत आहे. पावसाळ्याच्या दिवसात डासाची उत्पत्ती वाढते असते. त्यामुळे सर्दी, ताप, खोकल्याचे रूग्न वाढत आहेत. त्यामुळे साथीचे आजार पसरवू नाही म्हणून ग्रामपंचायत तसेच आरोग्य विभागाकडून चिकलठाणा बू येथे धूरफवारनी करण्यात येत आहे. यावेळी ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, ग्रामपंचायत सदस्य सरपंच यांच्यासह ग्रामस्थांची उपस्थिती होती.



# गळफास घेऊन तरुण शेतकऱ्याची आत्महत्या!

## कंधार तालुक्यातील चौकी धर्मापुरी येथील घटना!

आधुनिक केसरी न्यूज

**कंधार :** चौकी धर्मापूर येथील तरुण शेतकरी संतोष बालाजी कळकेकर वय ३५ वर्षे धंदा शेती यांनी सततची नापिकी व बँकेच्या कर्जाला कंटाळून शेतातील गोंदणीच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. त्यामुळे चौकी धर्मापुरी गावात शोककळा पसरली आहे. मयत संतोष बालाजी कळकेकर यांचे वर महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा बारूळ, या बँकेचे ७० हजार रुपये थकीत कर्ज होते, कर्ज थकीत असल्यामुळे यावर्षी त्यांना नवीन कर्ज मिळाले नाही, गतवर्षी उधार उसनवारीवर घेतलेले कर्ज व सततची नापिकी आणि यावर्षी पाऊस बऱ्यापैकी झाला नसल्यामुळे शेती पीक म्हणावे तसे आले नाही, त्यामुळे गतवर्षी घेतलेले कर्ज कसे फेडावे या विवंचनेत ते गत काही दिवसापासून होते. दि. ९ ऑक्टोबर २०२३ रोज सोमवारी सकाळी अंदाजे १०:३० वाजताचे सुमारास आपल्या शेतातील गोंदणीच्या झाडाला गळफास घेऊन आपली जीवन यात्रा संपवली, मयत संतोष कळकेकर यांच्या पश्चात पत्नी १ मुलगा व १ मुलगी असा परिवार आहे. मयताचा पुतण्या परमेश्वर शिवाजीराव कळकेकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कंधार पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू प्रमाणे दाखल करून, पोलीस निरीक्षक उदयकुमार खंडेराय यांचे मार्गदर्शनाखाली बीट जमादार आर.यु. गणाचार्य व पोहेकॉ व्यंकट पाटील हे पुढील तपास करत आहेत.



# जिवाजी महाले जयंती साजरी; होते जिवाजी म्हणून वाचले शिवाजी

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** हिंदवी स्वराज्य संस्थेचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे अंगरक्षक असलेले होता जिवाजी म्हणून वाचला शिवाजी असे नाभिक समाजातील एक भारदार, शुरवीर योध्दा म्हणून असलेला वीर जिवाजी महाले महाराज होय असे प्रतिपादन येथील नानासाहेब राऊत यांनी येथील नाभिक समाज भवनात दि.९सोमवार रोजी वीर जिवाजी महाले यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पुजन करुन मान्यवरांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.यावेळी सरपंच अनिरुद्ध चव्हाण, इंद्रजीत घाटुळ, शिवसेना नेते राजेश चक्कर पाटील, शंकर जाधव, श्रीपाद देशपांडे, दौलतराव देशमुख, बद्रोद्दीन काझी, तहसिन देशमुख, सुभाष पवार, बाळासाहेब तमशेटे, वसंतराव निकाळजे,विशाल निकाळजे, शरद भंडारे, नंदु नाना चव्हाण, मधुकर भवाळे, जिवन भवरे आदींसह जिवाजी महाले समीतीचे अध्यक्ष केशव खाडे, जेष्ठ पत्रकार किसनप्रसाद खाडे, आंबादास खाडे, शंकर खाडे, प्रमेश्वर खाडे, विष्णु खाडे, कैलास खाडे, काशिनाथ खाडे,भारत खाडे, गणेश खाडे, मुकुंद खाडे, अमोल काळे, ज्ञानेश्वर खाडे, गोविंद खाडे, माधव खाडे, मोहन खाडे, अक्षय खाडे, गणेश पां.खाडे,, पंढरी खाडे, अशोक खाडे टेलर, अशोक खाडे, किशोर खाडे, अमोल खाडे, दत्तराव खाडे, संजय सनये, सतिश खाडे, कृष्णा सोनटक्के यांच्यासह सर्व नाभिक समाज बांधवासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



# खुनी हल्ला करणाऱ्या तरुणाची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**पालघर :** जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात कनिष्ठ महाविद्यालयात शिकणाऱ्या अर्चना उदार या तरुणीचा गळा चिरून हत्या करणारा आरोपी प्रभाकर वाघरे (२२) यांने रात्री आत्महत्या केल्याची माहिती पुढे आली आहे. प्रभाकर वाघरे यांच्या कुटुंबीयांनी अर्चना उदार हिच्याशी लग्न करण्यासाठी मागणी टाकली होती. मात्र उदार कुटुंबीयांनी ती अमान्य करत अर्चनाचा विवाह अन्य ठिकाणी निश्चित केला होता. याबाबत मनात राग धरून त्याने ही हत्या केल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात आली आहे.




अर्चना व प्रभाकर यांच्यात जुजबी मैत्री असल्याने हे अधूनमधून महाविद्यालय परिसरात भेटत असत. शुक्रवारी दुपारी प्रभाकर भेटण्यास आल्याने अर्चनाबरोबरच्या मैत्रिणी काहीच्या दूरवर जाऊन थांबल्या. एका पिशवीमध्ये कोयता घेऊन आलेल्या प्रभाकरने तिच्यावर हल्ला करून तिला ठार केले. या हल्ल्यानंतर प्रभाकर घटनास्थळावरून लगतच्या जंगलामध्ये पसार झाला. त्याच्याकडे भ्रमणध्वनी नसल्याने त्याचा शोध घेणे कठीण झाले होते. मोखाडा पोलिसांनी ४० ते ५० स्थानिक तरुणांच्या मदतीने रात्रभर शोध सुरू ठेवला. त्याच्या घराजवळ असणाऱ्या एका तलावात त्याने आत्महत्या केल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती पालघर पोलिसांनी दिली आहे. अशा प्रकारचा खुनी हल्ला होण्याचा जिल्ह्यात अलीकडच्या काळातील ही पहिलीच घटना असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. दोन दिवसांपूर्वी अर्चनाचा वाढदिवस असताना त्याच दिवशी तिला संपवण्याचा डाव विफल ठरल्याची माहिती पुढे आली आहे.



# लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणार

## अजितदादा पवार : लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणणे हा माझा पिंड

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** रोजगार, सर्व समाजघटकांचे आर्थिक सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य, लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी हे राज्य सरकारचे उद्दीष्ट असून येत्या काळात या सर्व विषयांवर राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेच्या माध्यमातून अधिक जोमाने काम करेल अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिली आहे.

महायुतीत सहभागी होऊन राष्ट्रवादी काँग्रेसला आज १० ऑक्टोबर रोजी शंभर दिवस पूर्ण झाले असून अजितदादा पवार यांनी पत्राच्या माध्यमातून राज्यातील जनतेशी संवाद साधला आहे. टिका ही राजकीय नेत्याच्या जीवनाचा भाग आहे आणि सकारात्मक टीकेची मी नेहमीच दखल घेतली आहे. मात्र केवळ राजकारणासाठी राजकीय टिका हा माझा प्रांत नाही. मी सकारात्मक, विकासात्मक राजकारणावर विश्वास असणारा राजकीय कार्यकर्ता आहे. हाती घेतलेले कुठलेही काम मार्गी लावणे, त्या कामाच्या मार्फत लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणणे हा माझा काम करण्याचा पिंड आहे अशी स्पष्ट भूमिका अजितदादा पवार यांनी मांडली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस नेहमीच युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांचा आदर्श, फुले, शाहू आंबेडकरांचे विचार आणि वंदनीय यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या लोककल्याणाचे धोरण यांचा वारसा जपला असून माझ्या नेतृत्वाखाली पुढील काळात हीच परंपरा कायम जपणार असल्याचे वचन अजितदादा पवार यांनी दिले आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात यापूर्वीही अनेक मोठया नेत्यांनी वेगळी राजकीय भूमिका असणारे निर्णय घेतले आहेत. अशा प्रकारचे निर्णय हे त्या - त्या वेळच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीप्रमाणे प्रत्येक राजकीय नेत्याला घ्यावे लागतात. अशीच एक भूमिका घेऊन माझ्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस २ जुलै २०२३ रोजी महायुतीमध्ये सहभागी झाल्याचे अजितदादा पवार यांनी स्पष्ट केले आहे.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाणसाहेबांनी समाजकारण करताना मांडलेले 'बहुजनांना सत्तेतून पाठबळ आणि लोकांना उत्तरदायित्व' हे सुत्र ही प्रेरणा असल्याचे सांगतानाच याच भूमिकेतून महापुरुषांचा आदर्श घेत लोककल्याणासाठी हाती घेतलेला 'वसा विकासाचा आणि विचार बहुजनांचा' अशी ग्वाहीही अजितदादा पवार यांनी दिली आहे.

येत्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या, युवकांच्या, महिलांच्या तसेच विविध समाजघटकांच्या हिताचे रक्षण करण्याच्या भूमिकेतून राज्य सरकारमध्ये कार्यरत असेल असा शब्द अजितदादा पवार यांनी पत्रात दिला आहे.

नव्या सरकारमध्ये सामील होताना पत्रात मांडलेली भूमिका आम्ही पुढे घेऊन जाणार आहोत. याच मार्गावर गेले शंभर दिवस वाटचाल केली आहे आणि पुढेही करत राहू असा विश्वासही अजितदादा पवार यांनी पत्राच्या शेवटी जनतेला दिला आहे.

# रामविलास पासवान : राजकीय हवेचा अंदाज अचूक ओळखणारा नेता : कुंदन खरात

## दिवंगत रामविलास पासवान यांच्या पुण्यतिथीनिमित्त धुळयात अभिवादन कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लोजपाचे संस्थापक अध्यक्ष माजी केंद्रीय मंत्री दिवंगत रामविलास पासवान यांच्या तृतीय पुण्यतिथी निमित्त धुळे शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आल आहे. याप्रसंगी लोक जनशक्ती रामविलास पार्टीचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे यांसह जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी रामविलास पासवान यांच्या नावाचा जयघोष करीत पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला आहे. लोकजनशक्ती पार्टीचे नेते आणि केंद्रीय मंत्री रामविलास पासवान राजकारणाचा अचूक अंदाज असणाऱ्या नेत्यांपैकी एक होते. त्यांना राजकीय हवेचा अचूक अंदाज कळायचा. त्यामुळेच त्यांची राजकीय गणितं कधीच बिघडली नाहीत. उलट सतत सत्तेत राहून ते राजकारणात यशस्वी झाले.1977 मध्ये पहिल्यांदा लोकसभा निवडणूक लढवणारे पासवान 9 वेळा लोकसभेवर निवडून गेले. विविध जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन त्यांनी काम केले. ज्या ही खात्यात त्यांना मंत्रिपद मिळालं त्यांनी निस्वार्थपणे गोरगरिबांना मदत करून आपले कर्तव्य बजावले.तर अनेक पंतप्रधानांसोबत त्यांनी आपला कामाचा ठसा उमटविला. असे अनेक कार्य स्वर्गवासी रामविलास पासवान यांनी केल आहे. त्यांच्या तृतीय पुण्यतिथी निमित्त शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वारासमोर त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आल आहे. यावेळी लोक जनशक्ती रामविलास पार्टीचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे, महिला जिल्हाध्यक्षा शोभाताई चव्हाण, जिल्हा महासचिव कुंदन खरात, राजेंद्र साळवे, सम्राट देवरे, मुरली वाघ, गौतम वाघ, सुरज साळवे, सागर चव्हाण, सागर परदेशी, सिद्धार्थ साळवे, बबलू शिंदे, योगेश त्रिभुवन, अनिल वाघ, तात्या चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने लोक जनशक्ती पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.





# झोपडीतल्या खोपडीपर्यंत शिक्षण पोहचविणाऱ्या शिक्षकाचा यथोचित सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**सुजित सातपुते**

**पिलीव :** रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलिपे ज्युनियर कॉलेज पिलीव, ता. माळशिरस, जि.सोलापूर येथे कार्यरत असणारे व स्वहितापेक्षाही रयत शिक्षण संस्थेसाठी तन- मन- धन अर्पण करणारे, विद्यार्थी प्रिय, मनमिळावू, शांत, संयमी, सर्वांच्या मदतीला धावून जाणारे सर्वगुणसंपन्न असे व्यक्तीमत्व विद्यालयाचे गुरुकुल प्रकल्प प्रमुख, आदर्श शिक्षक, अंकोली व पिलीव या शाखांमध्ये सर्व सेवकांना सोबत घेऊन अतिशय चांगल्या पद्धतीने प्रकल्प राबविणारे त्याचबरोबर कोरोना कालावधीत सर्व कार्ये ठप्प असताना शिक्षणाची दारे बंद असताना ऑनलाइन शिक्षण प्रणालीद्वारे रयत ऑनलाईन स्कूल एज्युकेशन अर्थात ROSE प्रकल्प उभारणी मध्ये वाटा असणारे की ज्या प्रकल्पामुळे गोरगरिबांच्या झोपडी पर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे कार्य साध्य झाले. या कार्याची दखल घेत संस्थेने माने नितीन विश्वंभर यांना रयत शिक्षण संस्थेतर्फे बी. एन.नलवडे यांच्या नावाने दिला जाणारा 'कार्यक्षम गुरुकुल प्रकल्प प्रमुख 'हा पुरस्कार रयत शिक्षण संस्थेच्या उंडेगाव शाखेचे स्कूल कमिटी चेअरमन तुकाराम पाटील यांच्या शुभहस्ते व रयत शिक्षण संस्थेचे विभागीय चेअरमन संजीवकुमार पाटील, विभागीय अधिकारी राजेंद्र साळुंखे, सहाय्यक विभागीय अधिकारी सुरेशकुमार गोडसे व संस्थेचे विविध पदावर कार्यरत असणाऱ्या पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर येथे सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.सदरच्या सन्मानाने आपल्या गावाच्या शैक्षणिक क्षेत्राच्या कामगिरीत भर पडली असल्याने तांदुळवाडी गावातील ग्रामस्थांनी नितीन माने यांचा प्रगतशील बागायतदार सुनील विष्णू चव्हाण यांच्या निवासस्थानी यथोचित सन्मान करण्याचे आयोजन केले होते.

> नितीन माने सर यांना कार्यक्षम गुरुकुल प्रकल्प प्रमुख हा पुरस्कार मिळाल्याने आमच्या तांदळवाडी गावाच्या शिरपेच्यात एक मानाचा तुरा रोवला आहे . त्यामुळे त्यांच्या सत्कार करणे हे आमचे कर्तव्यच बनते . **सुनील चव्हाण, तांदूळ वाडी प्रगतशील बागायतदार**

# जामनेर तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जामनेर तालुक्यातील भिलखेडा शिवारात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात शेतकरी गंभीर जखमी झाला. बिबट्याचा त्वरीत बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. भिलखेडा शेतशिवारात विलास पाटील (४५) आणि त्यांचा मुलगा शेतात कोळपणी करण्यासाठी गेले होते. पाटील हे शेतबांधावर कोळपणी करीत असताना चारीशेजारीच दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. त्यांनी आरडाओरड केल्याने शेजारीच शेतात काम करीत असलेल्या मुलासह शेतकर्यांनी आवाजाच्या दिशेने धाव घेतली. त्यामुळे बिबट्याने धूम ठोकली. हल्ल्यात विलास पाटील यांच्या शरीरावर बिबट्याच्या नखाचे व्रण उमटले आहेत. ग्रामपंचायत सदस्य प्रदीप पाटील यांनी पहूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करुन प्रथमोपचारानंतर जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केले. भिलखेडा शिवारात बिबट्याचा संचार वाढला आहे. सध्या कोळपणी, निंदणीसह इतर शेतीकामे सुरू आहेत. त्यामुळे शेतशिवार शेतकरी व शेतमजुरांनी गजबजले आहेत. बिबट्याने शेतकऱ्यावर हल्ला केल्याने शेतमजुरांसह शेतकर्यांमध्ये घबराट पसरली आहे.

